



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार ९ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## मोदींची इंडोनेशियाच्या सर्वात मोठ्या हिंदू मंदिराला भेट



**जकार्ता/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी इंडोनेशियातील योग्याकार्ता येथे असलेल्या प्रंबनन या सर्वात मोठ्या हिंदू मंदिराला भेट दिली. यावेळी इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो त्यांच्यासोबत होते. या दोन्ही नेत्यांनी मंदिराच्या जतन आणि जीर्णोद्धार प्रकल्पाचे उद्घाटन केले. पंतप्रधानांनी मंदिरात पूजा-अर्चनाही केली.

मंदिर परिसरात जमलेल्या जनसमुदायाला संबोधित करताना ते म्हणाले मला नेहमीच कोणत्या ना कोणत्या रूपात भगवान शिवाशी जोडले जाण्याची संधी मिळाली आहे. सोमनाथ, काशी विस्वनाथ, केदारनाथ धाम आणि उज्जैनमधील महाकाल मंदिरानंतर आता प्रंबनन मंदिराच्या विकासकार्यात योगदान देण्याची संधी मिळणे हे माझे सौभाग्य आहे. आज पंतप्रधान मोदींच्या इंडोनेशिया दौ-याचा तिसरा आणि अंतिम दिवस आहे. आज संध्याकाळी ते इंडोनेशियाहून ऑस्ट्रेलियातील मेलबर्नसाठी रवाना होतील. त्यांचा ऑस्ट्रेलिया दौरा ८ ते १० जुलै या कालावधीत नियोजित आहे. ते पुढे म्हणाले, माझा जन्म (पान २ वर)

# राज्यभरात कोसळधारा, पुढील 4 दिवस मुसळधार पावसाचा अंदाज

## पालघर, रायगडला रेड, मुंबई, ठाणे, वर्धा, नागपूरला ऑरेंज अलर्ट



**मुंबई/प्रतिनिधी :** पुढील चार दिवस कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात जोरदार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे. त्याचप्रमाणे मराठवाड्याच्या काही भागातही मुसळधार पावसाची शक्यता आहे. तर पुढील ४ दिवस मुंबईत मुसळधार ते अतिमुसळधार पाउस कोसळण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाने आज विदर्भातील अनेक जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केले आहे. पूर्व विदर्भातील भंडारा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर तर पश्चिम विदर्भातील अमरावती आणि अकोला जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केले आहे. त्यामुळे आज विदर्भातील बहुतांशी भागांमध्ये सर्वदूर मध्यम स्वरूपाचा पाउस पडेल अशी शक्यता आहे.

मुंबईला पुढील ४ दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईतील काही भागात अतिवृष्टीची देखील शक्यता वर्तवण्यात आली आहे. ज्यात, २०० मिमी पर्यंत २४ तासात पावसाची नोंद होउ शकते. दरम्यान, पुढील ७२ तासांत मुंबईत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबईला पाणी पुरवठा करणा-या धरणक्षेत्रात देखील चांगल्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईवर ओढवलेलं पाणीसंकट कमी होण्यास मदत होईल. पालघर जिल्ह्यात गेल्या तीन दिवसापासून जोरदार पाउस सुरू असून आजही हवामान खात्याने पालघर जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट घोषित केला आहे. सध्याही जिल्ह्यात पावसाची सुरू असून आज मुसळधार पाउस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे त्यामुळे पालघर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड यांनी शाळा महाविद्यालय अंगणवाड्यांना सुट्टी घोषित केले आहे. तर या पडत असलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील नदी नाले ओसांडून वाहत असून जिल्ह्यातील प्रमुख धामणे आणि कवडास या धरणांमध्ये चांगला पाणीसाठा ही निर्माण झाला आहे दुसरीकडे जव्हार, मोखाडा सारख्या भागांमध्ये पाणीटंचाई जाणवत होती त्या पाणीटंचाईचा संकट आता मिटण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील भात पेरण्याच्या कामाला वेग येणार असून शेतक-यांना दिलासा मिळाला आहे तर आज पालघरला रेड अलर्ट असल्याने आवश्यक काम असेल तरच घराबाहेर पडा अस आवाहनही नागरिकांना प्रशासनाकडून करण्यात आला आहे. (पान २ वर)





## नाशिक-त्र्यंबकेश्वरचा संपर्क तुटला!

**नाशिक/प्रतिनिधी-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी नाशिकला ढगफुटीची भीती व्यक्तकेली होती. ढगफुटी टळली मात्र मुसळधार पावसाने नाशिकला झोडपले. काल रात्रभर पावसाने नाशिक शहरात हाहाकार उडाला.मुसळधार पावसाने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर शहर आज पुन्हा पाण्याखाली गेले. सबंध शहरात गोदावरी, नंदीनी नदीचा पूर आणि पावसाचे पाणी वाहत होते. त्र्यंबकेश्वर परिसरात पुराच्या पाण्याने दुरावस्था झाली. शहरातील शाळांना सुटी जाहीर करावी लागली. नाशिक, त्र्यंबकेश्वर आणि घोटी शहराला जोडणारा नवा पूल बांधण्यात आले होते. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे हा पूल वाहून गेला. त्यामुळे त्र्यंबकेश्वर चा संपर्क तुटला. या परिसरात अनेक ठिकाणी गावे आणि शेती पाण्याखाली गेली. मुसळधार पावसाने नाशिक शहरातील जनजीवन ठप्प झाले. पाण्याचे संकट असलेल्या शहराला पुरवठा करणारा गंगापूर धरण दोन दिवसाच्या पावसाने ५४ टक्के भरले. गोदावरी नदीला पूर आला. दुतोंड्या मारुतीच्या गळ्यापर्यंत (पान २ वर)

## राम मंदिरातील 32 किलो सोने, 1,518 किलो चांदी सुरक्षित

**अयोध्या/वृत्तसंस्था :** राम मंदिरातील देणग्यांच्या गैरव्यवहाराच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने सर्व मौल्यवान वस्तू सुरक्षित असल्याचा दावा केला. ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी यांनी सांगितले की, भाविकांनी अर्पण केलेल्या २,९२६ मौल्यवान वस्तूंची संपूर्ण नोंद ठेवण्यात आली असून त्या सुरक्षित आहेत.



ट्रस्टकडे ३२.२५९ किलो सोन्याच्या वस्तू आणि १,५१८.९२५ किलो चांदी व चांदीसदृश वस्तू आहेत. प्रत्येक देणगीची दात्याचे नाव, तारीख व इतर तपशीलांसह नोंद करण्यात आली आहे. सोन्याची रामचरितमानस, चांदीच्या विटा, चरणपादुका आणि काकभुशुंडीची प्रतिकृतीही माध्यमांसमोर प्रदर्शित करण्यात आली. देणग्यांमधील गैरव्यवहाराचे कोणाकडे पुरावे असल्यास ते एसआयटीकडे सादर करावेत, असे आवाहन ट्रस्टने केले आहे.

**पैशांची नव्हे, भाविकांच्या श्रद्धेचीही चोरी-** राम मंदिरात केवळ पैशांची चोरी झालेली नाही, तर देशभरातील कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेचीही चोरी झाली आहे, असा थेट आरोप हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू यांनी केला. श्रीराम जन्मभूमी तीर्थ (पान २ वर)

## '1000 खोटारडे मेल्यानंतर हे जन्माला आले असतील'

### Missing Link वरील प्रत्येक आरोपाला मुख्यमंत्र्यांनी दिले उत्तर

**मुंबई/प्रतिनिधी :** पैसे घेउन सोशल मीडियावर शिव्या देणारे भाड्याचे तट्टू फिरत आहेत. मला कितीही शिव्या द्या, मी शिव्याप्रूफ आहे. आजपासून १० वर्षांनी हे शिव्या देणारे दिसणार नाहीत, पण ही कनेक्टिंग लिंक तिथेच दिसेल आणि त्यावर देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदेंचेच नाव असेल,' अशा अत्यंत जळजळीत आणि टोकदार शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधक आणि सोशल मीडिया ट्रोलर्सचा खरपूस समाचार घेतला.




मुंबई-पुणे मार्गावरील कनेक्टिंग लिंकवर दरड कोसळल्याच्या घटनेनंतर सुरू झालेल्या राजकारणावर आणि बदनामीच्या मोहिमेवर मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत थेट हल्ला चढवला. माझी बदनामी खुशाल करा, पण जर महाराष्ट्राची बदनामी कराल तर कोणालाही सोडणार नाही, असा सज्जड इशारा त्यांनी यावेळी दिला. मुख्यमंत्री विधानसभेत बोलत होते. या प्रकल्पावर ७००० कोटी रुपये पाण्यात गेल्याची टीका करणा-यांना मुख्यमंत्र्यांनी तांत्रिक वास्तव सांगत चोख उत्तर दिले. ही लिंक म्हणजे एक 'इंजिनिअरिंग मार्व्हल' असून, यामध्ये भारतातील सर्वात उंच केबल स्टेड ब्रीज आणि जगातील सर्वात रुंद बोगदा तयार करण्यात आला आहे. ताशी १७० किमी वेगाने वारे वाहणा-या भागात हे आव्हान पूर्ण केले आहे. मुसळधार पावसामुळे केवळ वरून आलेला दरडीचा मलबा कमानीवर पडला होता, मुख्य बोगद्याला किंवा पुलाला कुठेही क्रॅक गेलेला नाही. विरोधकांनी ७००० कोटी पाण्यात गेल्याचा खोटा प्रचार केला, पण प्रशासनाने सर्वांच्या नाकावर टिच्चून अवघ्या १८ तासांत रस्ता पुन्हा वाहतुकीसाठी सुरू करून दाखवला.

**आधीच्या मुख्यमंत्र्यांनी फाईल बंद केली होती-** हा प्रकल्प महायुती सरकारच्या हिंमतीमुळेच पूर्ण होउ शकला, असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी २ पानांचे (पान २ वर)

## १० सरकारी अधिका-यांच्या ठिकाणांवर धाड

**बंगळुरू/वृत्तसंस्था :** कर्नाटकच्या लोकायुक्तांनी बुधवारी राज्यभरात एकाचवेळी धाड टाकत १० सरकारी अधिका-यांच्या ठिकाणांवर छापेमारी केली. या सर्व अधिका-यांवर उत्पन्नापेक्षा अधिक मालमत्ता जमा केल्याचा आरोप आहे. बंगळुरू शहर, बंगळुरू दक्षिण, रायचूर, चित्रदुर्ग, तुमकुरु, शिवमोगा आणि कलबुर्गी याठिकाणी अधिका-यांच्या घरांवर आणि कार्यालयाची झाडाझडती घेण्यात आली. या कारवाईत कृषी विभागातील अधिकारी पुष्पा यांच्या घरातून मोठ्या प्रमाणात सोन्याचे दागिने आणि रोकड जप्त करण्यात आली आहे.पुष्पा यांच्या घरातून जप्त केलेले सोने आणि रोकड यांचे मोजमाप अद्याप सुरू आहे. संपूर्ण मोजणीनंतर ही रक्कम किती असेल याचे स्पष्टीकरण मिळेल. लोकायुक्तांच्या टीमने ज्या १० अधिका-यांच्या घरी छापेमारी केली, त्यात कृष्णा भाग्य जल निगमचे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर बसनगौड पाटील, चित्रदुर्गचे कृषी इंजिनिअर शंकर एम आणि वाटरशेड डेवलपमेंट विभागाचे अधिकारी दुग्गप्पा यांचा समावेश आहे. त्याशिवाय बंगळुरू सार्वजनिक विभागातील अधिकारी नरेंद्र कुमार, केआरआयडीएल बंगळुरू रेंज ऑफिसमधील सुपरिटेंडेंड इंजिनिअर प्रवीण बी श्री हरी आणि बंगळुरू एपीएमसीचे उपसंचालक पुष्पा डी आर यांच्यावर कारवाई करण्यात आली. याआधीही कर्नाटकात अशाप्रकारे सरकारी अधिका-यांवर कारवाई करण्यात आली होती.त्या कारवाई वेळी अधिका-यांच्या ४७ ठिकाणांवर धाड टाकली गेली. त्यात जवळपास ३५ कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली. या जप्त केलेल्या संपत्तीत जमीन, शेतजमिनीचे कागदपत्रे, घर, रोकड आणि दागिन्यांचा समावेश आहे. १० अधिका-यांच्या घरातून २२.३१ कोटींचे घर, जमीन आणि शेतजमीन यांचे रेकार्ड सापडले. त्याशिवाय ५.९१ कोटींचे दागिने, २.३३ कोटींच्या गाड्या, ३.९६ कोटींचे महागडे सामान, ७८.४० लाखांची रोकड आणि बँक डिपाझिट जप्त करण्यात आले होते. २५ नोव्हेंबरला ही कारवाई करण्यात आली होती.



## तुकाराम मुंढेंचा रुस्तमला दणका!

**मुंबई :** आपल्या कडक आणि शिस्तप्रिय कार्यपद्धतीसाठी प्रसिद्ध असलेले आयएएस अधिकारी आणि अन्न व औषध प्रशासनाचे (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारताच अन्न भेसळ आणि अस्वच्छतेविरुद्ध मोठी मोहीम उघडली आहे. एफडीएच्या पथकाने एकाच दिवशी तब्बल १६ नामांकित हाटेल्स, रेस्टारंट्स आणि ढाब्यांवर अचानक छापेमारी केली. या धडक कारवाईत मुंबईतील नरिमन पाईंट परिसरातील अत्यंत प्रसिद्ध आणि ऐतिहासिक 'रुस्तम आईस्क्रीम' दुकानाला मोठा दणका देत त्यांचा परवाना तात्काळ निलंबित केला आहे. या मोहिमेमुळे राज्यातील हाटेल व्यावसायिक आणि अन्न उत्पादकांचे धाबे दणाणले आहेत. एकाच दिवसात झालेल्या या मोठ्या कारवाईत अनेक गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. नरिमन पाईंट येथील 'रुस्तम अँड कंपनी' हे मुंबईतील ग्राहकांचे आणि पर्यटकांचे अत्यंत आवडते आणि जुने आईस्क्रीम केंद्र मानले जाते. मात्र, एफडीएच्या पथकाने जेव्हा या ठिकाणी तपासणी केली, तेव्हा तिथली दुरवस्था पाहून अधिकारीही चक्रावले. दुकानात स्वच्छतेच्या नियमांचे सर्रास उल्लंघन झाले होते. तिथे जिवंत उंदीर आणि घरगुती माशांचा मोठ्या प्रमाणावर वावर आढळून आला. आईस्क्रीम सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक असलेली 'कोल्ड चेन ऑपरेशन्स' खंडित अवस्थेत होती.

## विधानभवनात शरद पवारांची पक्षाच्या आमदारांसोबत बैठक

### रोहित पवार गैरहजर

**मुंबई :** राज्यात गेल्या दोन दिवसांपासून शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (NCP) सत्तेत सहभागी होणार असल्याची चर्चा सुरू आहे. याबाबत, महायुतीत आता कुणीही नवीन पक्ष येणार नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मात्र, अद्यापही राजकीय वर्तुळात याची चर्चा होत असून आज राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार यांनी पक्षाच्या आमदारांची बैठक घेतली. या बैठकीत, आमदारांशी थेट शरद पवार यांनी संवाद साधला. मात्र, आजच्या बैठकीत आमदार रोहित पवार यांची अनुपस्थिती लक्षवेधी ठरली. भाजपसोबत जाण्यास रोहित पवार यांचा विरोध असल्यानेच ते आजच्या बैठकीला उपस्थित नव्हते, अशी माहिती समोर आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आमदारांची मागील आठवड्यात विधिमंडळात महत्त्वाची बैठक पार पडली. आमदारांकडून पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडे माध्यमांमधे सुरू असलेल्या चर्चांबाबत विचारणा करण्यात आली. पक्ष काँग्रेसमध्ये विलिनीकरण करण्यात येणार आहे की एनडीएचा घटकपक्ष होणार, याबाबत आमदारांकडून विचारणा झाली. पक्षातील काही आमदारांकडून काँग्रेससोबत जाणार असाल तर आपल्याला वेगळा विचार करावा लागेल, अशी स्पष्ट भूमिका मांडण्यात आली. तर, आमदार रोहित पवार यांनी भाजपसोबत जाण्याला तीव्र विरोध करताना बैठकीतून बाहेर जाणं पसंत केलं. त्यानंतर, (पान २ वर)

## दहशतवादी झाकीर गनीला सुरक्षा दलाकडून कंठस्नान

**शोपियान :** जम्मू आणि काश्मीरमधील शोपियानमध्ये सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले असून चार दिवसांपूर्वी सुरू झालेल्या चकमकीनंतर, बुधवारी लश्कर-ए-तोयबाचा सर्वोच्च कमांडर झाकीर गनी याचा मृतदेह त्याच्या शस्त्रांसह जप्त करण्यात आला. सुरक्षा यंत्रणा संपूर्ण परिसरात शोधमोहीम राबवत आहेत. शनिवारी सीसीटीव्हीमध्ये दोन दहशतवादी दिसले आणि त्याच दिवशी चकमक सुरू झाली. अखेरीस, चार दिवसांनंतर, ठार झालेल्या दहशतवाद्याचा मृतदेह शोपियानच्या चानपोरा गावातून ताब्यात घेण्यात आला. शोपियान चकमकीत लष्कर-ए-तोयबाचा सर्वोच्च कमांडर झाकीर गनाई ठार झाल्याची आता पुष्टी झाली आहे. त्याचा मृतदेह आज शोपियानमधून ताब्यात घेण्यात आला.शोपियानमध्ये झालेल्या चकमकीनंतर चार दिवसांनी, ठार झालेल्या दहशतवाद्याचा मृतदेह त्याच्या शस्त्रासह जप्त करण्यात आला आहे.



चकमक सुरू झाली त्याच दिवशी, शनिवारी, दोन दहशतवादी सीसीटीव्हीमध्ये दिसले होते. जम्मू आणि काश्मीरच्या शोपियान जिल्ह्यातील सुरक्षा दलांनी रविवारी रात्री काही काळ थांबल्यानंतर, पुन्हा लगेचच एक मोठी दहशतवादविरोधी मोहीम सुरू केली. लश्कर-ए-तोयबाचे (छीळ) दोन दहशतवादी एका घनदाट फळांच्या बागेमध्ये लपून बसले होते. या मोहिमेचा हा दुसरा दिवस होता. लष्कर, जम्मू आणि काश्मीर पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाने मीमंदर परिसराभोवतीचा वेढा अधिक कडक केला, होता. याच ठिकाणी शुक्रवारी पाळत ठेवणा-या कॅमे-यांमध्ये हे दहशतवादी प्रथम दिसले होते.

## विधानसभेत पावसावरून तांडव!

**मुंबई**/प्रतिनिधी-राज्यात गेल्या चार दिवसापासून मुसळधार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. मुंबई, पुण्यातील जनजीवन पावसामुळे विस्कळीत झाले आहे. या पावसामुळे मुंबई-पुणे महामार्ग व रेल्वेमार्ग बंद पडला आहे. तर पावसामुळे मोठे नुकसान झाल्याने विधानसभेत पावसाच्या मुद्द्यावरून विरोधक चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहवयास मिळाले. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांनी राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरत याविषयी चर्चा करण्याची मागणी केली. मात्र, यावेळी चर्चेच्या मुद्द्यावरून सभागृहात सत्तधारी-विरोधक आक्रमक झाले. गदारोळ केला जात असल्याने सभागृहाचे कामकाज पाच मिनिटासाठी तहकूब करण्यात आले. राज्यात गेल्या चार दिवसापासून पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे सरकारने या गंभीर परिस्थितीवर सभागृहात चर्चा करावी, यासाठी सत्ताधारी मंडळी आक्रमक झाली होती. राज्यात पावसामुळे मोठ्या (पान २ वर)








# ट्रान्झिट पास दाखवा, स्टॉक रजिस्टर उघडा... मगच संशय दूर होईल!

## गाजीपूर स्टोन क्रशर प्रकरण : खनिजाच्या स्रोतापासून रॉयल्टीपर्यंत प्रत्येक नोंदीची संयुक्त चौकशीची मागणी; प्रशासनाच्या मौनामुळे संशय अधिक गडद

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर येथील स्टोन क्रशर प्रकरण आता केवळ दोन उद्योगांपुरते मर्यादित राहिलेले नाही. उलट, गौण खनिजाच्या संपूर्ण साखळीची पारदर्शकता, महसुली नियंत्रण, खनिज वाहतूक आणि शासकीय देखरेखीवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांत समोर आलेल्या विविध बाबींमुळे आता सर्वात मोठा प्रश्न एका मुद्द्यावर येऊन थांबला आहे तो म्हणजे या स्टोन क्रशरवर प्रक्रिया होणारे गौण खनिज नेमके कुठून येते?

या प्रश्नाचे अधिकृत, दस्तऐवजाधारित उत्तर मिळाले, तर या प्रकरणातील अनेक गाठी एकाच वेळी सुटू शकतात. अन्यथा प्रशासनाच्या मौनामुळे संशय अधिकच बळावत राहणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

गौण खनिज नियमांनुसार, कोणत्याही स्टोन क्रशरवर प्रक्रिया होणारे खनिज अधिकृत खाणपट्टाधारकाकडून वैध पद्धतीने खरेदी केलेले असणे आवश्यक असते. प्रत्येक वाहनासोबत वैध ट्रान्झिट पास (ई-रॉयल्टी) असणे बंधनकारक असते. क्रशरवर आवक-जावक नोंदवही, स्टॉक रजिस्टर, वजन काट्याच्या नोंदी आणि रॉयल्टीशी संबंधित सर्व कागदपत्रे




अद्ययावत ठेवणे आवश्यक असते.

मात्र गाजीपूर येथील संबंधित प्रकरणात हे सर्व दस्तऐवज महसूल विभाग, भूविज्ञान विभाग किंवा अन्य सक्षम यंत्रणांनी प्रत्यक्ष तपासून त्याबाबत अधिकृत भूमिका जाहीर केली आहे का, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

विशेष म्हणजे, एका बाजूला आदिवासी जमिनींच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित झाले, दुसरीकडे सुमारे ४८ कोटी रुपयांच्या महसुली दंडाची नोंद समोर आली. त्यानंतर सीलिंग कारवाई झाल्याची माहिती पुढे आली. आता त्याच परिसरात दुसरा स्टोन क्रशर सुरू झाल्याचे सांगितले जात असल्याने संपूर्ण व्यवहाराची शासकीय पडताळणी अपरिहार्य असल्याची मागणी जोर धरत आहे.

प्रशासनाने आतापर्यंत या सर्व मुद्द्यांवर सविस्तर अधिकृत खुलासा केलेला नसल्याने जनतेमध्ये अनेक शंका उपस्थित होत आहेत. संबंधित उद्योगांकडे वैध ट्रान्झिट पासची नोंद आहे का? खनिज खरेदीचे करार उपलब्ध आहेत का? प्रत्यक्ष साठा आणि स्टॉक रजिस्टरमध्ये तफावत आहे का? महसूल, भूविज्ञान आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने संयुक्त तपासणी केली आहे का? या सर्व प्रश्नांची उत्तरे अधिकृत नोंदींसह समोर येणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

स्थानिक पातळीवर अशीही चर्चा आहे की, जर सर्व व्यवहार नियमानुसार झाले असतील, तर संबंधित दस्तऐवज सार्वजनिक करण्यास कोणतीच अडचण नसावी. उलट त्यामुळे सुरू असलेल्या सर्व शंका आणि आरोपांनाही पूर्णविराम मिळू शकतो. आता या प्रकरणात केवळ महसूल विभागाची स्वतंत्र चौकशी पुरेशी ठरणार नाही. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभाग, भूविज्ञान विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ, उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि आवश्यक असल्यास इतर संबंधित यंत्रणांची संयुक्त विशेष तपासणी करून संपूर्ण अहवाल सार्वजनिक करण्यात यावा, अशी मागणी अधिक तीव्र होत आहे.

### स्टॉक रजिस्टर आणि प्रत्यक्ष साठा जुळतो का?

नियमांनुसार स्टोन क्रशरवरील प्रत्येक टन खनिजाची नोंद स्टॉक रजिस्टरमध्ये असणे अपेक्षित असते. प्रत्यक्ष साठा, खरेदीची कागदपत्रे आणि ट्रान्झिट पास यांची सांगड घालून अचानक तपासणी झाल्यास कोणतीही तफावत सहज समोर येऊ शकते, असे जाणकारांचे मत आहे.

### एका दिवसाचे ट्रान्झिट पास तपासले तरी वास्तव समोर येईल?

तज्ज्ञांच्या मते, संबंधित स्टोन क्रशरवर एका दिवसात आलेल्या सर्व वाहनांचे ट्रान्झिट पास, ई-रॉयल्टी, वजन काट्याच्या नोंदी आणि स्टॉक रजिस्टरची पडताळणी केली, तरी खनिजाच्या स्रोताचे वास्तव स्पष्ट होऊ शकते. त्यामुळे तपासाची सुरुवात याच दस्तऐवजांपासून करावी, अशी मागणी होत आहे.

### ४८ कोटींच्या दंडानंतर पुढची पायरी कोणती?

संबंधित प्रकरणात महसुली दंडाची नोंद झाल्यानंतर त्याची प्रत्यक्ष वसुली कितपत झाली, उर्वरित रक्कम वसूल करण्यासाठी कोणती कारवाई सुरू आहे, याचा अधिकृत खुलासा अद्याप झालेला नाही. त्यामुळे या दंडाच्या सद्यस्थितीबाबतही प्रशासनाने स्पष्ट माहिती जाहीर करावी, अशी मागणी होत आहे.

### संयुक्त चौकशीच संशय दूर करू शकते


गाजीपूर प्रकरणात आदिवासी जमिनींचा वापर, खनिजाचा स्रोत, ट्रान्झिट पास, रॉयल्टी, स्टॉक रजिस्टर, महसुली दंड, सीलिंग कारवाई, नव्या स्टोन क्रशरच्या परवानग्या आणि न्यायालयीन प्रक्रियेचा एकत्रित अभ्यास झाल्याशिवाय संपूर्ण चित्र स्पष्ट होणार नाही. त्यामुळे विभागनिहाय नव्हे तर संयुक्त विशेष चौकशी करून संपूर्ण अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

# दर्यापूर नगर परिषदेच्या प्रभागनिहाय नालेसफाईला गती

## व्यावसायिकांच्या हलगर्जीपणामुळे नाल्या तुंबण्याचा धोका

**खल्लार/प्रतिनिधी:-** दर्यापूर नगर परिषदेतर्फे शहरातील विविध प्रभागांमध्ये पावसाळ्यापूर्वी नालेसफाई व स्वच्छता मोहिमेला गती देण्यात आली असून, बहुतांश ठिकाणी ही कामे पूर्णत्वास पोहोचली आहेत. मात्र, काही व्यावसायिकांच्या निष्काळजीपणामुळे रस्त्यालगत व नाल्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असल्याने नाल्या तुंबण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नागरिकांकडून पालिकेलाच जबाबदार धरले जात असले तरी प्रत्यक्षात काही व्यावसायिकांचा हलगर्जीपणा यामागे कारणीभूत आहे.

प्रभाग क्रमांक १० मध्ये नगरसेवक मयूर लांडे आणि



नगरसेविका मंगला तराळे यांच्या पुढाकारातून पावसाळ्यापूर्वीची स्वच्छता, नालेसफाई व इतर आवश्यक कामे मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्यात आली आहेत. तरीही काही व्यावसायिकांकडून नाल्यांच्या कडेला कचरा टाकण्याचे प्रकार सुरू असल्याने स्वच्छता व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे.

दि.७ जुलै रोजी नगरसेवक मयूर लांडे यांनी संबंधित परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून नाल्यांच्या कडेला टाकण्यात आलेला कचरा कोणत्या व्यावसायिकाने टाकला याची माहिती घेतली. संबंधितांना जाब विचारून आवश्यक ती कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला. नगरसेवकांनी शहरातील सर्व व्यावसायिकांना स्वच्छता राखण्याचे आवाहन करत, सार्वजनिक ठिकाणी किंवा नाल्यांमध्ये कचरा टाकू नये, असे स्पष्ट केले.

स्वच्छ आणि सुंदर दर्यापूरसाठी नागरिकांसह व्यावसायिकांनीही जबाबदारीची जाणीव ठेवून नगर परिषदेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### पूर्णा धरणाचे दोन दरवाजे

इतक्या पाण्याचा विसर्ग सुरू आहे. धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे नदीपात्रातील, पाण्याच्या पातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यासाठी नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

सध्य स्थितीत ८ जुलै रोजी सकाळी ७ वाजता, जलाशयातील पाण्याची पातळी ४४९.५८ इतकी होती.सदर प्रकल्पात उपयुक्त पाण्याचा साठा,आज रोजी २५.१८ द.घ.मी.इतका आहे.त्यामुळे धरणातील पाणी साठा ,७१.१९ टक्के इतका झाला आहे.धरणातील पाण्याचा येवा सुरूच असल्याने, प्रकल्प प्रशासनाला नदीपात्रात पाणी सोडण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे.

### इसमाची गळफास घेऊन

असे गळफास घेऊन आत्महत्या करणाऱ्या इसमाचे नाव आहे. काल घरी कुणीही नसताना राहत्या घरात गळफास घेऊन त्यांनी आत्महत्या केली.मृतकाच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी असा आप्त परिवार असून आत्महत्येचे कारण कळू शकले नाही. घटनेची नोंद खल्लार पोलिसांनी केली आहे.

### सामरा नगरातील कुंटणखाण्यावर

आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक उमेश मुंडे ,नितीन शिंदे, मनीष करणे, पवन तिवारी, पंकज खटे, रवि लिखितकर, शशिकांत शेळके, अंकुश काळे, अमोल खंडेझोड, प्रशांत बेलोकर, आकाश यादव, अंकुश काळे, रफीक खान, मंगेश कपिले, नरेश बावणे, अमोल देशमुख, यश ओगले, पंकज गाठे, महिला अमलदार कल्पना तोटे ,अंजली पाचखंडे यांनी केली.

### राज्यातील ३०४ अनुभवी आयटी

कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्ती न करता त्यांच्या सेवा समायोजित करण्यात याव्यात याबाबत मागणी केलेली होती. या मागणीच्या अनुषंगाने आज मंत्रालय येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष दिशेला यांचे प्रमुख उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार आता या कर्मचाऱ्यांच्या सेवा जिल्हाधिकारी यांचे स्तरावर समायोजित करण्यात येणार असल्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. यामुळे या सर्व अनुभवी ३०४ कर्मचाऱ्यांच्या सेवा पूर्ववत होण्याच्या मागणीला यश आलेले आहे.या सर्व कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळालेला आहे. या बैठकीमध्ये आमदार राजेश वानखेडे, आ. सुलभा खोडके, आ. सचिन कल्याण शेट्टी सचिव माहिती तंत्रज्ञान, आयुक्त माहिती तंत्रज्ञान यांचे सह वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

दि. ०१ जुलै २०२६ रोजी या सर्व कर्मचा-यांना त्यांच्या सेवा समाप्तीबाबत ई-मेल प्राप्त झाला होता. या निर्णयामुळे ३०४ अनुभवी आयटी तज्ञांच्या सेवांचा लाभ शासनाला गमवावा लागण्याची शक्यता निर्माण झालेली होती तसेच या कर्मचाऱ्यांच्या उदरनिर्वाहावर मोठी टाच येणार होती. राज्याच्या डिजिटल प्रशासनासाठी तयार झालेले तांत्रिक मनुष्यबळ वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे सदर प्रकरणाचा प्रशासकीय आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तातडीने पुनर्विचार करून या कर्मचाऱ्यांच्या समायोजनाचा सकारात्मक निर्णय घेण्याबाबतच्या कर्मचाऱ्यांच्या मागणी वरून उपरोक्त बैठक आयोजित करण्याबाबत आमदार राजेश वानखडे व इतर आमदारांनी मागणी केलेली होती.

या कर्मचाऱ्यांच्या दहा वर्षाच्या अनुभवाचा, कांशल्याचा व राज्याच्या डिजिटल प्रशासनासाठी दिलेल्या योगदानाचा योग्य सन्मान राखून कोणत्याही अनुभवी कर्मचाऱ्यावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेण्यात बाबत प्रामुख्याने मागणी करण्यात आलेली होती. या मागणीच्या अनुषंगाने आज पार पडलेल्या बैठकीमध्ये सकारात्मक निर्णय घेण्यात आलेला असून या कर्मचाऱ्यांचे सेवांचे समायोजन करण्याचे निर्देश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिल्यामुळे या सर्व कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळालेला आहे. याबाबत उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधींनी उपस्थित मंत्री महोदय व आमदार राजेश वानखडे यांचे आभार व्यक्त केले.

### बोगस बियाणे कंपन्यांवर तातडीने

बोगस किंवा निकृष्ट दर्जाचे बियाणे विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता , बियाणे अधिनियम १९६६, बियाणे नियम १९६८ तसेच इतर लागू कायद्यांनुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत. तसेच सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करून त्यांना तातडीने नुकसानभरपाई व आर्थिक मदत देण्यात यावी.

आज शेतकरी आधीच वाढलेला उत्पादन खर्च, महागडी बियाणे, खते आणि पीक विम्याच्या अपुऱ्या मदतीमुळे आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत बोगस बियाण्यांमुळे दुबार पेरणीची वेळ आल्याने शासन व प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात तालुका काँग्रेस अध्यक्ष वैभव वानखडे, लुकेश केणे, मुकुंद पुनसे, सेतू देशमुख, शालिग्रामजी ढगे, चंदू ढगे, प्रशांत पुनसे, मंगेश पुनसे, संजय पुनसे, दिनेश ढगे, किशोर गोरडे, विश्वजीत बाखडे, सागर वाघमारे, प्रमोद वानखडे, प्रणव गौरखेडे, संजय चौधरी, अतुल गवड, वैभव ढवळे, अजिंक्य चौधरी, सचिन वानखडे, योगेश वानखडे, आदेश वानखडे, राजूभाऊ देशमुख, श्रीकांत माहोरे, आकाश मकेश्वर, गौरव चौधरी, आनंद ढगे, श्रीकांत ढगे, कैलास ठाकरे, रामदासजी पुनसे, तसेच मोठ्या संख्येने शेतकरी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### निकृष्ट बियाणे विकणाऱ्या कंपनी

कायम अस्मानी सुलतानी संकटात सापडलेला असताना बियाणे कंपनीने निकृष्ट बियाणे देऊन शेतकऱ्यांवर अन्याय केला आहे. सदर प्रकारामुळे अल्पभूधारक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडलेले आहे. सदर बाबीची दखल घेत नीकृष्ठ बियाणे विकणाऱ्या कंपनी व कृषी सेवा केंद्रावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडी तिवसा तालुक्याचे वतीने तालुका कृषी अधिकारी यांचेकडे करण्यात आली आहे.निवेदन सादर करतेवेळी वंचित बहुजन युवा आघाडी जिल्हा महासचिव सागर भवते, तालुका अध्यक्ष मनीष खरे, जिल्हा सदस्य प्रमोद मुंद्रे, विनोद खाकसे, राहूल पखाले, दिनेश कांबळे, अमर कांबळे, अभिषेक मनोहरे, प्रतीक कठाने सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शहानुर धरण प्रकल्पातून

करण्यासाठी आणि दुरुस्तीच्या अनुषंगाने 'मेन इनलेट व्हॉल्व्ह'ची दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. हे काम तांत्रिकदृष्ट्या गरजेचे असल्याने या कालावधीत प्रकल्पातून होणारा संपूर्ण पाणी पुरवठा बंद ठेवला जाईल.या तांत्रिक कामामुळे १५६ गावे व २ शहरे सामूहिक पाणी पुरवठा योजना बंद राहणार असून या संपूर्ण पाणी पुरवठा योजनांवर परिणाम होणार आहे. पाणी पुरवठा सलग तीन दिवस (११ जुलै ते १३ जुलै) बंद राहणार असल्याने, मजीप्रा प्रशासनाकडून ग्राहकांना आवाहन करण्यात आले आहे की नागरिकांनी आपल्या गरजेनुसार पाण्याचा साठा करून ठेवावा.उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व जपून वापर करावा. असे आवाहन मजीप्रा प्रशासनाकडून नागरिकांना करण्यात आले आहे.

### चांदूरबाजार खरेदी-विक्री संस्थेच्या

राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. त्यानुसार आज, दि. ८ जुलै रोजी निबंधक कार्यालय, चांदूरबाजार यांच्या वतीने अध्यक्षपदासाठी निवडणूक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

अध्यक्षपदासाठी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बबलू देशमुख यांच्या गटाकडून रावसाहेब लंगोटे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. इतर कोणताही अर्ज दाखल न झाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी रावसाहेब लंगोटे यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे अधिकृतपणे जाहीर केले.

चांदूरबाजार खरेदी-विक्री संस्थेवर यापूर्वीही बबलू देशमुख यांच्या गटाचे प्रभावी वर्चस्व राहिले आहे. रावसाहेब लंगोटे यांच्या निवडीमुळे हे वर्चस्व पुन्हा एकदा कायम राहिल्याचे राजकीय व सहकार क्षेत्रात बोलले जात आहे.

रावसाहेब लंगोटे यांच्या बिनविरोध निवडीनंतर समर्थकांनी आनंद व्यक्त करत त्यांचे अभिनंदन केले. तालुक्यातील विविध राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रातील मान्यवरांनीही त्यांना शुभेच्छा दिल्या असून त्यांच्या कार्यकाळात संस्था अधिक सक्षम होऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रभावीपणे कार्य करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे

यावेळी अरविंदराव लंगोटे,डॉ.रवींद्र वाघमारे, प्रतापराव किटुकले,सतीशराव गणोरकर,संचालक श्रीपादराव आसरकर,संजय गुर्जर,श्रीकृष्णराव वानखडे,राजेंद्रराव खापरे,वानखडे,पंकज सोनार,विलासराव शेकार,अनिता देशमुख,सुनिता काळे,तालुकाध्यक्ष किशोर देशमुख,भाई देशमुख,शिवाजीराव काळे,छोटुभाऊ देशमुख,सचिन धर्माळे,दादाराव पोहोकार,डॉ मुकुंद मोहोड ,रमन लंगोटे,सुरेश वैश्य,नंदुभाऊ देशमुख विजय राऊत,बाळासाहेब लंगोटे,पंडीत खेडकर, डॉ काशीकर,श्रीकांत लंगोटे,निलेश डांगे,योगेश ईसळ व सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### डॉ.मंगेश गोदावले नवे मनपा

करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रशासकीय फेरबदलामध्ये सर्वाधिक चर्चा मावळत्या आयुक्त वर्षा लड्डा यांच्या बदलीची होत आहे. वर्षा लड्डा यांनी अवघ्या तीन महिन्यांपूर्वी, म्हणजेच एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अमरावती महानगरपालिका आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारला होता. एवढ्या अल्प कार्यकाळात, म्हणजेच केवळ तीन महिन्यांतच त्यांची तडकाफडकी बदली करण्यात आल्यामुळे अमरावतीच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. या तडकाफडकी बदलीमागे नेमकी कोणती कारणे किंवा राजकीय समीकरणे आहेत, याबाबत आता मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. आयुक्त गेल्या काही दिवसापासून सुट्टीवर होत्या आणि अचानक त्यांच्या बदलीचे आदेश निघाले. यामुळे वेगवेगळ्या चर्चा रंगलेल्या आहेत.

### इन्स्टाग्रामवर हातात चाकू घेऊन

संदीप चव्हाण यांना मिळाली. सोशल मीडिया वरील या भाईगिरीची गंभीर दखल घेत त्यांनी तातडीने डी.बी. पथकाला कारवाईचे आदेश दिले. सहायक पोलिस निरीक्षक नितीन शिंदे आणि त्यांचे पथक पेट्रोलिंगवर असतानाच, तो संशयित तरुण मांडवा झोपडपट्टी, दसरा मैदान परिसरामध्ये फिरत असल्याची पक्की माहिती मिळाली.या वरून पोलिसांनी सापळा रचून संकेत उमेश वानखडे (वय २१, रा. दसरा मैदान, अमरावती) याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडून स्टीलचा धारदार चाकू जप्त करण्यात आला. सोशल मीडियावर फोटो टाकून लोकांमध्ये दहशत पसरवल्या प्रकरणी त्याच्या विरुद्ध आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त श्याम घुगे, सहाय्यक आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, नितीन शिंदे, मनीष करपे, पवन तिवारी, पंकज खंटे, रवी लिखितकर, शशी शेळके, अंकुश काळे, नरेश बावणे, प्रशांत बेलोरकर, अजून कदम, अमोल खंडेजोड, आकाश यादव, रफिक खान, यश ओगले यांनी केली.

### अचलपूर बसस्थानकातून लालपरीचा

निवेदन देऊन केली आहे. एक महिन्याच्या आत बससेवा सुरू न केल्यास भाजपाच्या वतीने चक्काजाम आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे. काही वर्षांपूर्वी अचलपूर येथे लाखो रुपये खर्च करून बसस्थानक बांधण्यात आले होते. मात्र सुरवातीपासून परतवाडा बसस्थानकातून निघणाऱ्या गाड्या या अचलपूर बसस्थानकात न नेता सरळ अमरावती, चांदूरबाजार तथा ग्रामीण भागातील इतर गावांमध्ये जात असल्याने या बस स्थानकाचा फायदा शहरवासीयांना पाहिजे त्या प्रमाणात झाला नाही. त्यामुळे लाखो रुपयांची इमारत धूळखात उभी होती, आता पुन्हा एकदा या बसस्थानकाची दुरुस्ती, रंगरंगोटी करण्यात आली आहे. मात्र अचलपूर बसस्थानकावरून अमरावती, चांदूरबाजार व ग्रामीण भागातील गावांमध्ये प्रवासाकरिता अद्यापपर्यंत इतर बसेस सुरू करण्यात आल्या नाहीत.अचलपूर शहराची लोकसंख्या जवळपास एक लाखाच्या घरात आहे. त्यामुळे बसस्थानक अतिशय आवश्यक झाले आहे. विशेष म्हणजे, सदर बसस्थानक सुरू करण्याकरिता याआधी आगारप्रमुख व जिल्हा अधीक्षक यांच्याकडे पत्रव्यवहार करण्यात आला. परंतु त्यावर आजपर्यंत कोणतीही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे आता एक महिन्याच्या आत अचलपूर बसस्थानकातून बसेस सुरू करण्यात आल्या नाही तर भारतीय जनता पक्ष तथा अचलपूर येथील इतर संघटनांकडून अमरावती-परतवाडा मार्गावर चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा भाजपा चे शहराध्यक्ष कुंदन यादव यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. त्यामुळे आता नव्याने रुजू झालेल्या परतवाडा आगाराचे आगारप्रमुख वासनिक काय निर्णय घेणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अल्पवयीन मुलीच्या आत्महत्या

हतबलतेचा गैरफायदा घेत तिला मानसिक कोंडीत पकडले. समाजात बदनामी होईल आणि वडिलांची इभ्रत जाईल, या भीतीपोटी ६ जुलै रोजी या निष्पाप मुलीने टोकाचे पाऊल उचलले. उपचारा दरम्यान तिचा मृत्यू झाला. नंतर कुटुंबाला सापडलेल्या सुसाईड नोटमध्ये तिने आपल्यावर झालेल्या अमानुषतेची आपबिती मांडत चौघांनाही कठोरात कठोर शिक्षा करण्याची आर्त हाक दिली आहे. यावरून शेंदुरजनाघाट पोलिसांनी ७ जुलै रोजी १७ वर्षीय प्रियकर, दोन मैत्रिणी आणि भूषण संजय घाटोले (वय १८) याच्याविरुद्ध बलात्कार, पोक्सो आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपी भूषणला पोलिसांनी तातडीने अटक केली आहे. मुलीच्या आईने या प्रकरणात अत्याचाराचा आरोप केला होता. या प्रकरणामुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती.

### राज्यभरात कोसळधारा, पुढील ४ दिवस

**ठाण्यात पावसाची जोरदार बॅटिंग-**ठाण्यात ऑरेंज अलर्ट दिल्याप्रमाणे सकाळपासून पावसाची जोरदार बॅटिंग बघायला मिळत आहे. मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी सखल भागात पावसाचे पाणी साचले होते. पण त्याचा निचरा लवकर झाल्याने दैनंदिन कामांवर त्याचा फारसा परिणाम झाला नाही. पावसामुळे पूर्व द्रुतगती मार्गावरील वाहतूक संथ गतीने सुरू आहे. मुंबईहून घोडबंदर रोड, कल्याण, नाशिक कडे जाणारी वाहतूक संथ गतीने आहे, याचाच आढावा घेतला आहे.भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार रायगड जिल्ह्यात पुढील तीन दिवस खबरदारीचे आहेत. रायगड जिल्ह्यासाठी २ ते ४ जुलैदरम्यान अतिमुसळधार ते अत्यंत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याने होणा-या मुसळधार पावसाने जिल्ह्यात नद्यानाल्यांना पूर, सखल भागात पाणी साचणे आणि घाटमाथ्यावर दरडी कोसळण्याचा धोका वाढण्याची शक्यता आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे. अरबी समुद्र खवळलेला राहण्याची शक्यता असल्याने मच्छीमारांनी पुढील आदेशापर्यंत समुद्रात जाउ नये असेही सांगण्यात आले आहे. दरम्यान शेतक-यांनी जनावरे सुरक्षित ठिकाणी हलवावीत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### नाशिक-त्र्यंबकेश्वरचा संपर्क

पाणी पोहोचले होते. पाण्याचे संकट टळले, मात्र पावसाने संकट निर्माण केले.नाशिक-त्र्यंबकेश्वररस्त्यावर पिंपळगाव बहुला येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे पुलाचे काम सुरू होते. नंदिनी नदीला पूर आल्याने हा पूल वाहून गेला. त्यामुळे नाशिक आणि त्र्यंबकेश्वर चा संपर्क तुटला. या रस्त्यावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे.नाशिक शहरात सिडको, सातपूर, पाथर्डी गाव, दाढेगाव या ठिकाणी पुराच्या पाण्याने दुरावस्था झाली. दिढेगाव आणि नाशिक शहराचाही संपर्क तुटला. अंबड लिंक रोड, गंगापूर रोड तसेच अनेक प्रमुख रस्ते पाण्याखाली गेले आहेत. या रस्त्यांची पावसाच्या पाण्याने दुरावस्था झाली. महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी शहरात पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पाहणी केली. महापौर हिमगौरी अडके तसेच उपमहापौर विलास शिंदे आणि स्थानिक नगरसेवकांनी ठिकठिकाणी पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. आपत्कालीन व्यवस्था सक्रिय करण्यात आली आहे. पोलिसांनी नागरिकांना व विशेषता गोदावरी नदी पात्र लगत राहणा-या नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला आहे.

### '१००० खोटारडे मेल्यानंतर

पत्र लिहून, १४ कारणे देत हा प्रकल्प करणे अशक्य असल्याचे सांगून फाईल बंद केली होती, असा मोठा खुलासा त्यांनी केला. या वादावर हसणा-या जयंत पाटील यांना रोखत, 'जयंतराव तुम्ही हसू नका', असा टोला त्यांनी लगावला. तब्बल १००० खोटारडे मेल्यानंतर हे आरोप करणारे जन्माला आले असतील, अशी घणाघाती टीका त्यांनी केली.

**कोकण रेल्वेचा दाखला** -या परिस्थितीची तुलना मुख्यमंत्र्यांनी कोकण रेल्वेच्या इतिहासाशी केली. जेव्हा मधू दंडवते यांनी हिंमत दाखवून कोकण रेल्वे सुरू केली, तेव्हाही सुरुवातीची १५ वर्षे पावसाळ्यात तिथे दरडी कोसळत होत्या. तेव्हा घाबरून काम थांबवले असते तर आज कोकण रेल्वे दिसली नसती. या घटनेतून आम्ही धडा घेतला असून, पाण्याचा प्रवाह आणि भूस्खलनाचा अभ्यास करण्यासाठी आयआयटी (क्ष्क्ष्ट्र) मधील तज्ज्ञांचा सल्ला घेतला जाणार आहे. पुढील वर्षी अशी कोणतीही दुर्घटना घडणार नाही, यासाठी कायमस्वरूपी तांत्रिक उपाययोजना केल्या जातील, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिलं.

### विधानभवनात शरद पवारांची

आजच्या बैठकीला देखील रोहित पवार अनुपस्थित राहिले.

**रोहित पवार बैठकीला अनुपस्थित-**राष्ट्रवादीतील पक्षाच्या वरिष्ठ नेत्याकडून कोणताही वेगळा निर्णय घेउ नका, सत्तेत सहभागी होण्याची योग्य वेळ आल्याचे संकेत बैठकीत देण्यात आले आहेत. या बैठकीनंतर रोहित पवार यांनी आज शरद पवारांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीला उपस्थित राहणं टाळलं. रोहित पवार यांनी बुधवारी सकाळी ट्विट करत माहिती दिली होती की आपण शरद पवार विधिमंडळात येणार असल्यामुळे शिक्षकांच्या आंदोलनाला उशिरा पोहचू. मात्र, ऐनवेळी शरद पवारांच्या उपस्थित पार पडलेल्या बैठकीला रोहित पवार उपस्थित राहिले नाही त्यांनी शिक्षकांच्या आंदोलनात उपस्थित राहण पसंद केलं.

### विधानसभेत पावसावरून

राज्यात पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून पूरपरिस्थितीमुळे राज्यातील जनता त्रस्त झाली आहे. त्यांना त्रास होत असल्याचे आमदार भास्कर जाधव यांनी स्पष्ट करीत याविषयावर चर्चा करण्याची मागणी लावून धरली.यावेळी याच मुद्द्यवरून सत्ताधारी व विरोधकानी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले. त्यामुळे सभागृहाचे कामकाज पाच मिनिटासाठी तहकूब करण्यात आले.

### मोदींची इंडोनेशियाच्या सर्वात

वडनगरमध्ये झाला, जिथे प्रसिद्ध हाटकेश्वर महादेव मंदिर आहे. गुजरातमध्ये माझ्यावर सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या विकासाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. काशी हे माझ्या राजकीय जीवनाचे कार्यक्षेत्र आहे, जिथे मला नेहमीच काशी विश्वनाथाचा आशीर्वाद लाभला आहे.

### राम मंदिरातील ३२ किलो

क्षेत्र ट्रस्टने सांगितले की, माजी महासचिव चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा आता ट्रस्टचे सदस्य राहिलेले नाहीत. सोमवारी झालेल्या बैठकीत त्यांचे राजीनामे स्वीकारण्यात आले. सध्या निवृत्त भारतीय वन सेवा (आयएफओएस) अधिकारी कृष्ण मोहन यांची अंतरिम महासचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष निमंत्रित सदस्यांच्या यादीतून गोपाल नगरकट्टे उर्फ गोपाल राव यांचे नाव हटविण्याचा निर्णय घेण्यात आला. अयोध्येतील राममंदिरातील देणगी चोरी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आठ आरोपींपैकी तिघांना स्थानिक न्यायालयाने एका दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, ९ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# 'निधी दर्यापूरच्या लेगसी वेस्टसाठी... खर्च लखमापूरच्या नव्या डेपोवर?'

## बायोमायनिंग प्रकरणाला नवे वळण; मंजुरी, ठिकाण आणि कचऱ्याच्या कालावधीवर गंभीर प्रश्न, प्रशासनासमोर उत्तरदायित्वाची कसोटी

■ ॲड. समीर ठाकूर ■

**अकोट :** अकोट नगर परिषदेच्या बायोमायनिंग प्रकरणातील प्रश्नांची मालिका दिवसेंदिवस अधिक गुंतागुंतीची होत असून, आता या प्रकरणाला एक नवे आणि तितकेच गंभीर वळण मिळाले आहे. यापूर्वी लेगसी वेस्टचे प्रमाण, आरडीएफ निर्मिती, ई-वे बिल, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अहवाल आणि तांत्रिक कागदपत्रांबाबत प्रश्न उपस्थित झाले होते. आता त्यात आणखी एका मूलभूत मुद्द्याची भर पडली आहे तो म्हणजे ज्या कचरा डेपोसाठी निधी मंजूर झाला होता, प्रत्यक्ष खर्च त्याच ठिकाणी झाला का? या गंभीर मुद्द्यामुळे नानाविध चर्चांना उधाण आले आहे.

### आता चौकशी कोणत्या मुद्द्यांवर व्हावी?

**या प्रकरणात स्वतंत्र आणि वस्तुनिष्ठ चौकशी झाल्यास खालील बाबींची पडताळणी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.**

- निधी मंजुरीचा मूळ प्रस्ताव आणि त्यातील कामाचे ठिकाण.
- दर्यापूर रोड डेपोवरील लेगसी वेस्टचे अधिकृत मोजमाप.
- लखमापूर डेपो सुरू होण्याची अधिकृत तारीख.
- प्रत्यक्ष बायोमायनिंग कोणत्या ठिकाणी करण्यात आले?
- निधी खर्चासंदर्भातील प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी.
- आरडीएफ निर्मिती, वाहतूक व विल्हेवाटीची कागदपत्रे.
- कामाचे मोजमाप, एम.बी., देयक मंजुरी आणि तृतीय पक्ष पडताळणी.



संग्रहित छायाचित्र

### २.०७ कोटींच्या प्रकल्पात आता 'मंजुरी कुठे, अंमलबजावणी कुठे?' असा नवा मुद्दा; लखमापूर येथे कचरा डेपो २०२५-२६ मध्ये सुरू झाल्याचा दावा, तर निधी २०२३-२४ मध्ये मंजूर झाल्याची चर्चा

नगर परिषद वर्तुळात दिवसभर या मुद्द्यावर जोरदार चर्चा रंगल्याची माहिती समोर येत आहे. उपलब्ध माहितीनुसार, बायोमायनिंगसाठी मंजूर झालेला सुमारे २.०७ कोटी रुपयांचा निधी २०२३-२४ या कालावधीत मंजूर झाला होता. मात्र, लखमापूर परिसरात नवीन कचरा डेपोचा वापर २०२५-२६ मध्ये सुरू झाला, असा दावा विविध स्तरांवर केला जात आहे. जर हा दावा वस्तुस्थितीशी सुसंगत असेल, तर कचरा जमा होण्यापूर्वीच त्या ठिकाणच्या बायोमायनिंगसाठी निधीचा वापर कसा झाला, हा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे. या संदर्भात प्रशासनाकडून अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नसल्याने नागरिकांमध्ये विविध चर्चा सुरू आहेत.

#### मंजुरी एका डेपोसाठी... अंमलबजावणी दुसऱ्या ठिकाणी?

विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित निधी हा मूळतः दर्यापूर रोडवरील जुन्या लेगसी वेस्ट डेपोच्या वैज्ञानिक निर्मूलनासाठी मंजूर झाल्याची चर्चा आहे. त्या ठिकाणी अनेक वर्षांपासून साचलेला कचरा हटविण्याच्या उद्देशाने हा प्रस्ताव तयार करण्यात आला होता, असे सांगितले जात आहे. मात्र, प्रत्यक्षात लखमापूर येथील नव्याने विकसित झालेल्या कचरा डेपोशी संबंधित कामांवर हा निधी वळता झाला का? हा प्रश्न आता चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. जर मंजुरी आदेश, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता आणि प्रत्यक्ष कामाचे ठिकाण यामध्ये विसंगती आढळली, तर त्याची वस्तुनिष्ठ पडताळणी होणे आवश्यक असल्याचे जाणकारांचे मत आहे.

#### लेगसी वेस्ट आणि नवीन कचरा यात मूलभूत फरक

घनकचरा व्यवस्थापनाच्या तज्ज्ञांच्या मते, बायोमायनिंग ही प्रक्रिया 'लेगसी वेस्ट'साठी विकसित करण्यात आली आहे. म्हणजे अनेक वर्षे साचलेल्या जुन्या कचऱ्याचे उत्खनन, वर्गीकरण आणि पर्यावरणपूरक विल्हेवाट.

नव्याने निर्माण होणारा दैनंदिन कचरा हा नियमित घनकचरा व्यवस्थापनाचा विषय असून, त्यासाठी वेगळी प्रक्रिया आणि नियोजन अपेक्षित असते. त्यामुळे, जर मंजुरी जुन्या लेगसी वेस्टसाठी असेल आणि प्रत्यक्ष काम नवीन कचऱ्यावर झाले असेल, तर त्या संदर्भातील प्रशासकीय आदेश, सुधारित मान्यता किंवा शासनाची परवानगी उपलब्ध आहे का, हा महत्त्वाचा मुद्दा ठरतो.

#### रस्ता नव्हता तर वाहतूक कशी झाली?

या प्रकरणातील आणखी एक चर्चेचा मुद्दा म्हणजे लखमापूर कचरा डेपोकडे जाणाऱ्या रस्त्याची स्थिती. स्थानिक पातळीवर अशी चर्चा आहे की, संबंधित काळात त्या मार्गावरील रस्ता अत्यंत खराब किंवा वाहतुकीस अनुकूल नव्हता. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर यंत्रसामग्री, ट्रॉमल मशीन, आरडीएफची वाहतूक किंवा इतर साहित्याची ने-आण नेमकी कशी झाली, याबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या संदर्भात वाहन नोंदी, वाहतूक परवानग्या, ई-वे बिल, जीपीएस ट्रॅकिंग किंवा इतर अधिकृत नोंदी उपलब्ध असल्यास प्रशासनाने त्या स्पष्ट कराव्यात, अशी मागणी व्यक्त होत आहे.

#### प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

या संपूर्ण प्रकरणात सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रशासनाची अधिकृत भूमिका. जर निधीचा वापर नियमानुसार आणि शासनाच्या मंजुरीनुसार झाला असेल, तर संबंधित आदेश, सुधारित मान्यता, मोजमाप पुस्तिका, देयक मंजुरी, तांत्रिक अहवाल आणि इतर कागदपत्रे सार्वजनिक केल्यास निर्माण झालेला संशय दूर होऊ शकतो. परंतु, सातत्याने वाढणाऱ्या प्रश्नांवर अधिकृत माहिती न दिल्यास नागरिकांच्या मनातील शंका अधिक बळावण्याची शक्यता नाकारता येत नाही.

#### पारदर्शकतेनेच संपेल वाद

सार्वजनिक निधीच्या प्रत्येक रुपयाचा हिशोब देणे ही स्थानिक स्वराज्य संस्थांची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे या प्रकरणात कोणतेही निष्कर्ष काढण्यापूर्वी सर्व संबंधित कागदपत्रे, मंजुरी आदेश आणि तांत्रिक नोंदी सार्वजनिक केल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते. अन्यथा, संशय, चर्चा आणि आरोप-प्रत्यारोपांचे वातावरण कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

(**कायदेशीर सूचना :** या वृत्तातील काही मुद्दे उपलब्ध माहिती, स्थानिक चर्चांमधून समोर आलेले दावे, तसेच विश्वसनीय सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार मांडले आहेत. संबंधित प्रशासन, कंत्राटदार किंवा इतर संबंधितांची अधिकृत भूमिका स्वतंत्रपणे प्राप्त झालेली नाही. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेवर अनियमिततेचा अंतिम निष्कर्ष काढण्याचा हेतू नसून, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने उपस्थित झालेल्या प्रश्नांची मांडणी करण्यात आली आहे. संबंधितांचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यास तेही प्रसिद्ध करण्यात येईल.)

---

## अनुपम वैद्य यांचे बी ए एम एस मध्ये घवघवीत यश



■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथील ज्येष्ठ पत्रकार नंदकिशोर वैद्य यांचा मुलगा अनुपम वैद्य यांनी बेंगलुरु कर्नाटक येथील राजीव गांधी विश्वविद्यालय ऑफ हेल्थ सायन्स विद्यापीठातून बी ए एम एस ची पदवी प्राप्त केली आहे.बिदर कर्नाटक येथील अक्का महादेवी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज येथून बी ए एम एस चे शिक्षण पूर्ण केले. अनुपम वैद्य यांच्य याच्यामुळे वाशिम जिल्ह्याचा गौरव वाढला आहे. डॉ. अनुपम वैद्य हे. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना चे डी एम ओ डॉक्टर अनुराग वैद्य यांचे लहान बंधू आहे. ज्येष्ठ पत्रकार नंदकिशोर वैद्य यांची दोन्ही मुले यांनी शिक्षण क्षेत्रात भरारी घेऊन डॉक्टर पदवी प्राप्त करून परिवार व जिल्ह्याचे नावलौकिक केले आहे.

## बेलवृक्षाचे मंदिर परिसरात करण्यात आले रोपण



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील विठोली येथील पुरातन शिवपार्वती मंदिर परिसरात वन विभागाच्या वतीने बेलवृक्षाचे रोपण करण्यात आले. मंदिरामध्ये पूजेसाठी येणाऱ्या श्रद्धाळू भाविकांना बेलपत्रे सहज उपलब्ध व्हावीत, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.

श्रावण महिना तोंडावर आला असून या महिन्यात महादेवाच्या पिंडीवर बेलपत्र वाहण्याचे विशेष महत्त्व आहे. मात्र अनेकदा मंदिर परिसरात बेलाचे झाड नसल्याने भाविकांना बेलपत्रांसाठी वणवण करावी लागते. हीच अडचण लक्षात घेऊन वनपाल विजय चतुरकर यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या हस्ते मंदिराच्या मोकळ्या जागेत बेलाच्या रोपासह जांभूळ वृक्षाच्या रैपाची सुद्धा लागवड करण्यात आली. यावेळी पुजारी माणिक पाटील, राजू आडे निखिल चव्हाण आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना वनपाल विजय चतुरकर म्हणाले, 'बेलवृक्ष हा धार्मिकदृष्ट्या पवित्र मानला जातो. मंदिर परिसरातच बेलाचे झाड असल्यास भाविकांची सोय होते. शिवाय वृक्षारोपणामुळे पर्यावरणाचेही संवर्धन होते. प्रत्येक धार्मिक स्थळी अशी देशी, औषधी व धार्मिक महत्त्व असलेली झाडे लावली पाहिजेत. वृक्षवल्ली आम्हा सोयरे, हा संत तुकारामांचा संदेश आपण कृतीतून जगला पाहिजे.' वन विभागाने घेतलेल्या या पुढाकाराचे विठोली ग्रामस्थांनी स्वागत केले आहे. 'मंदिरात बेलाचे झाड नव्हते. आता श्रावणात व महाशिवरात्रीला गावातील व पंचक्रोशीतील भाविकांना बेलपत्रासाठी अन्यत्र जावे लागणार नाही,' अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. यावेळी झाडाच्या संगोपनाची जबाबदारी ग्रामस्थांनी घेतली.

## नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रेरण कार्यक्रम उत्साहात



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील वनोजा येथील ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्थेद्वारे संचलित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयात बी.ए. भाग-१ व बी.कॉम. भाग-१ च्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रेरण (इंडक्शन) कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानगंगा सभागृहात करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख डॉ. गजानन घोंगटे होते. प्रमुख अतिथी म्हणून आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. जयाप्रभा भगत, प्रा. डॉ. ममता पाथ्रीकर, प्रा. दीपक भगत, डॉ. सुनील बोरचाटे, प्रा. बापूराव डोंगरे, प्रा. रवि कुटे तसेच डॉ. जय कावरे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

## मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का प्रशासन?

**इशारे, निवेदने आणि बातम्यांनंतरही कारवाई नाही**



■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील केनवड-कोयाळी हा महत्त्वाचा मार्ग सध्या अत्यंत धोकादायक बनला असून, एका बाजूला महावितरणच्या लोंबकळणाऱ्या विद्युत तारा तर दुसऱ्या बाजूला रस्त्याच्या कडेला पडलेला मोठा खच यामुळे प्रवाशांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे हा मार्ग आता वाहतुकीचा नसून 'मृत्यूचा सापळा' बनल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे.

या मार्गावरून दररोज शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, रुग्ण तसेच शेकडो नागरिकांची ये-जा सुरू असते. श्री शिवाजी विद्यालय, केनवड येथे शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थिनींना मानव विकास मिशनच्या बससेवेने याच मार्गावरून प्रवास करावा लागतो. खचलेल्या रस्त्यामुळे बसचालकाला अत्यंत सावधगिरीने वाहन चालवावे लागत असून, विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेबाबत पालकांमध्ये मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.

या गंभीर समस्येबाबत महावितरण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी अनेकदा संपर्क साधण्यात आला. मात्र, 'ठेकेदाराला सूचना दिल्या असून काम लवकरच सुरू होईल,' असे आश्वासन देण्यात आले. प्रत्यक्षात पाच दिवसांहून अधिक कालावधी उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

यापूर्वीही या धोकादायक परिस्थितीबाबत विविध वृत्तपत्रांतून वारंवार बातम्या प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. संबंधित विभागांना निवेदने देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली होती. तरीदेखील प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी या समस्येकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. सध्या पावसाळ्यामुळे रस्त्याचा आणखी खच होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर लोंबकळणाऱ्या विद्युत तारांमुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने एखाद्या दुर्घटनेची वाट न पाहता तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे.

## जे. डी. चवरे विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत राखली यशाची परंपरा



■ प्रतिनिधी | कारंजा ■

फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत स्थानिक जे. डी. चवरे विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत अनुराग नागरे, नोमनउल्ला खान व कु. शर्वरी पाटील यांनी यश मिळविले. तर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत वीर बुटेकर, कु. यशदा मसाळकर, ऋतुराज सुरजुसे, समर्थ जमाले, मानस डाखोरे, विराट डावरे, कु. साक्षी लाड, प्रथमेश सुरळकर व कु. स्नेहल पाडेन यांनी यशस्वी कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.


### जाहिर नोटीस

मी विनोदकुमार राधेश्याम सावना रा. कारंजा (लाड), जि. वाशिम सर्वत्र आम जनतेस जाहिररित्या कळवितो मी १) अविनाश पांडूरंग सवळकर व सौ. करुणा अविनाश सवळकर रा.कामवाडा ता. कारंजा (लाड), जि.वाशिम यांचे सोबत कसबे कारंजा ता. कारंजा जि. वाशिम येथील नझुल शीट नं.१८ बी प्लॉट नं.३५/१ व नझुल शीट नं.१९ ए व प्लॉट नं.३/२-४-१/७/१ व ऑनलाईन आखिव पत्रिकेनुसार नगर भूमापन क्रं. ३५/१३/२४/१७/१,२८ शिट नंबर १८ बी १९ ए प्लॉट नं.३५/१३/२४/१७/१/१,२८ ची जागा व त्यावर असलेले सिल्वर टॉवरमधील तळमजल्यावरील त्यांचे मालकिचे व ताब्यातील गोडावून. २८ क्षेत्रफळ १७६.१२ चौ.मिटर विकत घेण्याचा करारनामा दि. २७.०२.२०१६ रोजी नोटरी केलेला आहे.

मात्र उपरोक्त व्यक्ती हे सदर गोडावून अवैधपणे त्रयस्थ व्यक्तीस परस्पर विकण्याच्या बेतात आहे. सदर गोडावून विकत घेण्याचा अधिकृत करारनामा त्यांनी माझे सोबत केलेला असल्याने उपरोक्त व्यक्तींना त्रयस्थ व्यक्तीस सदर मालमत्ता विकण्याचा किंवा कोणत्याही प्रकारचा करार करण्याचा अधिकार नाही. तरी सदर उपरोक्त मालमत्तेचा माझे उपरोक्ष परस्पर कोणताही ईसार/ करारनामा/सौदे चिठ्ठी/ ताबा पावती विक्री काहीही केल्यास ती माझेवर बंधकारक राहनार नाही. परस्पर तसा करार केल्यास त्यापासून उदभवणाऱ्या न्यायालयिन कार्यवाहीस खर्चाच परिणाम करार करनारा ईसम व्यक्ती संस्था जबाबदार राहिल राहतील. याची नोंद घ्यावी.

दि.०७.०७.२०१६

**विनोदकुमार राधेश्याम सावना**
रा. कान्नव बंगल्याजवळ कारंजा (लाड) जि.वाशिम



### पाहिजेत

**ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा व्दारा संचालित,**
**श्रीमती साळुंकाबाई राउत कनिष्ठ महाविद्यालय वनोजा ता. मंगरूळपीर जि. वाशिम**

उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम विभागाकरीता खालील विषयाची पदे घडयाळी तासीका तत्वावर शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता भरणे आहे.

**उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम विभाग**

| अ. क्र. | विषय | शैक्षणिक पात्रता | श्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मराठी | एम. ए. मराठी बी. एड. | व्दितीय | ०१ |
| २ | इंग्रजी | एम. ए. इंग्रजी बी. एड. | व्दितीय | ०१ |
| ३ | पायाभूत अभ्यासक्रम | एम.बी.ए. | व्दितीय | ०१ |
| ४ | पिकशास्त्र | एम. एस. सी. ( ॲग्री ) | व्दितीय | ०१ |
| ५ | पर्यावरण | एम.एस.सी पर्यावरण शास्त्र विषयासह | व्दितीय | ०१ |
| ६ | शारीरिक शिक्षण | बी.पी.एड / एम.पी.एड | व्दितीय | ०१ |

**कनिष्ठ महाविद्यालय विभाग**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ईतिहास | एम.ए. इतिहास बी.एड. | व्दितीय | ०१ |
| २ | समाजशास्त्र | एम.ए. समाजशास्त्र बी.एड. | व्दितीय | ०१ |
| ३ | वणिज्य संघटन व व्यवस्थापन | एम. कॉम. बी.एड. | व्दितीय | ०१ |
| ४ | शारीरिक शिक्षण | बी.पी.एड / एम.पी.एड | व्दितीय | ०१ |

पात्रता धारक उमेदवाराने मुळ कागदपत्रासह मंगळवार दिनांक १४/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वखर्चाने अर्जासह प्रत्यक्ष मुलाखती करीता महाविद्यालयात उपस्थित रहावे.

**अध्यक्ष / प्राचार्य**
श्रीमती साळुंकाबाई राउत कनिष्ठ महाविद्यालय वनोजा


## कारंजा शहर पोलिसांची मोठी कारवाई

## एम.डी. अमली पदार्थासह दोघांना अटक; १.९३ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | कारंजा ■

अमली पदार्थांच्या विक्रीविरोधात कारंजा शहर पोलिसांनी मोठी कारवाई करत आय.बी. टॉवर परिसरातून एम.डी. (मेफेड्रोन) या अमली पदार्थासह दोन आरोपींना रंगेहात अटक केली. या कारवाईत ७.४२ ग्रॅम एम.डी. अमली पदार्थ, एक मोटारसायकल, तीन मोबाईल फोन व रोख रक्कम असा एकूण १ लाख ९३ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणातील आणखी एका आरोपीचा शोध सुरू असून त्याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



कारंजा शहर पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, सावरकर चौकाजवळील आय.बी. टॉवर परिसरात दोन युवक एम.डी. अमली पदार्थ विक्रीसाठी ग्राहकांची वाट पाहत उभे आहेत. या माहितीची खात्री करून वरिष्ठांच्या आदेशानुसार पोलिसांनी तात्काळ सापळा रचला. पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचताच संशयितांनी पोलिसांना पाहून मोटारसायकल सोडून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तत्परतेने पाठलाग करून दोघांनाही ताब्यात घेतले.

पोलिसांनी दोघांची पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून एम.डी. (मेफेड्रोन) हा अमली पदार्थ आढळून आला. इलेक्ट्रॉनिक काट्यावर वजन केल्यानंतर त्याचे वजन ७.४२ ग्रॅम भरले. जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थाची किंमत २२ हजार ३३० रुपये असल्याचे निष्पन्न झाले.

या कारवाईत आरोपींकडून एमएच-३७ एएम-०३२६ क्रमांकाची मोटारसायकल (अंदाजे किंमत १ लाख रुपये), तीन मोबाईल फोन (अंदाजे किंमत ७० हजार रुपये) तसेच ९२० रुपये रोख असा एकूण १ लाख ९३ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत (१) शेख सुफी शेख लाल (वय १९ वर्षे), रा. शेलू (बाजार), ता. मंगरुळपीर, जि. वाशिम, सध्या मुक्काम आनंद नगर, कारंजा. (२) शेख सोहेल शेख रेहमान खान (वय २५ वर्षे), रा. भारतीपुरा, कारंजा (लाड), जि. वाशिम.

चौकशीदरम्यान आरोपींनी हा अमली पदार्थ आणण्यासाठी त्यांचा साथीदार मोहम्मद शरीफ मोहम्मद हनीफ (वय ३१ वर्षे), रा. भारतीपुरा, कारंजा (लाड), जि. वाशिम हा मुंब्रा, मुंबई येथे गेला असल्याची माहिती पोलिसांना दिली. त्यानुसार त्याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध सुरू आहे.

या तिन्ही आरोपींविरुद्ध एन.डी.पी.एस. अधिनियम, १९८५ अंतर्गत कलम ८(क), २२(ब) व २९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आलेल्या आरोपींना पोलिस कोठडीत घेण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. निकेश खाटमोडे पाटील, अपर पोलीस अधीक्षक सौ. लता फड, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत पोलीस निरीक्षक अमर चोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक जयदीप पवार, पोलीस उपनिरीक्षक विशाल बोरकर, पोलीस हवालदार गणेश जाधव, मयुरेश तिवारी, अजय धनकर, उमेशकुमार बिबेकर, अनिस निमसु रवाले, अमित भगत, मोहम्मद परसुवाले, आकाश खंडारे आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल पौर्णिमा मोटे यांनी सहभाग घेतला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गजानन पत्रे पोरे करीत आहेत.

कारंजा शहर पोलिसांच्या या कारवाईमुळे अमली पदार्थांच्या अवैध व्यापारात गुंतलेल्या घटकांमध्ये खळबळ उडाली असून, अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २२२ ■ गुरुवार, ९ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## ताडपत्रीच्या आड चिमुकल्यांचा जीव धोक्यात
## जीर्ण खासगी शाळेकडे शिक्षण विभागाची डोळेझाक



**-कवेलूंच्या मोडकळीस आलेल्या छताखाली नर्सरीच्या विद्यार्थ्यांचे वर्ग; कारंज्यात पालकांमध्ये संताप, तातडीच्या कारवाईची मागणी**

**कारंजा जनमाध्यम :** कारंजा शहरातील ग्रामीण रुग्णालयालगत असलेल्या एका खासगी शाळेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी गंभीर तडजोड होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. जीर्ण झालेल्या कवेलूंच्या छतावर केवळ ताडपत्री टाकून नर्सरी व प्राथमिक वर्गातील चिमुकल्यांचे वर्ग सुरू ठेवण्यात येत असल्याने पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

माहितीनुसार, शाळेची इमारत अत्यंत जीर्ण झाली असून कवेलूंचे छत कमकुवत झाले आहे. पावसाचे पाणी गळू नये आणि कवेलू कोसळू नयेत म्हणून संपूर्ण छतावर ताडपत्री टाकण्यात आली आहे. मात्र, ही केवळ तात्पुरती मलमपट्टी असून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ केला जात असल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

पावसाळ्याच्या काळात अशा धोकादायक इमारतीत नर्सरीतील चिमुकल्यांना बसवून शिक्षण सुरू ठेवणे ही गंभीर निष्काळजीपणाची बाब असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शाळेची कायमस्वरूपी दुरुस्ती न करता तात्पुरत्या उपाययोजनांवर भर दिल्याने शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

पालकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत, 'आमची मुले ज्या इमारतीत शिकतात ती कधीही कोसळू शकते. ताडपत्री टाकून सुरक्षिततेचा केवळ दिखावा केला जात आहे. एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार असा प्रश्न उपस्थित केला.

शाळांच्या इमारतींच्या सुरक्षिततेबाबत कठोर नियम असतानाही संबंधित शाळेची पाहणी किंवा कारवाई का होत नाही, याबाबत शिक्षण विभागाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत शिक्षण विभागाने तातडीने शाळेची पाहणी करून इमारत सुरक्षित होईपर्यंत वर्ग पर्यायी ठिकाणी हलवावेत किंवा शाळा तात्पुरती बंद करावी, अशी जोरदार मागणी पालक व नागरिकांकडून केली जात आहे.

# वर्ध्यात २२.३७ लाखांचा गांजा जप्त

## मुख्य सूत्रधारांसह सात जणांवर एनडीपीएस अंतर्गत गुन्हा

### किया सेल्टोस कारसह चौघे जेरबंद



**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत २१ किलो ४८८ ग्रॅम गांजा जप्त केला. या कारवाईत किया सेल्टोस कारसह एकूण २२ लाख ३७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, चौघांना रंगेहात अटक करण्यात आली आहे. मुख्य सूत्रधारांसह सात जणांविरुद्ध वर्धा शहर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या अंमली पदार्थविरोधातील विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेला नागपूर-वर्धा मार्गावरील ग्रामपंचायत नालवाडीसमोर एका पांढऱ्या रंगाच्या किया सेल्टोस कारमधून गांजाची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून कारची तपासणी केली असता २१ किलो ४८८ ग्रॅम गांजा आढळून आला.

या प्रकरणात अमिर नसिब खान पठाण (३०), सूरज राजू चव्हाण (२०), कल्याणी प्रकाश निकोसे (१८) आणि उत्कर्षा ज्ञानेश्वर किरणाके (१९) यांना अटक करण्यात आली. चौकशीत मुख्य आरोपी अमिर पठाण हा तौसिफ बेग व 'छन्ना' या टोपणनावाने ओळखल्या जाणाऱ्या साथीदारांसह गांजाची विक्री करत असल्याची माहिती समोर आली. तसेच अटक करण्यात आलेले तिघे जण मासिक वेतनावर गांजाची वाहतूक करत असल्याचेही उघड झाले. हा गांजा ओडिशातील काटापंजी येथील मदन सा नावाच्या व्यक्तीकडून आणल्याची कबुली आरोपींनी दिली.

पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून गांजा, किया सेल्टोस कार आणि अन्य साहित्य असा २२.३७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे जिल्ह्यातील अंमली पदार्थांच्या रॅकेटला मोठा धक्का बसला असून, फरार आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

# रेती माफियांना एलसीबीचा दणका १.३१ कोटींचा मुद्देमाल जप्त

## येळाकेळी येथे नाकाबंदीत तीन अवजड वाहने पकडली



**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील अवैध रेती वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत येळाकेळी परिसरातून चोरीच्या रेतीने भरलेली तीन अवजड वाहने जप्त केली. या कारवाईत रेतीसह तीन वाहनांचा मिळून १ कोटी ३१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून वाहन चालक व मालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध रेती वाहतुकीची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने येळाकेळी परिसरात 'वेट अॅण्ड वॉच' करून नाकाबंदी केली. दरम्यान, एमएच-४०-सीटी-९९९१, एमएच-२७-डीटी-२०६० आणि एमएच-४०-सीटी-००२२ ही तीन अवजड वाहने अडवून तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात रेती आढळून आली. चौकशीत ही रेती चोरीची असल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी तिन्ही वाहने आणि रेती असा एकूण १.३१ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईत पोलिस उपनिरीक्षक सिनुकुमार बानोत यांच्यासह नरेंद्र पाराशर, मिथुन जिचकार, दीपक साठे आणि प्रफुल पुनवटकर यांनी सहभाग घेतला.

पोलिसांच्या चौकशीत दोन वाहनांमधील रेती जुनगाव (जि. चंद्रपूर) येथून, तर एका वाहनातील रेती वैरागड (ता. आरमोरी, जि. गडचिरोली) येथून आणल्याची कबुली चालकांनी दिली. या प्रकरणी फैजान खान वसिम खान, विशाल साबळे, राजेश डाबेराव, शुभम रॉय, अकबर शेख आणि शोहेब खान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## हिंदी विद्यापीठात विद्यार्थ्यांचा बेमुदत सत्याग्रह
## शैक्षणिक मागण्यांसाठी प्रशासकीय भवनासमोर ठिय्या



**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील विद्यार्थी आणि संशोधकांनी विविध शैक्षणिक मागण्यांसाठी बुधवारपासून प्रशासकीय भवनासमोर बेमुदत सत्याग्रह आंदोलन सुरू केले आहे. हे आंदोलन कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून ते विद्यापीठातील शैक्षणिक व्यवस्था, संशोधन संस्कृती आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर आधारित असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांनी सन २०२२ पासून बंद असलेली पीएचडी प्रवेश प्रक्रिया तातडीने सुरू करण्याची प्रमुख मागणी केली आहे. तसेच स्त्री अध्ययन विभाग आणि चित्रपट अध्ययन विभाग वर्धा मुख्य परिसरात पूर्ववत सुरू करावेत, यापूर्वी बंद करण्यात आलेले डिप्लोमा व प्रमाणपत्र अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून पुन्हा सुरू करण्यात यावेत, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली आहे. या मागण्यांसंदर्भात विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाला निवेदन सादर केले असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. मात्र, या आंदोलनाबाबत विद्यापीठ प्रशासनाने अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून, मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

## कोल्हापुरी बंधाऱ्याचे गेट न उघडल्याने शेतकरी संतप्त
### तहसील कार्यालयावर धडक, आंदोलनाचा इशारा



**आष्टी शहीद जनमाध्यम :** साहूर (बोरखेडी) येथील कोल्हापुरी बंधाऱ्याचे गेट वेळेवर न उघडल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांसमोर गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. २ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसानंतर बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. मात्र संबंधित विभागाने गेट वेळेत न उघडल्याने बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूंना पाणी साचून शेतकऱ्यांचा शेतात जाण्याचा मार्ग पूर्णपणे बंद झाला आहे. त्यामुळे शेतीची मशागत, पेरणी आणि इतर कृषी कामे ठप्प झाली असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.

या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सरपंच संघटनेचे आष्टी तालुका अध्यक्ष अंकित कावळे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयात धडक देत नायब तहसीलदार बाळस्कर यांना निवेदन दिले. बंधाऱ्याचे गेट तातडीने उघडून पाण्याचा निचरा करावा, शेतात जाण्यासाठी मार्ग उपलब्ध करून द्यावा आणि भविष्यात अशी परिस्थिती टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. यावेळी संबंधित अधिकारी ससाणे यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधण्यात आला. मात्र त्यांनी समाधानकारक प्रतिसाद न दिल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास सरपंच संघटनेचे आष्टी तालुका अध्यक्ष अंकित कावळे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. निवेदनावेळी अनिकेत वरकड, देवानंद वरकड, मनोज टरके, भूषण घारे, गजानन वरकड यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# लॉजच्या आड देहविक्रीचा गोरखधंदा उघड

## आर्वीत पोलिसांची धाड; लॉज मालकाविरुद्ध गुन्हा दाखल



**आर्वी जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील सावंगी (मेघे) व पिपरी (मेघे) येथील देहविक्री अड्ड्यांवरील कारवाईनंतर आता आर्वी शहरातही अशाच प्रकारचा गोरखधंदा उघडकीस आला आहे. बसस्थानक परिसरातील एका लॉजमध्ये देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून धाड टाकली. या प्रकरणी लॉज मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना पुरुषोत्तम लॉजमध्ये देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहक लॉजमध्ये पाठविला. त्यानंतर छापा टाकला असता रूम क्रमांक २०८ मध्ये संबंधित महिला आणि बनावट ग्राहक आढळून आले. महिला पोलिस कर्मचाऱ्यांनी संबंधित महिलेला ताब्यात घेतले.

चौकशीत लॉजचा मालक पुरुषोत्तम मोहनदास रावलानी हा संबंधित महिलेला लॉजमध्ये बोलावून तिच्याकडून देहविक्रीचा व्यवसाय करून घेत असल्याचे निष्पन्न झाले. त्याबदल्यात ग्राहकांकडून पैसे घेऊन आर्थिक लाभ मिळवत असल्याची माहितीही समोर आली.

पोलिसांनी पंचनामा करून घटनास्थळावरून रोख रक्कम व इतर साहित्य जप्त केले. तसेच १ जून ते ७ जुलै २०२६ या कालावधीत लॉजमध्ये आलेल्या व्यक्तींची नोंद असलेले रजिस्टरही तपासणीसाठी जप्त करण्यात आले.

संबंधित महिलेला सुरक्षितपणे तिच्या घरी रवाना करण्यात आले असून, आर्थिक फायद्यासाठी देहविक्रीचा व्यवसाय चालविल्याप्रकरणी लॉज मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे आर्वी शहरात खळबळ उडाली असून, अशा अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

## स्वच्छ भारत'चा वडनेरमध्ये फज्जा! कचऱ्याचे ढीग, साचलेले पाणी; रोगराईच्या उंबरठ्यावर गाव

### मस्जिद चौक ते बसस्टॉपपर्यंत अस्वच्छतेचे साम्राज्य; ग्रामपंचायतीच्या निष्क्रियतेवर नागरिकांचा संताप



**वडनेर जनमाध्यम :** देशभरात 'स्वच्छ भारत अभियान राबवले जात असल्याचा दावा केला जात असला, तरी हिंगणघाट तालुक्यातील वडनेर गावात या अभियानाची अक्षरशः पोलखोल झाली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गावात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी तुंबल्याने अस्वच्छतेचे गंभीर चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रोसारख्या साथीच्या आजारांचा धोका वाढला असून ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

गावातील मस्जिद चौक, बाजार चौक, बसस्टॉप, जुनी जनता शाळा परिसर तसेच अनेक गल्लीबोळांमध्ये कचऱ्याचे ढीग साचले आहेत. पावसामुळे हा कचरा कुजून दुर्गंधी पसरत असून डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, गावातील अंतर्गत रस्त्यांचीही दयनीय अवस्था झाली आहे. ठिकठिकाणी पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमध्ये पाणी साचून डबकी तयार झाली आहेत. या साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती होत असल्याने रोगराई पसरण्याचा धोका अधिक वाढला आहे.

ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीने तातडीने विशेष स्वच्छता मोहीम राबवून कचरा उचलावा, नाले स्वच्छ करावेत आणि खड्डे बुजवावेत, अशी मागणी केली आहे. तसेच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचीही मागणी जोर धरत आहे. स्वच्छ भारत अभियानाची केवळ जाहिरात नव्हे, तर प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार असा प्रश्न आता वडनेरकर विचारत असून, प्रशासन एखाद्या साथीच्या आजाराची वाट पाहत आहे का, असा प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## दुर्मिळ त्वचारोगाशी यशस्वी झुंज ; सावंगी रुग्णालयाने वाचविले ७८ वर्षीय महिलेचे प्राण

### महिलेवर बुलस पेम्फिगॉइडचे यशस्वी उपचार



**वर्धा जनमाध्यम :** आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय (एव्हीबीआरएच) येथील त्वचारोग विभागाने गंभीर बुलस पेम्फिगॉइड या दुर्मिळ व जीवघेण्या ठरू शकणाऱ्या ऑटोइम्यून त्वचारोगाने ग्रस्त ७८ वर्षीय महिलेवर यशस्वी उपचार करून तिला नवजीवन दिले आहे.

रुग्णाच्या संपूर्ण शरीरावर द्रवाने भरलेले मोठे फोड आणि वेदनादायक जखमा निर्माण झाल्याने तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्वचारोग विभागातील तज्ज्ञांनी आजाराचे अचूक निदान करून औषधोपचार सुरू केले. त्याचबरोबर जखमांची विशेष काळजी घेत रुग्णाच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात आले.

उपचारादरम्यान मेडिसिन विभागानेही महत्त्वाची भूमिका बजावत रुग्णाची शारीरिक स्थिती, चयापचयाशी संबंधित समस्या आणि इतर आरोग्य निर्देशांकांवर नियमित देखरेख ठेवली. विविध विभागांच्या समन्वित प्रयत्नांमुळे रुग्णाच्या शरीरावरील फोड हळूहळू कमी झाले, जखमांवर नवीन त्वचा तयार होऊ लागली आणि प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली. सध्या संबंधित तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली तिच्यावर पुढील उपचार सुरू आहेत.

## मतदार यादी विशेष पुनर्निरीक्षण (SIR) कार्यक्रमात बाजी

**वर्धा जनमाध्यम :** निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमात (एँईं) वर्धा जिल्ह्याने एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. कारंजा तालुक्यातील ढगा हे गाव विदर्भातील एसआयआरचे १०० टक्के काम पूर्ण करणारे पहिले गाव ठरले आहे. या यशाने संपूर्ण जिल्ह्यात एसआयआर कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आणि सततच्या पाठपुराव्यामुळे हे यश संपादन करणे शक्य झाले. प्रशासकीय पातळीवर या मोहिमेचे नियोजन आणि अंमलबजावणी अत्यंत प्रभावीपणे करण्यात आली. या मोहिमेच्या यशात संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे ठरले आहे. एसआयआर कार्यक्रमासाठी आर्वीचे उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट, कारंजाचे परीविक्षाधिन उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विनायक पाटील, कारंजाचे तहसीलदार अनिल निनावे, ढगाचे मंडळ अधिकारी, तलाठी विशेषतः मतदान केंद्रस्तरीय अधिकारी शकील शेख यांनी अतिशय परिश्रम घेत मतदारांपर्यंत पोहोचून हे काम १०० टक्के पूर्ण केले आहे.

लोकशाही बळकटीकरणाच्या दृष्टीने मतदार यादीची शुद्धता आणि अद्ययावतीकरण अत्यंत महत्त्वाचे असते. ढगा गावाने दाखवून दिलेल्या या आदर्शवत कामामुळे इतर गावांसाठी एक नवी प्रेरणा मिळाली आहे. जिल्हा प्रशासनाने या यशाबद्दल ढगा गावच्या ग्रामस्थांचे आणि या मोहिमेत सहभागी असलेल्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.


### नावात बदल

माझे पूर्वी **RUKHSANA BEGUM SHAIKH KAMAL** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **RUKHSANA RAJJAK SHEIKH** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-** रुंदावन नगर म्हसळा ता वर्धा जिल्हा वर्धा ४४२००१

### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर W2281543 वरील माझे **KABIR ASHIKALI SATTAYANI** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **KABIR ASHIKALI SATTYANI** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-** जिजामाता शाळे जवळ एसबीआय कॉलनी नालवाडी वर्धा ४४२००१

### ग्रामपंचायत सावंगी (हे)
### तालुका हिंगणघाट, जिल्हा वर्धा
### पेपर निविदा सूचना क्र.१ सन २०२६-२७

**ग्रामपंचायत सावंगी (हे) वतीने खालील कामाची पत्र प्राकलन दराने ब-१ फॉर्ममध्ये नोंदणीकृत असलेले ठेकेदार जे पूर्व अर्हता अटी पूर्ण करतील अशा कंत्राटदारांकडून पेपर-निविदा मागविण्यात येत आहे.**

(१) १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६
कामाचे नांव - **मौजा सावंगी (हे.) येथे नाली खोदकाम व आरसीसी पाईप टाकणे**
प्राकलन किंमत - **रु.१३००००/-** टी.एस.क्र.**२०३**
निविदा शुल्क **१०००/-** अनामत रक्कम **१३००/-**

(२) १५ वा वित्त आयोग सन २०२४-२५
कामाचे नांव - **मौजा सावंगी (हे.) येथे सिमेंट नाली बांधकाम**
प्राकलन किंमत - **रु.९००००/-** टी.एस.क्र.**२०२**
निविदा शुल्क - **१०००/-** अनामत रक्कम **९००/-**

(३) १५ वा वित्त आयोग सन २०२४-२५
कामाचे नांव - **सावंगी (हे.) येथे सिमेंट नाली बांधकाम**
प्राकलन किंमत - **रु.९८०००/-** टी.एस.क्र.**५००**
निविदा शुल्क - **१०००/-** अनामत रक्कम **९८०/-**

निविदा प्रसिध्दी दिनांक **०९/०७/२०२६ ते २०/०७/२०२६ सायं.५.०० वा.**

निविदा उघडण्याची दिनांक **२१/०७/२०२६ स.११.०० वाजता**

निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर पाहता येईल.

स्वा/-
सरपंच
ग्रामपंचायत सावंगी (हे.)

स्वा/-
सचिव
ग्रामपंचायत सावंगी (हे.)

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## पावसाचा रुद्रावतार

२०२६ चा पावसाळा मुंबई-ठाणे-पालघरसाठी काही बरा दिसत नाही. आठवडाभराच्या पावसाने गेल्या दोन दिवसांत रायगड, पुणे जिल्ह्यातील काही भागाला, सह्याद्रीच्या घाटमाथ्यालाही आपल्या कवेत घेतले असले,तरी मुंबई-ठाणे-पालघरची त्याने अगदी सलामीलाच जी दैना केली, ती चिंताजनक आहे. गेल्या दोन-तीन दिवसांत तर या महानगरी भागातील विकास योजनांची लक्तरच वेशीला टांगली गेली आहेत!हा दोष खरंतर पावसाचा नाही. गेल्या पन्नासच काय,पाच वर्षांतला पावसाचा विक्रमही त्याने मोडलेला नाही.तो पडतो आहे,तो गेल्या दहा पाच वर्षांत पडतो आहे तसाच. पण,त्याच्या कोसळण्याने महानगराची, शहरांचे नुकसान मात्र 'न भूतो' असेच होते आहे.या नुकसानीला कारण आहे, शहरे 'स्मार्ट' बनवण्यासाठी गेल्या काही वर्षांत आम्ही काही हजार कोटी रुपये खर्चुन साधलेला 'सुनियोजित विकास'.शहरे चकचकीत करण्यासाठी, एक समस्या सोडवण्यासाठी आणखी समस्या निर्माण करणारे विकासाचे आमचे धोरण या पावसाने सुरुवातीच्या काही सरीतच उघडे पाडले आहे.मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग काही कुठल्या गच्च शहरांतून धावत नाही. मोकळ्या मैदानातून जाणारा, पूर्वीचा बोरघाट जवळजवळ सपाट करणारा हा महामाग.या महामार्गाच्या दोन्ही बाजूंना खूप बांधकामे आहेत,असेही नाही.पण,तरीही हा द्रुतगती महामार्ग पुराने फुगलेल्या नदीसारखा वाहताना दिसत होता. महामार्ग बांधताना त्याच्या खालून जाणारे पूर्वापार नैसर्गिक ओहोळ नाल्याचे मार्ग बुजवून टाकल्याचा हा परिणाम. घाटातल्या धबधब्यांतून, डोंगरावरून खाली येणाऱ्या पाण्याला वाहून जाण्यासाठी वाट ठेवली नाहीच; शिवाय रस्त्याच्या दुसऱ्या बाजूच्या प्रवाहाच्या वाटाही बुजवून टाकल्या.त्यामुळे, पाण्याला वाहायला सिमेंटची वाटच सोयीची ठरली.ते त्या मार्गाने फेसाळत वाहू लागले आणि महाराष्ट्रातल्या;जगाच्या नकाशावर असलेल्या दोन महत्त्वाच्या शहरांतला संपर्क पूर्णपणे तुटला.जी अवस्था रस्त्यांची, तीच रेल्वे मार्गाची. रेल्वे मार्गाच्या बाजूने असणारे दगडमातीचे, खडकांचे सगळे संरक्षक बांध साफ केल्याने वाहणाऱ्या पाण्याने रुळांखालूनच वाट काढली. रुळांखालच्या स्लीपरचा पाया वाहून गेल्यानंतर त्यावरून रेल्वे धावणार कशी? निसर्गाचा थोडाही विचार न करता स्वतःच्या ताकदीवर अवाजवी विश्वास ठेवल्याने झालेली ही 'सुसाट विकासाची' पोलखोल आहे.पावसाळ्यानंतर होणारी रस्त्याची धुळदाण महाराष्ट्राला नवी नाही.पावसाळ्याआधी रस्त्यांची अवस्था फार चांगली असते, असे नाही. पण, पावसाळ्यात रस्त्यांमधल्या खड्डयांना चांगली खोली प्राप्त होत असल्याने पावसावर बील फाडणे सगळ्यांच्याच सोयीचे असते. गेल्या दोन-चार वर्षात रस्ते अचानक खचणे, वाहून जाणे यासारख्या अभिनव समस्यांची भर त्यात पडली आहे. रस्त्यांची सदोष बांधणी,निकृष्ट आणि अपुऱ्या सामग्रीचा वापर ही त्याची कारणे सांगितली जातात.गेल्या दहा वर्षांत विविध दर्जाच्या रस्त्यांच्या बांधणी खर्चात झालेल्या वाढीचे एकदा तटस्थ लेखा परीक्षण झाले पाहिजे. रस्ते बांधणीसाठी आवश्यक सामग्रीच्या खर्चात झालेली वाढ आणि ही वाढ पडताळून पाहायला काय हरकत आहे? रस्त्यांच्या निर्मितीत आधुनिकीकरण मोठ्या प्रमाणावर झाले, असे म्हणतात. तंत्र आणि यंत्र या दोन्ही अर्थाने.तसे जर खरेच असेल,तर रस्त्याची दैना कमी झाली पाहिजे.रस्त्यांच्या लोकार्पणावेळी रस्त्याच्या 'जागतिक दर्जा'ची दिलेली ग्वाही हवेत विरण्यापूर्वीच रस्त्याला दृष्ट लागायला सुरुवात होते! ज्या रस्त्यांना टोलचा अधिभार आहे, त्यांचीही यातून सुटका नाही. टोल व्यवस्थापनातला गैरव्यवहार आणि मजुरी हा आणखी स्वतंत्र विषय! 'कनेक्टिंग लिंक'च्या तोंडाशी दरड कोसळल्यानंतर काल मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग बंद करावा लागला.जे प्रवासी खोपोलीच्या टोलनाक्यापर्यंत किंवा थोडे आणखी पुढे गेले होते, त्यांना परत येणे भाग होते.परत येण्यासाठी टोलनाका पार करून वळून येण्याशिवाय पर्याय नव्हता. असे वळून येण्यासाठीच त्यांच्याकडून पूर्ण टोल वसूल केला गेला,अशी तक्रार अनेक वाहनचालक समाज माध्यमांवर चलत चित्रफितींद्वारे करत होते. नियोजनशून्यता केवळ प्रकल्पांच्या आखणीत आणि उभारणीतच नाही, अंमलबजावणीतही आहे!आपत्ती व्यवस्थापनाचे अनेक धडे गिरवल्यानंतरही यंत्रणा त्याच संवेदनशून्यतेने कारभार करणार असतील,तर दोष कोणाला देणार? सरकारी यंत्रणा प्रतिसादशून्य आणि ढिम्म असते,म्हणून खासगीकरणाचा पुरस्कार केला गेला. ते खासगीकरण फक्त आणि फक्त नफ्याचाच विचार करते. आपल्यावरची सुविधा देण्याची जबाबदारी,अंमलबजावणी करताना बाळगायचा किमान समजूतदारपणाही या यंत्रणा दाखवणार नसतील, तर समाज माध्यमावर संताप व्यक्त करण्याशिवाय असहाय्य नागरिकांच्या हाती काय उरते? हंगामातील पहिल्या पावसात किती मुंबईकरांचे जीव गेले, याची गणना सुरू आहे. आंतरराष्ट्रीय शहराच्या नगर नियोजनाची आम्ही किती हेळसांड केली आहे, हे आकडा सांगेल. विरोधकांच्या टीकेची गरजच नाही, असे ते 'मृत्यूचे दाखले' असतील. नागरी सुविधा देणारी यंत्रणा किती निष्काळजी आणि मुद्दाम झाली आहे, त्याचेही ते निदर्शक असतील. वाढत्या मुंबईचे ओसंडून जाणे, ज्या शहरांनी झेलले आहे, त्या कल्याण-वसई-विरार-नालासोपारा या महापालिका क्षेत्रांची परिस्थिती किती भीषण आहे, हे तिथे राहणारेच जाणत असेल.शहर नियोजनातून काढलेल्या पळवाटांनी तिथल्या अनेक भागांची अवस्था एखाद्या बेटासारखी झाली आहे.बहुतांश रस्ते पाण्याखाली गेल्याने जनजीवन पूर्ण विस्कळीत झो आहे.अनेक भाग जलमय आहेत.'अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नका' असे आवाहन मुंबईसह या परिसरात प्रशासनाकडून वारंवार केले जात आहे.सह्याद्रीचा घाटमाथा ढासळतो आहे आणि किनाऱ्यांलगतच्या शहरांत खाडीचे पाणी घुसते आहे. समुद्राची भरती मुंबईचे सांडपाणी कोंडून ठेवते आहे. आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतो आहोत.




# इथेनॉलचा संशयकल्लोळ

**'ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया' (एआरएआय) आणि वाहन उत्पादक कंपन्यांनीही 'ई२०'मुळे वाहनांना अडचणी येत नसल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. मात्र, काही संस्थांच्या पाहण्यांमधून ६६ टक्के वाहनचालकांनी 'मायलेज' कमी झाल्याचे आणि दुरुस्तीचा खर्च वाढल्याचे अनुभव मांडले आहेत.**

वाहनचालकांच्या तक्रारी आणि न्यायालयात सरकारने मांडलेल्या उलटसुलट भूमिकांमुळे पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याचे (ई२०) धोरण पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडणे साहजिक आहे. एकीकडे हेच पेट्रोल अनिवार्य केल्याने वाहनांचे 'मायलेज' कमी होत असल्याच्या आणि वाहनांमध्ये वारंवार बिघाड होत असल्याच्या तक्रारी शेकडो ग्राहकांनी केल्या आहेत; तर दुसरीकडे सरकार आणि वाहन उत्पादक कंपन्या हे सर्व गैरसमज असल्याचे ठामपणे सांगत आहेत. केंद्रीय वाहतूकमंत्री आणि इथेनॉल मिश्रणाच्या धोरणाचे समर्थक नितीन गडकरी यांनी ही 'पेट्रोल लॉबी'ची पैसे देऊन चालवलेली मोहीम असल्याचा आरोप केला आहे. वाहनचालकांच्या शंका, हे पेट्रोल वापरण्याची सक्ती, ग्राहकांचे अधिकार आणि या धोरणामध्ये गुंतलेले परस्परविरोधी हितसंबंध असे अनेक पैलू या विषयाला आहेत. एकीकडे ऊर्जासुरक्षा-पर्यावरणाचे रक्षण आणि शेतीआधारित उद्योगांना आधार यांचा हवाला देण्यात येत असताना प्रत्यक्ष ग्राहकांच्या तक्रारींची पारदर्शकपणे तपासणी करून त्यांच्या शंकांचे समाधान, हाच त्यावरील एकमेव उपाय आहे.

पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण करण्याची मूळ योजना या शतकाच्या प्रारंभी मांडण्यात आली. सन २०१४ पर्यंत हे प्रमाण दीड ते दोन टक्के होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने सन २०१८ मध्ये आणलेल्या जैवइंधन धोरणानुसार सन २०३०पर्यंत हे प्रमाण २० टक्क्यांवर नेण्याचे लक्ष्य ठेवले आणि पाच वर्षे आधीच - म्हणजे गेल्या वर्षी ते साध्यही केले. भारताला ८५ टक्के इंधन आयात करावे लागते आणि त्यासाठी परकीय चलन मोठ्या प्रमाणात खर्ची पडते. त्या पार्श्वभूमीवर इथेनॉलच्या मिश्रणाने या खर्चात बचत होऊ शकते; तसेच हे इंधन पर्यावरणपूरकही आहे. प्रामुख्याने ऊस आणि मक्यापासून मिळणाऱ्या इथेनॉलच्या वापरामुळे शेतकरी आणि साखर कारखान्यांनाही उपपदार्थ विक्रीतून आर्थिक आधार मिळतो. इराण युद्धात होर्मुझच्या सामुद्रधुनीचा मार्ग खुंटल्याने भारतात इंधन आणीबाणी उभी राहिली होती, त्याच्याही आठवणी ताज्या आहेत. हे लाभ लक्षात घेता इथेनॉलचे मिश्रण आणि त्याचे प्रमाण वाढवण्यास कोणाचाही विरोध नसावा; परंतु काही काळापासून वाहनचालकांकडून 'मायलेज' दहा टक्क्यांनी घटत असल्याच्या तक्रारी करण्यात येत आहेत. त्याबरोबरच वाहनांचे गॅसकेट, पेट्रोलवाहक नळ्या बदलाव्या लागत असून, इंजिनमध्ये कचरा किंवा टाक्यांना गंज लागून दुरुस्तीचा खर्चही वाढत असल्याचे सांगितले जाते. विरोधी पक्षांनी तर थेट गडकरी यांना लक्ष्य केले असून, त्यांच्या कुटुंबीयांच्या कृषी उद्योगांना या धोरणाचे लाभ होत असल्याचे आरोप केले आहेत. काही दिवसांपूर्वी न्यायालयातील एका खटल्यात सरकारपक्षाकडून '२० टक्के इथेनॉल मिसळण्याचा प्रयोग' असा उल्लेख झाल्याने या आगीत तेल ओतले गेले. 'ई २०' हा अजूनही प्रयोगच असेल, तर सरकार त्याचा वापर अनिवार्य कसा करते,' असा प्रमुख आक्षेप आहे. आपल्या मांडणीचा चुकीचा अर्थ काढल्याचा खुलासा सरकारने केला; तोवर वादाचे गाडे पुढे सरकले.

दुसरीकडे 'ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया' (एआरएआय) आणि वाहन उत्पादक कंपन्यांनीही 'ई२०'मुळे वाहनांना अडचणी येत नसल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. मात्र, काही संस्थांच्या पाहण्यांमधून ६६ टक्के वाहनचालकांनी 'मायलेज' कमी झाल्याचे आणि दुरुस्तीचा खर्च वाढल्याचे अनुभव मांडले आहेत. काही तज्ज्ञांच्या मते नव्या वाहनांबाबत तक्रारी नसल्या, तरी दहा टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोलसाठी बनवण्यात आलेल्या सन २०२३ पूर्वीच्या, म्हणजे जुन्या वाहनांना अडचणी येत आहेत, त्याचाही विचार झाला पाहिजे. युरोप-अमेरिकेतील अनेक देश पेट्रोलमध्ये इथेनॉलचा वापर करतात; मात्र ब्राझीलसारख्या इथेनॉल उत्पादन आणि वापरामध्ये आघाडीवरच्या देशात ग्राहकांना शंभर टक्के पेट्रोल किंवा इथेनॉलमिश्रित पेट्रोल वापरण्याचे पर्याय उपलब्ध आहेत. ग्राहकांच्या अधिकारांचा विचार केला, तरी तशी व्यवस्था आपल्याकडे उभी करणे शक्य आहे का, हासुद्धा मुद्दा आहेच. मोदी यांच्या तिन्ही कार्यकाळांमध्ये गडकरी हे मंत्रिमंडळात महत्त्वाच्या स्थानी पाय रोवून आहेत. इतकेच नव्हे, तर मोदी यांना पर्यायाची चर्चा होते, तेव्हा सर्वपक्षीय दोस्ताना असलेल्या 'नागपूर'च्या गडकरींचे नाव हमखास निघते. त्या पार्श्वभूमीवर येऊ घातलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्ताराचीही पार्श्वभूमी या वादामागे असू शकते. काहीही असले, तरी एकीकडे ८५ टक्के इथेनॉल वापराचे तंत्रज्ञान दारी उभे आहे; अशा काळात सर्वंकष खुल्या अभ्यासाद्वारे सर्वसामान्य ग्राहकांच्या शंकांचे निरसन केल्याशिवाय पुढे पावले टाकणे हिताचे नाही.

**प्रशांत पाटील**

## निसर्गाचा लहरीपणा की मानवी नियोजनाचा अभाव?

आज संपूर्ण महाराष्ट्र आणि देशातील अनेक शहरे एका विचित्र संकटाचा सामना करत आहेत. काही दिवसांपूर्वीच आपण भीषण पाणीटंचाईच्या झळा सोसत होतो.पावसाची वाट पाहताना तहानलेल्या जमिनीकडे डोळे लावून बसलेलो होतो. मात्र,पावसाचे आगमन होताच परिस्थिती एका टोकाकडून दुसऱ्या टोकाला पोहोचली आहे.आज सर्वत्र अतिवृष्टीमुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. रस्ते पाण्याखाली गेले आहेत, घरांची पडझड झाली आहे आणि अनेक ठिकाणचे पूल वाहून गेल्याने संपर्क तुटला आहे.या भीषण परिस्थितीकडे पाहताना एक प्रश्न प्रकर्षाने उपस्थित होतो,हा निसर्गाचा कोप आहे की आपल्या नियोजनाचा अभाव?

**शहरांची अवस्था आणि नियोजनाची कमतरता**

शहरांमध्ये काँक्रीटीकरण इतक्या मोठ्या प्रमाणावर झाले आहे की, पावसाचे पाणी जमिनीत जिरण्यास जागाच उरलेली नाही. पाण्याचा नैसर्गिक निचरा होणारे ओढे, नाले आज अतिक्रमणांच्या विळख्यात अडकले आहेत. परिणामी, थोडा पाऊस पडला तरी शहरांचे रूपांतर तलावात होते. पावसाळ्यापूर्वीची नालेसफाई केवळ कागदावर होते की काय, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. या आपत्तीचा सामना करण्यासाठी कोणतीही पूर्वतयारी किंवा आपत्कालीन नियोजन दिसत नाही, ही शोकांतिका आहे.

आज शहरांमधील 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' ही केवळ एक कायदेशीर अट राहिली आहे, तिचा प्रत्यक्ष वापर नगण्य आहे.आता वेळ आली आहे ती आत्मपरीक्षणाची आणि तातडीच्या उपाययोजनांची. ग्रामीण भागात ठिकठिकाणी लहान बंधारे बांधून आणि शहरांमध्ये पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्यासाठी 'शोषखड्डे' तयार करून आपण पाणी अडवू शकतो. रस्ते बांधताना केवळ काँक्रीटचा वापर न करता, पाणी जिरू शकेल अशा तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. आपत्ती व्यवस्थापन म्हणजे केवळ संकट आल्यावर मदतकार्य करणे नाही, तर संकट येऊच नये यासाठी पूर्वतयारी करणे होय. आज पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन केले नाही, तर भविष्यात पूर आणि टंचाई अशा दोन्ही संकटांचा सामना करणे आपल्याला अधिक कठीण जाईल.वेळ अजूनही गेलेली नाही, आपण आता जागे झाले पाहिजे.

**वर्षा आवदे**,नागपूर

# हरितऊर्जेची झेप आणि वीजवितरणाचे वास्तव

**हरित ऊर्जा संक्रमणाच्या या टप्प्यावर भारताला दीर्घकालीन वृष्टिकोन स्वीकारावा लागेल. अक्षय ऊर्जा वाढवणे आवश्यक आहेच; परंतु त्याच वेळी वीजवितरण व्यवस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. ऊर्जाक्षेत्रातील कोणतीही साखळी कमकुवत राहिली, तर संपूर्ण व्यवस्था उळमळीत होऊ शकते. वीज उत्पादन, वितरण आणि वापर या तिन्ही पातळ्यांवर समन्वय साधणारे धोरण आवश्यक आहे.**

भारताने गेल्या दशकात अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात घेतलेली झेप ही केवळ देशांतर्गत धोरणात्मक यशकथा नाही, तर जागतिक पातळीवरही लक्ष वेधून घेणारी घडामोड आहे. हवामानबदलाच्या वाढत्या संकटाच्या पार्श्वभूमीवर जगभरातील देश कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी धडपडत असताना भारताने विकास आणि पर्यावरण यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या हवामानबदल आराखडा करारांतर्गत सादर केलेल्या राष्ट्रीय निर्धारित योगदानांद्वारे भारताने २०३५ पर्यंत उत्सर्जन तीव्रतेत ४७ टक्के घट, एकूण वीजक्षमतेपैकी ६० टक्के क्षमता बिगरजीवाश्म इंधन स्रोतांतून निर्माण करणे आणि मोठ्या प्रमाणात कार्बन सिंक उभारणे अशी उद्दिष्टे जाहीर केली आहेत. या दिशेने भारताची वाटचाल अपेक्षेपेक्षा वेगाने होत असल्याचे दिसते; परंतु या यशाच्या चमकदार चित्रामागे वीजवितरण क्षेत्रातील वाढती आर्थिक अस्थिरता हा एक गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. भारताने २०३० साठी निश्चित केलेली अनेक हरित ऊर्जा उद्दिष्टे आधीच गाठण्यास सुरुवात केली आहे. ५० टक्के बिगरजीवाश्म वीजक्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट २०२५ पर्यंतच पूर्ण झाले आहे. सौर आणि पवन ऊर्जेच्या झपाट्याने वाढलेल्या क्षमतेमुळे भारत अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात जागतिक नेतृत्वाच्या दिशेने वाटचाल करत आहे. ग्रामीण भागातही सौरऊर्जेचा प्रसार वाढत आहे. घरांच्या छतांवर सौर पॅनल बसवण्यास प्रोत्साहन देणाऱ्या योजनांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. 'प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना'सारख्या योजनांमुळे अनेक घरगुती ग्राहक स्वतःची वीज स्वतः निर्माण करू लागले आहेत.

**वीज कंपन्या आर्थिक अडचणीत**

वरकरणी पाहता ही ऊर्जा स्वातंत्र्याची आणि पर्यावरणीय प्रगतीची आदर्श दिशा वाटते; पण या बदलाचे आर्थिक परिणाम आता स्पष्टपणे समोर येऊ लागले आहेत. देशातील वीज वितरण कंपन्या म्हणजेच 'डिस्कॉम्स' आधीपासूनच आर्थिक अडचणीत आहेत. अनेक वर्षांपासून त्यांना तोटा सहन करावा लागत आहे. राज्य सरकारांकडून वेळोवेळी आर्थिक मदत किंवा कर्जमाफीसारखे उपाय करून त्यांना टिकवून ठेवले जाते. तांत्रिक व व्यावसायिक तोटे कमी झाल्याने परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली असली, तरी अजूनही मोठी आर्थिक तूट कायम आहे. अशा परिस्थितीत अक्षय ऊर्जेच्या नव्या धोरणांमुळे त्यांच्या महसुलावर आणखी ताण पडत आहे. यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ग्राहकांच्या वापराच्या पद्धतीत होत असलेला बदल. पारंपरिक पद्धतीत ग्राहक पूर्णपणे 'डिस्कॉम'कडून वीज विकत घेत असत. आता मात्र मोठे औद्योगिक ग्राहक आणि संस्थात्मक ग्राहक थेट अक्षय ऊर्जा प्रकल्पांकडून वीज खरेदी करू लागले आहेत. 'ओपन ॲक्सेस' व्यवस्थेमुळे त्यांना ही मुभा मिळाली आहे. दिल्ली मेट्रोसारख्या संस्थांनी सौर प्रकल्पांमधून थेट वीज घेण्यास सुरुवात केली आहे. यामुळे स्वच्छ ऊर्जा वापर वाढतो; पण त्याच वेळी 'डिस्कॉम्स'चे सर्वाधिक महसूल देणारे ग्राहक त्यांच्यापासून दूर जात आहेत. याचा आर्थिक परिणाम गंभीर आहे. कारण भारतातील वीज दररचना हा क्रॉस सबसिडी वर आधारित आहे. औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांकडून जास्त दर आकारून घरगुती आणि कृषी ग्राहकांना कमी दरात वीज दिली जाते.

**नेट मीटरिंगचा ग्राहकांना लाभ**

नफ्यातील ग्राहकांनी 'डिस्कॉम्स 'कडून वीज घेणे कमी केले, तर संपूर्ण आर्थिक समतोल बिघडू शकतो. 'डिस्कॉम्स'कडे मग प्रामुख्याने अनुदानित ग्राहकच उरतील आणि त्यांची आर्थिक स्थिती आणखी ढासळेल. घरगुती सौरऊर्जेचा वाढता वापरही याच समस्येला हातभार लावत आहे. नेट मीटरिंग व्यवस्थेमुळे ग्राहकांनी निर्माण केलेली अतिरिक्त वीज ग्रिडमध्ये पाठवली जाते आणि त्याचा लाभ त्यांच्या वीज बिलात समाविष्ट केला जातो. काही ग्राहकांचे बिल शून्यापर्यंत येऊ लागले आहे. हे ग्राहकांसाठी नक्कीच फायदेशीर असले, तरी 'डिस्कॉम्स'च्या महसुलात घट होत आहे. महत्त्वाचे म्हणजे ग्राहकांनी स्वतः वीज निर्माण केली, तरी ते पूर्णपणे ग्रिडपासून स्वतंत्र होत नाहीत. रात्रीच्या वेळी किंवा हवामान प्रतिकूल असताना त्यांना पुन्हा ग्रिडवर अवलंबून रहावे लागते. म्हणजेच पायाभूत सुविधा आणि नेटवर्क टिकवण्याचा खर्च 'डिस्कॉम्स'वरच राहतो, पण त्या बदल्यात मिळणारा महसूल कमी होतो. येथेच 'निश्चित खर्च' आणि 'चल खर्च' यामधील फरक महत्त्वाचा ठरतो. वीजवितरण व्यवस्थेत अनेक खर्च असे असतात, जे ग्राहक किती वीज वापरतो यावर अवलंबून नसतात. कर्मचारी वेतन, ट्रान्समिशन नेटवर्क, सबस्टेशन्स, पायाभूत सुविधा देखभाल आणि वीज उत्पादकांना द्यावी लागणारी निश्चित देयके हे सर्व खर्च कायम असतात; पण सध्याच्या दररचनेत ग्राहकांकडून आकारले जाणारे निश्चित शुल्क तुलनेने कमी आहे. त्यामुळे वापर कमी झाला, की महसूल झपाट्याने घटतो. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने (सीईए) याच समस्येकडे लक्ष वेधत दररचनेत सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली आहे.

'सीईए'च्या मते, घरगुती आणि कृषी ग्राहकांकडून निश्चित शुल्काच्या स्वरूपात अधिक महसूल वसूल करणे आवश्यक आहे. औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांसाठी तर निश्चित खर्चाची संपूर्ण वसुली करण्याची शिफारस करण्यात आली आहे. 'नेट मीटरिंग' ग्राहकांसाठी स्वतंत्र दरश्रेणी तयार करणे, 'ओपन ॲक्सेस' ग्राहकांसाठी 'स्टँडबाय चार्ज' आकारणे आणि वेळेनुसार बदलणारे वीजदर लागू करणे हे उपाय सुचवण्यात आले आहेत. यामागचा उद्देश स्पष्ट आहे, ग्रिडचा वापर करणाऱ्या प्रत्येक ग्राहकाने त्याच्या देखभालीचा योग्य वाटा उचलला पाहिजे; मात्र या प्रस्तावांबाबत सावधगिरी बाळगणेही आवश्यक आहे. निश्चित शुल्कात अतिरेकी वाढ झाल्यास सामान्य ग्राहकांवर आर्थिक भार पडू शकतो. विशेषतः निम्न मध्यमवर्गीय आणि ग्रामीण ग्राहकांसाठी वीज हा अत्यावश्यक खर्च आहे. त्यामुळे सामाजिक न्याय लक्षात घेऊनच दररचनेत बदल करावे लागतील. विकसित देशांमध्ये घरगुती ग्राहकांसाठी निश्चित शुल्क मर्यादित ठेवले जाते आणि उद्योगांवर अधिक भार टाकला जातो. भारतातही अशाच संतुलित दृष्टिकोनाची गरज आहे. दुसरीकडे 'डिस्कॉम्स'नी स्वतःच्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे तितकेच आवश्यक आहे. अजूनही अनेक राज्यांमध्ये वीजचोरी, बिल वसुलीतील त्रुटी आणि तांत्रिक तोटे मोठ्या प्रमाणावर आहेत. स्मार्ट मीटरिंग, डिजिटल बिलिंग, आधुनिक ट्रान्समिशन प्रणाली आणि पारदर्शक व्यवस्थापनाद्वारे हे तोटे कमी करता येऊ शकतात. दिल्लीतील खासगीकरणानंतर 'एटी अँड सी' तोट्यांमध्ये झालेली मोठी घट हे त्याचे उदाहरण आहे. म्हणजेच आर्थिक सुधारणा केवळ दरवाढीने नव्हे, तर व्यवस्थापन सुधारण्यानेही शक्य आहेत.

**भारत ऐतिहासिक वळणावर**

आज भारत एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे. एकीकडे हवामानबदलाचा मुकाबला करण्यासाठी हरित ऊर्जेची दिशा स्वीकारावी लागणार आहे, तर दुसरीकडे सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी आणि विश्वासार्ह वीज उपलब्ध ठेवावी लागणार आहे.



ही दोन्ही उद्दिष्टे साध्य करणे कठीण असले, तरी अशक्य नाही. त्यासाठी दूरदृष्टी, आर्थिक शिस्त आणि तांत्रिक नवकल्पनांची जोड आवश्यक आहे. भारताची हरित ऊर्जा क्रांती खऱ्या अर्थाने यशस्वी ठरणार असेल, तर तिचा पाया मजबूत आणि शाश्वत वीजवितरण व्यवस्थेवरच उभा रहावा लागेल. भारतातील बहुतांश 'डिस्कॉन्स' गेल्या अनेक दशकांपासून तोट्यात आहेत. तांत्रिक आणि व्यावसायिक तोटे कमी करण्याच्या प्रयत्नांमुळे त्यांची परिस्थिती काहीशी सुधारली असली, तरी २०२३-२४ या आर्थिक वर्षात अजूनही प्रति युनिट ०.३९ रुपयांचा रोखीचा तोटा होत असून एकूण रोख तूट तब्बल ५८ हजार कोटी रुपयांवर पोहोचली आहे. म्हणजेच अक्षय ऊर्जा वाढत असताना 'डिस्कॉम्स' च्या आर्थिक मॉडेलवर मोठा ताण निर्माण होत आहे. 'डिस्कॉम्स'ना थर्मल वीज उत्पादकांशी दीर्घकालीन 'टेक-ऑर-पे' स्वरूपाचे करार करावे लागतात. म्हणजेच त्यांनी ठराविक प्रमाणात वीज घेतली नाही, तरी ठराविक शुल्क द्यावेच लागते. दुसरीकडे, ग्राहक स्वतः वीज निर्माण करू लागल्याने किंवा थेट हरित ऊर्जा खरेदी करू लागल्याने 'डिस्कॉम्स'ची विक्री घटते. अशा परिस्थितीत निश्चित खर्च मात्र कायम राहतात. कर्मचारी वेतन, पायाभूत सुविधा, ट्रान्समिशन नेटवर्क या सर्वांचा भार कमी होत नाही. त्यामुळे महसूल घटत असताना खर्च कायम राहतो आणि आर्थिक तूट वाढत जाते.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने मांडलेल्या सूचनांना महत्त्व प्राप्त झाले आहे. सीईएने वीज दररचनेत बदल करून 'डिस्कॉम्स'च्या निश्चित खर्चाची भरपाई अधिक प्रभावीपणे करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. सध्या 'डिस्कॉम्स'ला ग्राहकांकडून निश्चित शुल्काच्या स्वरूपात मिळणारा महसूल फक्त ९ ते २० टक्के आहे. त्यामुळे सौरऊर्जा वापरणाऱ्या ग्राहकांकडूनही ग्रिडच्या वापरासाठी योग्य प्रमाणात शुल्क आकारले पाहिजे, असा युक्तिवाद करण्यात येत आहे.

प्रा. सुखदेव बखळे

# वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयाचा भोगळ कारभार उघड

## कोट्यवधींचे शवगृह मात्र फ्रिजर नादुरुस्त असल्याने मृतदेह कुजतात!

## नादुरुस्त शवपेटीमुळे मृतदेह कुजल्याचा कुटुंबीयांचा आरोप..



जनमाध्यम / प्रतिनिधी

यवतमाळ - जिवंत रुग्णांना उपचारासाठी आणि मृत व्यक्तींना सन्मानाने जपण्यासाठी असलेली यंत्रणा जर निष्क्रिय झाली, तर त्याहून दुर्दैव कोणते? श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पुन्हा एकदा प्रशासनाच्या बेजबाबदार आणि निष्काळजी कारभाराचा कळस गाठल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या शवगृहातील नादुरुस्त फ्रीझरमुळे मृतदेह कुजल्याचा आरोप नातेवाईकांनी केला असून, त्यामुळे मृत व्यक्तीच्या सन्मानाचीही पायमल्ली होत असल्याचा संताप व्यक्त केला जात आहे.

खोजा कॉलनी येथील रहिवासी मनीष दिवाकर वाघमारे (५८) यांचे ७ जुलै रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. उपचारासाठी त्यांना संजीवनी रुग्णालयात नेण्यात आले होते. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर शवविच्छेदनासाठी त्यांचा मृतदेह वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात आणून शवागारातील फ्रीझरमध्ये ठेवण्यात आला. मृतकाचा मुलगा दुबई येथे असल्याने तो येईपर्यंत वडिलांचा मृतदेह सुरक्षित राहावा, अशी कुटुंबीयांची अपेक्षा होती. सुरुवातीला मृतदेह समाजाच्या जमातखान्यातील फ्रीझरमध्ये ठेवण्याचा विचार होता. मात्र रुग्णालय प्रशासनाने शवागारात सर्व व्यवस्था असल्याचे सांगून मृतदेह तेथेच ठेवण्यास सांगितले. प्रशासनाच्या शब्दावर विश्वास ठेवणाऱ्या कुटुंबीयांना दुसऱ्याच दिवशी मोठा धक्का बसला. बुधवारी दुपारी मृतदेह ताब्यात घेण्यासाठी शवागारात पोहोचलेल्या नातेवाईकांना मृतदेह पूर्णपणे विघटित झालेल्या अवस्थेत दिसला. शरीरातून रक्तस्त्राव सुरू होता, तीव्र दुर्गंधी येत होती आणि चेहरा इतका विद्रूप झाला होता की दुबईहून आलेल्या मुलालाही वडिलांचे अखेरचे दर्शन घेता आले नाही. यामुळे संतप्त कुटुंबीयांनी रुग्णालय प्रशासनाला जाब विचारत शवागारातच तीव्र आंदोलन केले. या गोंधळाची माहिती मिळताच लोहारा पोलीस ठाण्याच्या डायल-११२ पथकातील महिला पोलीस अधिकारी अश्विनी राऊत घटनास्थळी दाखल झाल्या. त्यानंतर शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी निलेश सुराडकर पथकासह पोहोचले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. यानंतर कुटुंबीयांनी शहर पोलीस ठाण्यात रुग्णालय व्यवस्थापना विरोधात तक्रार दाखल करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. दरम्यान, या घटनेनंतर शवागाराची विदारक स्थितीही समोर आली आहे. शवागारात एकूण १८ फ्रीझर असून त्यापैकी केवळ सहाच कार्यरत आहेत. त्यातीलही तीन फ्रीझरच्या ट्रॉली पूर्णपणे जाम झाल्या असून मृतदेह बाहेर काढणेही कठीण झाले आहे. अनेक फ्रीझरमध्ये रक्ताचे डाग, अस्वच्छता आणि तांत्रिक बिघाड असल्याचे चित्र समोर आले आहे. कोट्यवधींची इमारत उभारूनही देखभाल आणि दुरुस्तीकडे प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होत आहे. या प्रकारामुळे केवळ रुग्णच नव्हे तर मृत व्यक्तींच्याही सन्मानाची पायमल्ली होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. मृतदेह सुरक्षित ठेवण्यासाठी शासनाने उपलब्ध करून दिलेली यंत्रणा नादुरुस्त असल्याने नातेवाईकांना असह्य मानसिक वेदना सहन कराव्या लागत आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

### कुटुंबीयांचा उपअधीक्षकांशी तीव्र वाद

मृतदेहाची अवस्था पाहून संतप्त झालेल्या नातेवाईकांनी रुग्णालयाचे उपअधीक्षक डॉ. सुरेंद्र भुयार यांना घटनास्थळी जाब विचारला. शवागारात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे मृत व्यक्तीच्या सन्मानालाच धक्का बसल्याचा आरोप करत कुटुंबीयांनी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली.

### पोलिसांचा बंदोबस्त; रुग्णालय व्यवस्थापनाविरोधात तक्रार

घटनास्थळी वाढता तणाव लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने बंदोबस्त वाढविला. पोलिसांनी कुटुंबीयांची समजूत काढत कायदेशीर कारवाईचे आश्वासन दिले. त्यानंतर शहर पोलीस ठाण्यात रुग्णालय व्यवस्थापनाविरोधात लेखी तक्रार दाखल करण्यात आली.

**याप्रकरणी संबंधित विभागाकडून अहवाल मागविण्यात आला आहे. शवागारातील एका कॅबिनेटमध्ये सहा मृतदेह ठेवण्याची व्यवस्था असून त्यासाठी एकच मुख्य स्विच आहे. संबंधित मृतदेह शवागारात आणण्यापूर्वी मृत्यू होऊन किती वेळ झाला होता, याची अचूक माहिती उपलब्ध नाही. त्याच कॅबिनेटमधील इतर मृतदेह सुरक्षित अवस्थेत असल्याचे समोर आले आहे. संबंधित मृतदेह शवागारात आणण्यापूर्वीच विघटन प्रक्रिया सुरु झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरु आहे.**

**- डॉ. प्रशांत उईके, अधिष्ठाता, श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ**

# SIR अभियानाच्या आढाव्यासाठी जिल्हाधिकारी विकास मीना यांची शिरपूर ग्रामपंचायतीला भेट

जनमाध्यम / प्रतिनिधी

### मतदार पुनरीक्षण प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना



महागाव : विशेष मतदार यादी पुनरीक्षण (SIR) अभियानाच्या अनुषंगाने यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी महागाव तालुक्यातील गुंज मंडळातील शिरपूर ग्रामपंचायतीला भेट देऊन अभियानाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. मतदार यादी पुनरीक्षणाची प्रक्रिया अचूक, पारदर्शक व विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी बीएलओमार्फत सुरू असलेल्या मतदार पडताळणी, ईएफ फॉर्म भरणे, नवमतदार नोंदणी, नावातील दुरुस्ती तसेच आवश्यक कागदपत्रांची तपासणी याबाबत माहिती घेतली. प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदार यादीत समावेश होण्यासाठी दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. या पाहणीदरम्यान .(सखाराम मुळे, उपविभागीय अधिकारी उमरखेड.) महागावचे. तहसीलदार अभय मस्के, गुंज मंडळाधिकारी संदीप मानकर, मोरथ मंडळाधिकारी संदीप फटाळे तसेच शिरपूरचे तलाठी व बीएलओ येडकर उपस्थित होते.

अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना SIR अभियानाच्या प्रगतीची माहिती सादर केली. यावेळी मतदार नोंदणी प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये, प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचून आवश्यक फॉर्म भरून घेण्यात यावेत आणि शासनाच्या सूचनांनुसार अभियान प्रभावीपणे राबविण्यात यावे, असे मार्गदर्शन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले.

**जिल्हाधिकारी विकास मीना यांची शिरपूर ग्रामपंचायतीला भेट**

SIR (विशेष मतदार यादी पुनरीक्षण) अभियानाचा सविस्तर आढावा. मतदार पडताळणी व ईएफ फॉर्म भरण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश. सर्व पात्र मतदारांची नोंदणी अचूक व वेळेत पूर्ण करण्यावर भर. महसूल व निवडणूक यंत्रणेतील अधिकाऱ्यांची उपस्थिती.

# यवतमाळ येथे स्व. सौरभ पवार प्रकरणी शासनाकडे निवेदन सादर

जनमाध्यम / प्रतिनिधी



यवतमाळ : महाराष्ट्र राज्य आदिवासी फासेपारधी कर्मचारी संघटना व अखिल भारतीय आदिम महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. सौरभ पवार यांच्या संशयास्पद आत्महत्या प्रकरणाची निष्पक्ष, सखोल व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी यवतमाळ जिल्हाधिकारी यांच्या मार्फत महाराष्ट्र शासनाकडे निवेदन सादर करण्यात आले.


निवेदनामध्ये या प्रकरणाची स्वतंत्र, पारदर्शक व निष्पक्ष चौकशी करून पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, संबंधित दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी तसेच प्रकरणाचा तपास वरिष्ठ स्तरावरील यंत्रणेमार्फत करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य आदिवासी फासेपारधी कर्मचारी संघटनेचे संस्थापक तथा अखिल भारतीय आदिम महासंघ (महाराष्ट्र राज्य) उपाध्यक्ष धर्मराज भोसले, सुरेशजी फुलमाळी, बबन पवार तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी स्व. सौरभ पवार यांच्या कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत संघटनेचा लढा कायम राहील, असा निर्धार व्यक्त केला.

## घटना-घडामोडी



### मौलाना अब्दुल कलाम आझाद सार्वजनिक वाचनालयातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

पुसद - येथील मौलाना अबुल कलाम आझाद सार्वजनिक खाजगी वाचनालय व राष्ट्रीय अल्पसंख्यांक परिषद यवतमाळ ज़िल्हा तर्फे दिनांक पाच जुलै रविवार रोजी ग्रँड पॅलेस वाशिम रोड पुसद येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेस नेते डॉक्टर मोहम्मद नदीम हे होते तर मार्गदर्शक म्हणून माजी आमदार वजाहत मिर्झा उपस्थित होते तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नांदेड येथून आलेले मार्गदर्शक मोटिवेशनल स्पीकर अब्दुल बशीर मजीद प्रा.मोहम्मद जुबेर व पुसद येथील इं. सय्यद रेहान,सैफ सर आरीज कीदवाई सर होते.कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे प्रा. सदिक सर, सय्यद इस्तियाक, आलियार जनाब,मीर अकील सर,अनिस चव्हाण हसणेन अकिब सर एड. वसीम अहमद मुसद्दीक सर ललित सेता प्राध्यापक साजिद मिर्झा एडवोकेट तनवीर इत्यादी सह असंख्य पालक विद्यार्थी उपस्थित होते. मौलाना अब्दुल कलाम आझाद सार्वजनिक वाचनालय तर्फे वर्ग दहावी बारावी पदवी व पदवीत्तर तसेच पीएचडी प्राप्त करणारे प्राध्यापक नसीर शेख प्राध्यापक आवेज निर्बान व प्राध्यापक इबान जावेद खान इत्यादींचा शाल व श्रीफळ देऊन व स्मृतीचिन्ह देऊन मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला तसेच पुसद चे विधि्यार्थी ईईट(धनबाद )इथे उत्तीर्ण झालेले मोहम्मद उमर अब्दुल सत्तार यांचा समोरच स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला अमरावती विद्यापीठातून बीएससी तृतीय वर्षात सुवर्णपदक मिळविणारी ऊसरा फातिमा तसेच एम फॉर्म मध्ये गुणवत्ता यादी तृतीय क्रमांक पटकावणारे सकलेन खान इत्यादींचा पुष्पगुच्छ स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला यावेळी अनेक मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, ॲड. प्रा. मिर्झा आदिल बेग ने केले. प्रवक्ता याने शिक्षण, मेहेनत, झिद्द, कठोर परिशरम करा असा सांगण्यात आला.



### केळापूर तालुक्यात SIR मोहिमेला वेग; तहसीलदार राजेंद्र इंगळे यांचा BLO कामांचा आढावा

पांढरकवडा - केळापूर तालुक्यात विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (SIR) मोहिमेअंतर्गत मतदार यादी अद्ययावत करण्याच्या कामाला गती देण्यात आली आहे. तहसीलदार राजेंद्र इंगळे यांनी तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन BLO यांच्या कामकाजाचा आढावा घेतला व EF फॉर्मचे डिजिटायझेशन वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, पोलीस पाटील, कोतवाल, सरपंच, सदस्य तसेच इतर लोकप्रतिनिधी आणि संबंधित अधिकाऱ्यांना SIR मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून मतदार नोंदणी व डिजिटायझेशनची प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन करण्यात आले. "सशक्त मतदार यादी, सक्षम लोकशाही" या उद्दिष्टाने सुरु असलेल्या या मोहिमेत सर्व संबंधितांनी समन्वयाने काम करून SIR चे काम वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. निवडणूक विभागाने नागरिकांनाही सहकार्य करण्याचे आवाहन करत पारदर्शक व अचूक मतदार यादी तयार करण्यावर भर दिला आहे.

### प्रभाग 27 मध्ये प्रत्येक मतदारापर्यंत गणना प्रपत्र पोहोचवा..!



यवतमाळ : विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) मोहिमेदरम्यान प्रभाग क्र. 27 मधील अनेक पात्र मतदारांना अद्याप गणना प्रपत्र मिळाले नसल्याची बाब समोर आल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते दिनेश हरणे यांनी मंगळवारी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश शिंगटे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. प्रत्येक पात्र मतदाराच्या घरी जाऊन बीएलओने गणना प्रपत्र वितरित करावे, फॉर्म भरण्याबाबत मार्गदर्शन करावे तसेच कोणताही मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये, अशी मागणी त्यांनी केली. काही ठिकाणी घरोघरी वितरण न करता इतरांच्या माध्यमातून फॉर्म वाटप होत असल्याच्या तक्रारींचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. या निवेदनाची गंभीर दखल घेत उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी संबंधित उपविभागीय अधिकारी व मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना तात्काळ चौकशी करून आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले. प्रत्येक पात्र मतदाराचे नाव मतदार यादीत समाविष्ट होईल, यासाठी संबंधित यंत्रणेने जबाबदारीने काम करावे, असेही निर्देश देण्यात आले.

**तक्रारीनंतर निवडणूक प्रशासनाचे तात्काळ निर्देश**

# मुजोर वेकोलीला जनतेचा इशारा..!

**९ जुलैला `कोळसा बंद, रस्ता बंद` आंदोलन**

## धूळ, अपघात, बेरोजगारी आणि रखडलेल्या पुनर्वसनामुळे संताप; कोलगाव चेकपोस्टवर आरपारच्या लढाईची घोषणा

जनमाध्यम / प्रतिनिधी



वणी - "कोळसा उत्पादन महत्त्वाचे, पण प्रकल्पग्रस्तांचे आयुष्य महत्त्वाचे नाही का?" असा संतप्त सवाल उपस्थित करत वेकोलीच्या वणी एरियातील मुंगोली–कोलगाव कोळसा प्रकल्पामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी आता संघर्षाचा इशारा दिला आहे. वारंवार निवेदने, जनसुनावण्या, अधिकाऱ्यांसोबतच्या बैठका आणि आश्वासनांची मालिका सुरू असतानाही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याचा आरोप करत नागरिकांनी दि. ९ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता कोलगाव चेकपोस्ट येथे समस्या सुटेपर्यंत 'रस्ता रोको' आंदोलन करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, वेकोली प्रशासनाचे लक्ष केवळ कोळसा उत्पादन आणि महसूल वाढविण्यावर असून धुळीने माखलेले रस्ते, वाढते अपघात, प्रदूषण, स्थानिक बेरोजगारी, अधिग्रहित जमिनींचे प्रश्न आणि पुनर्वसित गावांतील अपुऱ्या सुविधा याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे नागरिकांचा संयम संपला असून आता आंदोलनाशिवाय पर्याय उरलेला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आंदोलकांनी कोलगाव चेकपोस्ट ते कोलगाव फाटा हा प्रमुख जिल्हा मार्ग तातडीने दुरुस्त करणे, कोलगाव पुनर्वसन जोडरस्ता मजबूत करणे, कोलगाव फाटा–भीमनगर मार्गाचे मजबुतीकरण, स्थानिक बेरोजगारांना कंत्राटी कामात प्राधान्य, मुंगोली–शिवणी पुलाचे पिचिंग, धूळ नियंत्रणासाठी नियमित पाणी फवारणी, नागरिकांसाठी स्वतंत्र सुरक्षित रस्ता, गतिरोधक, स्ट्रीटलाइट, रेडियम पोल, वर्धा नदीवरील नवीन पुलावर प्रकाश व्यवस्था, पर्यावरणास घातक प्रोसोफीस बाभळीचे उच्चाटन, कोळसा वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग तसेच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन व अधिग्रहणाशी संबंधित प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्याची मागणी केली आहे.

### "आणखी किती जीव गेल्यावर वेकोलीला जाग येणार?"

धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून खड्डेमय रस्त्यांमुळे वारंवार अपघात घडत आहेत. अनेकांना कायमचे अपंगत्व आले, तर काही निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. मात्र, या पार्श्वभूमीवरही वेकोलीकडून प्रभावी सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.

### लोकप्रतिनिधींचाही आंदोलनाला पाठिंबा

या आंदोलनाला माजी जिल्हा परिषद सदस्य विजय पिदुरकर, उपसभापती विजय गारघटे, ग्रामपंचायत प्रशासक सौ. शुभांगी संदीप जेणेकर, ग्रामपंचायत सदस्य निखिल उपासे आणि विश्वास बोरपे यांनी पाठिंबा जाहीर केला असून, प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# अयोध्या श्रीराम मंदिरातील कथित दान अपहार प्रकरण शिवसेनेकडून हनुमान चालीसा पठण व महाआरती करुन निषेध

जनमाध्यम / प्रतिनिधी



राळेगाव - अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिरातील रामभक्तांनी अर्पण केलेल्या सोने-चांदीच्या दागिन्यांसह रोकड दान व चढाव्याच्या कथित अपहाराच्या आरोपांच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने राज्यव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून राळेगाव येथे श्रीराम मंदिरासमोर हनुमान चालीसा पठण, श्रीरामरक्षा स्तोत्र पठण व महाआरतीचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे नेतृत्व शिवसेना तालुका प्रमुख विजय पाटील व शहर प्रमुख शंकर गायधने यांनी केले. यावेळी उपस्थित वक्त्यांनी सांगितले की, प्रभू श्रीराम मंदिर हे जगभरातील हिंदू समाजाचे श्रद्धास्थान असून मंदिरात अर्पण करण्यात आलेल्या दानाबाबत निर्माण झालेल्या आरोपांमुळे भाविकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. या प्रकरणाची सखोल व पारदर्शक चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी करण्यात आली. या धार्मिक कार्यक्रमास तालुका संघटक प्रशांत वाघेकर, महिला आघाडी शहर संघटिका पार्बता मुखरे, अमोल राऊत, वैभव लोणार, डॉ. संजय पवार, देवराव नाखले, सुनिल क्षिरसागर, सुनिल झाडे, सुरेश चाफेकर आदी शिवसैनिक व रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एक विद्यार्थी एक वृक्ष` पर्यावरण संवर्धनाचा संदेश

जनमाध्यम / प्रतिनिधी



यवतमाळ : महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयीन परिसरात दिनांक ६ जुलै २०२६ रोजी 'एक विद्यार्थी एक वृक्ष' या उपक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे तसेच वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उषा एन. पाटील उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. संदीप उप्पोड व विद्यार्थी विकास कक्ष अधिकारी डॉ. तक्षशिला मोटघरे यांच्या नियोजन व मार्गदर्शनातून या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

# सहानुभूती नव्हे, न्याय द्या, पीक विमा योजनेचे `तीन ट्रिगर` तात्काळ लागू करा!

जनमाध्यम / प्रतिनिधी



पुसद - प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीत शेतकऱ्यांवर दया किंवा सहानुभूती नको, तर निष्पक्ष आणि निरपेक्ष न्याय द्यावा, अशी ठाम भूमिका स्वाभिमानी शेतकरी संघटनेने घेतली आहे. खरीप हंगाम २०२६-२७ साठी राज्य शासनाने गतवर्षीप्रमाणेच निकष कायम ठेवल्याने शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

संघटनेच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री व कृषिमंत्र्यांना निवेदन देत Localised Claim (LC), Post Harvest Loss (PH) आणि Area Approach हे तीन ट्रिगर तात्काळ लागू करण्याची मागणी करण्यात आली. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला. संघटनेच्या म्हणण्यानुसार, २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी, ओला दुष्काळ आणि नैसर्गिक आपत्तीमुळे मोठे नुकसान होऊनही चुकीच्या निकषांमुळे यवतमाळसारखा आत्महत्याग्रस्त जिल्हा पीक विम्यापासून वंचित राहिला. सात वर्षांची उत्पादकता, पीक कापणी प्रयोग आणि सॅटेलाइट डेटावर आधारित नुकसानभरपाईची विद्यमान पद्धत शेतकरीविरोधी असल्याचा आरोप करण्यात आला. महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त पंचनाम्यावर आधारित प्रत्यक्ष शेतपातळीवरील नुकसानीनुसार भरपाई देण्याची मागणी संघटनेने केली आहे.

# राममंदिर देणगी गैरव्यवहाराच्या आरोपांवरून शिवसेना (उबाठा) आक्रमक..!

जनमाध्यम / प्रतिनिधी

### यवतमाळात रामरक्षा महाआरती आंदोलन



यवतमाळ : अयोध्येतील राम मंदिरातील देणगीच्या कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने बुधवारी (८ जुलै) दत्त चौकात रामरक्षा महाआरती आंदोलन करण्यात आले.

महाआरती, रामरक्षा स्तोत्र व हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करून कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली. आंदोलनात जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड यांनी राम मंदिरातील देणगीच्या कथित गैर व्यवहारावर कठोर टीका करत संबंधितांवर कारवाईची मागणी केली. जिल्हाप्रमुख किशोर इंगळे यांनीही केंद्र सरकारवर निशाणा साधत जनतेच्या श्रद्धेशी तडजोड होत असल्याचा आरोप केला. महिला आघाडीच्या नेत्या सागरताई पुरी यांनीही सरकारवर टीका केली.

'चौकीदार ही चोर है'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

# पेरलेले सोयाबीन उगवले नसल्याने शेतकरी आक्रमक

## बोगस कंपनीवर गुन्हे दाखल करण्याची युवा स्वाभिमानची मांगणी

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात बोगस आणि निकृष्ट दर्जाचे सोयाबीन बियाणे विक्री झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यांच्यावर पुन्हा पेरणी करण्याची वेळ आली आहे यामुळे शेतकऱ्यांमध्ये आक्रोश निर्माण झालेला आहे. शेतकऱ्यांसाठी युवा स्वाभिमान पार्टीने कृषी सहसंचालक कार्यालयावर आंदोलन केले आणि शेतकऱ्यांना ताबडतोब नुकसान भरपाई दिल्या जाण्याची मागणी केली.

जिल्हा कृषी अधीक्षकला दिलेल्या निवेदनात म्हटले की, जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी बुस्टार हुतूतू सह इतर कंपन्यांचे सोयाबीन बियाणे सुमारे १४० रुपये प्रति किलोने खरेदी करून या खरीप हंगामात पेरणी केली होती. मात्र पेरणीनंतर मोठ्या प्रमाणात बियाणे उगवलेच नाही किंवा अत्यंत कमी प्रमाणात उगवण झाली. यामुळे शेतकऱ्यांचे बियाणे, पेरणी, मजुरी, शेत



तयारी आणि इतर कृषी कामांवर केलेला सर्व खर्च वाया गेला असून ते गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत.जिल्ह्यात विक्री झालेल्या संबंधित सोयाबीन बियाण्यांचे नमुने तात्काळ प्रयोगशाळेत पाठवून चौकशी करावी.चौकशीत दोषी आढळणाऱ्या बियाणे उत्पादक आणि विक्रेता कंपन्यांवर बियाणे अधिनियम व इतर कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी. प्रभावित शेतकऱ्यांच्या शेतांचे पंचनामे करून त्यांना बियाणे, पेरणी, मजुरी आणि इतर आर्थिक नुकसानाची भरपाई तात्काळ द्यावी. पुन बियाणीसाठी शेतकऱ्यांना दर्जेदार सोयाबीन बियाणे उपलब्ध करून द्यावे.जर शेतकऱ्यांच्या समस्या तातडीने सोडवल्या नाहीत तर संघटना शेतकऱ्यांच्या हितासाठी आणखी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

आंदोलन करणाऱ्यांमध्ये प्रकाश साबळे ,देवानंद राठोड, मंगेश इंगोले, संजय भारसाकळे, जीवन सरदार, आशिष कावरे, अजय अब्रूक, सुशील गुल्हाने, सुरज बारबुद्धे, गजानन इसळ, एकनाथ बारबुद्धे, विनोद बारबुद्धे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्यामाप्रसाद मुखर्जी जयंतीनिमित्त प्रतिमापूजन राष्ट्रसेवेचा आदर्श जपण्याचा संकल्प

**अचलपूर/वार्ताहर**



भारतीय जनसंघाचे संस्थापक, प्रखर राष्ट्रवादी विचारवंत आणि देशाच्या अखंडतेसाठी आयुष्य समर्पित करणारे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त अचलपूर येथील आमदार प्रवीण तायडे यांच्या जनसंपर्क कार्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रप्रेम, एकात्मता आणि जनसेवेच्या त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाच्या अमरावती जिल्हा ग्रामीण (मेळघाट)च्या महामंत्री नयना जोशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी ग्रामीण जिल्हाध्यक्ष शंकर मालखेडे, शहर महिला आघाडी अध्यक्षा मंगला पारधी, ग्रामीण महिला अध्यक्षा उज्वला माकोडे, ढेपे, विशाल काकड, ग्रामीण सरचिटणीस सतीश भैय्या शर्मा, विकी सावरकर, जयकृष्ण तायडे, नगरसेविका अक्षरा लहाने, वंदना येळणे सतीश शर्मा तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केले. त्यांच्या राष्ट्रनिष्ठ विचारांचे स्मरण करत देशहित, विकास आणि समाजसेवेच्या कार्यात अधिक जोमाने योगदान देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## १५ जुलैची मनपाची सर्वसाधारण सभा विविध मुद्दयांनी गाजणार

**अमरावती/का.प्र.**

जवळपास दोन महिन्यांच्या कालावधीनंतर, अमरावती महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा १५ जुलै रोजी होणार आहे. विधान परिषद निवडणुकीसाठी लागू असलेल्या आचारसंहितेमुळे मे आणि जून महिन्यांत ही सभा होऊ शकली नव्हती. बुधवार, १५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब बिडकर सभागृहात होणाऱ्या या सभेत, शहराशी संबंधित अनेक वादग्रस्त मुद्द्यांवर सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक होण्याची शक्यता आहे.

मागील अनेक आमसभेच्या बैठकांमध्ये गदारोळात अनेक महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले, परंतु त्यांच्या अंमलबजावणी अभावी लोकप्रतिनिधींमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे, यावेळी विरोधी पक्ष विविध मुद्द्यांवर प्रशासन आणि सरकार या दोघांनाही कोंडीत पकडण्यासाठी रणनीती आखत आहे.पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील लहान-मोठे नाले स्वच्छ करून जलनिःसारण प्रणाली सुधारण्याचे निर्देश देण्यात आले होते, परंतु पहिल्याच पावसात शहराच्या अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने महानगरपालिकेच्या तयारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. असा आरोप आहे की, अनेक ठिकाणी माती टाकण्याचे कंत्राट देण्यात आले होते, परंतु पैसे खर्च करूनही रस्ते अजूनही मातीने भरलेले आहेत आणि खड्डे भरले गेले नाहीत, ज्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना



सामोरे जावे लागत आहे. या मुद्द्यांवर प्रशासनाशी संपर्क साधण्यात आला आहे.

सर्वसाधारण सभेतील सर्वात मोठा मुद्दा कोनार्क कंपनीला केलेल्या देयकाचा असण्याची शक्यता आहे. मागील सर्वसाधारण सभेच्या बैठकांमध्ये, महापौर आणि अध्यक्षांनी कंपनीला पैसे न देण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. असे असूनही, हे पैसे कसे दिले गेले यावर प्रशासन उत्तरे मागू शकते. याशिवाय, स्वच्छता अभ्यास समितीच्या अहवालाच्या आधारे, कंपनीवर आतापर्यंत लावलेले दंड आणि त्यापैकी किती रक्कम वसूल झाली आहे, हे देखील विचारले जाईल.पावसानंतर खालावलेली स्वच्छता, रस्त्यांची अवस्था, प्रलंबित ठराव आणि प्रशासकीय निर्णय यांमुळे शहरातील राजकीय वातावरण आधीच तापले आहे. परिणामी, १५ जुलै रोजी होणाऱ्या आमसभेत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यात अनेक मुद्द्यांवरून जोरदार वादविवाद आणि गदारोळ होण्याची शक्यता आहे. आता सर्वांचे लक्ष या प्रश्नांवर प्रशासनाच्या प्रतिसादाकडे आणि प्रलंबित बाबींवरील निर्णयांकडे लागले आहे.तसेच, माजी न्यायाधीशांच्या पूर्वीच्या वयोमर्यादेच्या पडताळणीचा प्रस्ताव मंजूर झालेला नाही.

## थलेसेमिया, सिकलसेल रुग्णांचा दिव्यांग आरक्षणात समावेश करण्याची मागणी

### पालकांनी घेतली आ. सुलभा खोडके यांची भेट

**अमरावती/का.प्र.**

थलेसेमिया, सिकलसेल रुग्णांचा दिव्यांग आरक्षणात समावेश करण्याची मागणी सदर रूग्णांच्या पालकांनी केली आहे. यासाठी त्यांनी नुकतीच अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेवून त्यांना निवेदन दिले. आ. खोडके यांनी याबाबत शासन पातळीवर पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही संबंधितांना दिली.

आ. सुलभा खोडके यांना दिलेल्या निवेदनानुसार, भारत सरकारने २७ डिसेंबर २०१६



च्या राजपत्रात थॅलेसेमिया व सिकलसेल या आजारांचा दिव्यांगत्वाच्या मान्य श्रेणीत समावेश केला आहे. मात्र सदर अधिनियमातील कलम ३४ मधील शासकीय सेवांमधील आरक्षणाच्या तरतुदींमध्ये या आजारांचा स्पष्ट उल्लेख नसल्याने संबंधित रुग्णांना आरक्षण, शैक्षणिक सवलती, रोजगाराच्या संधी व इतर शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे केंद्राच्या विधी व न्याय मंत्रालयाकडे तसेच संबंधित केंद्रीय मंत्रालयाकडे विशेष शिारस करून अधिनियमात आवश्यक सुधारणा करावी, अशी मागणी करण्यात आली.

कलम ३४ मध्ये थैलेसेमिया व सिकलसेलचा स्पष्ट समावेश झाल्यास या रुग्णांना शासकीय सेवेत आरक्षण, शिक्षण व रोजगारात सवलती मिळून त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल होईल, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. यावेळी प्रवीण अग्रवाल, राजेश पाचखेडे, सुनील वानखडे, रवी वानखडे, किशोर गावंडे यांच्यासह रूग्णांचे नातेवाईक व पालक उपस्थित होते.

## शिरजगाव कसबा बसस्थानक धोकादायक स्थितीत

### तक्रार करूनही प्रशासनाचे दुर्लक्ष .

**चांदूरबाजार/वार्ताहर**

तालुक्यात लोकसंख्येने, सर्वात मोठे गाव शिरजगाव कसबा हे आहे. येथील राज्य परिवहन महामंडळाचो बसस्थानक, आज अक्षरशः मृत्यूच्या दारात उभे आहे. मोडकळीस आलेली इमारत, गळके छत, कोसळणारे प्लास्टर, अस्वच्छ परिसर. तसेच प्रवाशांसाठी मूलभूत सुविधांचा ही अभाव. अशा परिस्थितीत हजारो नागरिक दररोज या बस स्थानकावरून, जीव मुठीत धरून प्रवास करीत आहेत.गावकऱ्यांनी या बाबतची लेखी तक्रार ही संबंधित प्रशासनाकडे केली आहे. मात्र लेखी तक्रारी नंतरही शासन आणि लोकप्रातिनि या बसस्थानाकडे दुर्लक्ष केले आहे.

शिरजगाव कसबा हे तालुक्यातील व्यापारी, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या, अत्यंत महत्त्वाचे केंद्र आहे. परिसरातील अनेक गावांतील विद्यार्थी, शेतकरी, महिला,ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदार यांची दैनंदिन ये-जा याच बसस्थानकावरून होते. इतके महत्त्व असूनही या बसस्थानकाकडे सातत्याने दुर्लक्ष



केल्या जात आहे. आज या बसस्थानकाची इमारत अक्षरशः शेवटच्या घटका मोजत आहे.पावसाळ्यात बसस्थानकाच्या छताला मोठ्या प्रमाणात गळती लागते. प्रवाशांना आसरा घेण्यासाठी बस स्थानक,छत्री घेऊन उभे राहावे लागते.अनेक ठिकाणी प्लास्टर कोसळले असून, भिंतींना तडे ही गेले आहेत. प्रतिक्षालयातील बाकडे ही मोडकळीस आलेले आहेत. स्वच्छतागृहांची अवस्था तर दयनीय असून, पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था या ठिकाणी नाही. महिलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी, ही परिस्थिती अधिकच त्रासदायक ठरत आहे.आज बसस्थानकाच्या इमारतीची स्थिती पाहता कोणत्याही क्षणी, मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.एखाद्या निष्पाप प्रवाशाचा जीव गेल्यानंतरच, प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल गावातील,नागरिक उपस्थित करत आहेत. सार्वजनिक सुरक्षते सारख्या गंभीर विषयाकडे, इतके दुर्लक्ष करणे योग्य आहे काय?याचे उत्तर संबंधित विभागाकडे नाही.

स्थानिक नागरिकांनी राज्य परिवहन महामंडळ, जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना, तातडीने नवीन बसस्थानक मंजूर करून, विद्यमान धोकादायक इमारतीचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्याचे आवाहन केले आहे. अन्यथा तीव्र लोक आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## अमरावतीत बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

### दोषी कंपन्या,दुकानदारांवर कार्यवाही करा खा. बोंडें यांची कृषी विभागाकडे मागणी...

**अमरावती/का.प्र.**



जिल्ह्यात अनेक ठिकाणी पेरणी करूनही सोयाबीनचे बियाणे न उगवल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या गंभीर परिस्थितीवर राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी चिंता व्यक्त करत प्रतिक्रिया दिली आहे. 'बियाणे न उगवल्यामुळे बळीराजावर दुबार पेरणीची वेळ आली असून त्याला मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे,' असे डॉ. बोंडे म्हणाले.या फसवणुकीची कृषी विभागाने तातडीने दखल घेऊन सविस्तर अहवाल थेट कृषिमंत्र्यांना सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. तसेच, बोगस सोयाबीन विकणाऱ्या कंपन्या आणि संबंधित दुकानदारांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.'फसवणूक झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याला योग्य मोबदला मिळालाच पाहिजे,'या भूमिकेचा पुनरुच्चार करत, तक्रारदार शेतकऱ्यांनी न घाबरता पुढे येऊन याबाबतची माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहनही खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले आहे.

## शाळा बंद आंदोलनाला शिक्षक सेनेचा पाठिंबा

**अंजनगाव बारी-**शिक्षकांवरील वाढता अशैक्षणिक कामांचा ताण, SIR कामे, रिक्त शिक्षक पदे, TET संदर्भातील प्रलंबित प्रश्न तसेच अनुदानित व खाजगी शाळांच्या विविध समस्यांवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेने पुकारलेल्या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाला महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना (खाजगी विभाग), अमरावतीने जाहीर पाठिंबा दिला आहे.९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढून निवेदन देण्यात आहे.

## अनुदानासाठी २८८ दिवसांची प्रतीक्षा!

### शेतकऱ्यांच्या खात्यात एक रुपयाही नाही

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

केंद्र व राज्य शासन शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध योजना राबवत असल्याचा दावा करत असताना, प्रत्यक्षात अनेक पात्र शेतकरी अजूनही अनुदानापासून वंचित असल्याचे वास्तव समोर आले आहे. सन २०२५ मध्ये ठिबक सिंचन योजनेसाठी अर्ज करून साहित्य खरेदीचे बिल, हमीपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे सादर करूनही तब्बल २८८ दिवस उलटले तरी अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही.

अंजनगाव बारी येथील शेतकरी निखिल श्रीकृष्ण भोपळे यांनी ३० ऑक्टोबर



२०२५ रोजी ठिबक सिंचन संच खरेदी करून सुमारे १,०९,७६१ खर्च केला. संबंधित सर्व कागदपत्रे कृषी विभागाकडे वेळेत सादर करण्यात आली. विभागाकडून अर्जाला क्रमांकही देण्यात आला. मात्र आजपर्यंत प्रकरण 'प्रलंबित' असून अनुदानाचा एकही रुपया मिळालेला नाही.धक्कादायक बाब म्हणजे, अनुसूचित जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील अनेक लाभार्थ्यांना मागील वर्षाचे तसेच चालू वर्षाचे अनुदान मिळाले आहे. मात्र ओबीसी प्रवर्गातील अनेक पात्र शेतकरी अजूनही प्रतीक्षेत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.


निखिल भोपळे यांच्यासारखे किमान ७५ शेतकरी सध्या याच समस्येला सामोरे जात असून, सर्व कागदपत्रे पूर्ण करूनही त्यांचे अर्ज महिनोनमहिने प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून शासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, अर्ज मंजूर होऊन क्रमांक लागल्यानंतरही अनुदान वितरणात होत असलेला विलंब हा अन्यायकारक आहे. शासनाने पात्र लाभार्थ्यांमध्ये कोणताही भेदभाव न करता सर्व प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करून अनुदानाची रक्कम त्वरित वितरित करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

## संक्षिप्त

### कृषी पायाभूत सुविधा उभारणीसाठी अर्थसहाय्य

**अमरावती-** शेतमालाचे मूल्यवर्धन, साठवणूक, प्रक्रिया आणि विपणन व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारच्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेंतर्गत अर्थसहाय्य दिले जाते. यासाठी १९ जून ते २० जुलै दरम्यान विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येणार आहे. यासाठी पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.ही योजना ऑगस्ट २०२० मध्ये आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत सुरू करण्यात आली असून, पीक काढणीनंतरची कृषी पायाभूत सुविधा आणि सामुदायिक शेतीसाठी आवश्यक सुविधांची निर्मिती करण्यासाठी सवलतीच्या कर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील पात्र वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, संस्था, प्राथमिक कृषी पतसंस्था, सहकारी संस्था, कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, स्वयंसहायता गट आणि कृषी क्षेत्रातील इतर पात्र संस्थांनी ऑनलाइन अर्ज करावे लागणार आहे. कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेची विशेष अंमलबजावणीसाठी मोहीम १९ जून ते २० जुलै या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान जिल्ह्यात कार्यशाळा,बँक समन्वय बैठका आणि लाभार्थी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. योजनेत मंजूर होणाऱ्या २ कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत देण्यात येते.कर्जासाठी क्रेडिट गॅरंटी सुविधेचाही लाभ उपलब्ध आहे. यात गोदामे, शीतगृहे,पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, कृषी लॉजिस्टिक्स,सायलो, रिपनिंग चेंबर, ई-मार्केट सुविधा, जैव इनपुट उत्पादन युनिट आणि कस्टम हायरिंग सेंटर आदी प्रकल्पांना या योजनेतून अर्थसहाय्य दिले जाणार आहे.जिल्ह्यात संत्रा, केळी, कांदा, भाजीपाला आणि इतर नाशवंत कृषी उत्पादनांचे उत्पादन होते. तसेच कडधान्यामध्ये तूर, हरभरा व कापूस उत्पादित होतो. अशा उत्पादनांची गुणवत्ता, साठवण क्षमता, प्रक्रिया सुविधा आणि बाजारपेठेपर्यंत पोहोच अधिक प्रभावी करण्यासाठी आधुनिक गोडाऊन,दाल प्रक्रिया उद्योग, कापूस जिनिंग व प्रेसिंग, साफसफाई व ग्रेडिंग युनिट इत्यादी आधुनिक कृषी सुविधा उभारण्यासाठी ही योजना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.पात्र संस्थांनी अर्ज करावेत, असे आवाहन आत्माच्या प्रकल्प संचालिका अर्चना निस्ताने यांनी केले आहे.

### साईबाबा विद्यालयात प्रवेशोत्सव साजरा



**अमरावती-**श्री आयुर्वेद एवं शिक्षण विकास मंडळ, अमरावती द्वारा संचालित श्री साईबाबा विद्यालय, साईनगर,येथे शालेय सत्राच्या पहिल्या दिवशी शाळेत प्रवेश घेतलेल्या वर्ग ५ वीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे उत्साहात फुलांचा वर्षाव, पुष्पगुच्छ, टिळक व टोपी देऊन स्वागत करण्यात आले. तसेच वर्ग ६ वी व ७ वीच्या विद्यार्थ्यांनी वेलकम डान्स सादर केला व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक राजेश टावरी तसेच पर्यवेक्षक आशिष पसारकर यांच्या हस्ते शालेय पुस्तकांचे वितरण करण्यात आले.याप्रसंगी विद्यार्थी,पालक वर्ग, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते.तसेच सर्व ५ ते ८ च्या विद्यार्थ्यांना खिचडी व गोड पदार्थाचे वाटप करण्यात आले.मुख्याध्यापक यांनी स्वच्छता व पर्यावरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले व शालेय नियमांची माहिती तसेच २०२५-२६ मध्ये विद्यालयाच्या दहावीच्या निकालाबाबत अवगत केले.सर्व दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### शैक्षणिक साहित्य वाटप करून वाढदिवस साजरा

**चांदूररेल्वे-**तालुका व शहर शिवसेनेच्या वतीने दिव्यांग कैवारी,



शिवसेना नेते आमदार बच्चू कडू यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य,पेन, पेन्सिल,नोट बुक व मुलांना बिस्कीट नास्ता वाटप करून आमदार बच्चू कडू यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेश पांडे,शहर प्रमुख गोलू यादव, श्रीकांत शिंदे फाउंडेशनचे जिल्हा अध्यक्ष गोपी यादव,आकाशचौधरी, भैय्या डोंगरे,अजय माहुलकर,रोहित पवार,ओम शेलार,तुषार खोडके सह असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती-**अमरावती विभागातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२६-२७ राबविण्यास शासनाने मान्यता दिली असून, पात्र शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांनी केले आहे.

शासन निर्णय दि. ३ जुलै २०२६ नुसार ही योजना Cup & Cap Model (८०:११०) अंतर्गत खरीप २०२६ व रब्बी २०२६-२७ हंगामासाठी अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी राबविण्यात येणार आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देणे, कृषी उत्पादनातील जोखीम कमी करणे आणि आर्थिक स्थैर्य राखणे हा योजनेचा उद्देश आहे.योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक असणे तसेच डिजिटल पीक सर्वेक्षण मध्ये पिकांची नोंद करणे अनिवार्य आहे. प्रति अर्ज किमान ०.१० हेक्टर क्षेत्राची अट असून, खातेदार, कुळाने किंवा नोंदणीकृत भाडेकरारावर शेती करणारे शेतकरी पात्र आहेत.योजनेअंतर्गत खरीप पिकांसाठी शेतकरी हिस्सा २ टक्के, रब्बी पिकांसाठी १.५ टक्के आणि नगदी पिकांसाठी ५ टक्के इतका मर्यादित ठेवण्यात आला आहे. योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. खरीप २०२६ साठी बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी (बुलढाणा, वाशिम), एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी (अकोला) आणि इफ्को टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी (अमरावती, यवतमाळ) यांची विमा कंपन्या म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.जिल्हानिहाय पीकनिहाय शेतकरी हिस्सा विमा हप्ता दर प्रति हेक्टर पुढीलप्रमाणे आहेत. बुलढाणा जिल्ह्यात सोयाबीनसाठी १,२५०, मूगसाठी ७५, उडीदसाठी ६७.५०, तुरीसाठी ९४०, कापसासाठी १,३०० आणि मक्यासाठी १०० विमा हप्ता आहे. अकोला जिल्ह्यात खरीप ज्वारीसाठी ८२.५०, सोयाबीनसाठी १,२१८, मूग व उडीदसाठी प्रत्येकी ४७८.८०, तुरीसाठी ८७३.६० आणि कापसासाठी ६०९ विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे. वाशिम जिल्ह्यात सोयाबीनसाठी १,२१८, मूग व उडीदसाठी प्रत्येकी ५९.८५, तुरीसाठी ८७३.६० आणि कापसासाठी १,२१८ विमा हप्ता आहे. अमरावती जिल्ह्यात भातासाठी ६५०, खरीप ज्वारीसाठी ६६०, सोयाबीनसाठी १,२५०, मूगसाठी ५९४, तुरीसाठी ९४०, कापसासाठी ९७५ आणि मक्यासाठी ८०० विमा हप्ता आहे. यवतमाळ जिल्ह्यात खरीप ज्वारीसाठी ६२८, सोयाबीनसाठी ९६०, मूगसाठी ५६०, उडीदसाठी५४०, तुरीसाठी९४० आणि कापसासाठी १,२५० प्रति हेक्टर शेतकरी हिस्सा विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे.शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी कार्यालय, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय किंवा नियुक्त पीक विमा कंपनीशी संपर्क साधून ३१ जुलै २०२६ पूर्वी अर्ज सादर करावेत, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांनी केले आहे.

# मग त्याला दोष देऊन कसे चालेल?

पाऊस कोपलाय असं लोक म्हणताहेत..
वर्षाची सरासरी अवघ्या काही दिवसांत गाठत तो वेड्यासारखा कोसळतोय.
मात्र असं काही नाही. त्याचं कुठं काय चुकलंय?
पूर्वी तो वेळेवर न चुकता जूनच्या पहिल्या आठवड्यात यायचा
आणि सप्टेबरअखेर पर्यंत दमादमाने आस्ते कदम बरसत राहायचा.
शाळेच्या सुरुवातीला पोराठोरांसंगे दंगा करायचा.

ज्येष्ठात तांबड्या मातीतल्या भातशेतीतून
लोळण घेत शिवारभर फिरून दमल्यावर
कौलारू घरांवरून घसरगुंडी खेळायचा...
आषाढात वारकऱ्यांच्या पायात घुटमळत
दिवेघाटातून दरवळत भवतालात घुमायचा,
काळ्या मातीत पेरलेल्या बीजांना
गोंजारायचा, आभाळमाया करायचा.
सह्यकड्यापासून सातपुड्यापर्यंत
डोंगररांगांवर अभिषेक करायचा,
वसिष्ठीला वंदन करुन तापीच्या पायावर लीन व्हायचा,
त्याचा हा प्रवास ठरलेला असायचा...

वाटेतल्या बांधाबांधांवर वडिलकीच्या मायेने हात फिरवायचा,
एखाद्या चंद्रमौळी झोपडीत वाकून बघताना गहिवरून यायचा,

ओल्या बाळंतीणीच्या अंधारल्या खोलीत
डोकावून पाहताना बाळाच्या मखमली
पायाला गुदगुल्या करायचा.
गावागावातल्या मंदिरांची शिखरे अन
मस्जिदींचे मीनार स्वच्छ धुवून काढायचा,
वेशीवरच्या जीर्ण पिंपळाला आलिंगन द्यायचा,
पारावरच्या वटवृक्षाच्या पारंब्यांशी झोंबायचा.
गावकुसातल्या म्हाताऱ्या कोताऱ्यांच्या
डोईवरल्या चांदीला स्पर्श करुन
अंगणातल्या तुलसी वृंदावनाला वंदन करायचा...

पांदीतल्या आंब्यापाशी आठवणींची सय
कुशीत घेऊन झोपायचा,
गावांच्या शिवेपाशी थरथरून जायचा.
ओढ्यांच्या कडेने वाहताना
अनंतात लीन झालेल्यांचे अस्तित्व शोधत फिरायचा,

कडेवर नातवंडे घेऊन चाललेल्या वृद्धांच्या
भाळाचे चुंबन घ्यायचा.
मातीत कोसळून अंकुराच्या देठातून उगवून यायचा
म्लान झालेल्या गवतफुलांना लकाकी द्यायचा.

पूर्वीचा पाऊस बोलायचा म्हणे!
माणसंच नव्हे तर झाडंझुडपं पशू पक्षी



देखील त्याच्याशी संवाद साधायचे!
पहिल्या पावसाच्या वेळी त्याचे पूजन व्हायचे,
गांवतळे तुडूंब भरल्यावर ओटी भरायचे.
पाऊसही मग जाम खुश व्हायचा
आपल्या लेकरांवर तालासुरात कोसळायचा.
श्रावणात माहेरी आलेल्या माहेरवाशिणींच्या डोळ्यातून वाहायचा,
तिच्या संगे ऊंच झुल्यावर विहरताना रडता रडता हसायचा.

भाद्रपदात परतीच्या पावसाची पावले जड व्हायची,
गोठ्याचं दावं तोडून गेलेल्या वासरागत वागायचा
लहर आली तर परत यायचा नाहीतर माळांवरच्या झाडांत दडून बसायचा.

निरोप घेताना तो ओक्साबोक्शी रडायचा!
घरादाराला आशीर्वाद देऊन जायचा,
सूरपारंब्या खेळताना फांद्यांवर केलेल्या खुणांपाशी रेंगाळायचा.

शहरातल्या डांबरी सडकांवर इंद्रधनुष्य रेखाटायचा,
बागेत बसलेल्या जोडप्यासंगे ओला कंच होऊन जायचा,
गल्लीच्या कोपऱ्यावरल्या टपरीवर
चहाच्या वाफाळत्या चॉकलेटी द्रावणावर जीव लावायचा.
भिजून घरी गेलेल्या चाकरमान्यासंगे घरात मुक्त शिरायचा
आणि थकलेल्या आईच्या हातची गरमागरम
भजी खाऊन पुन्हा बाहेर पडायचा,
नव्याने कोसळण्यासाठी!
प्रेमिकांच्या पहिल्या आलिंगनाशी एकजीव
होताना पुरता रोमॅण्टिक व्हायचा,
तिच्या गालावरून ओघळत यायचा
आणि त्याच्या ओठांवर स्थिरावायचा.
चेन पडलेल्या सायकलमागे फरफटत जायचा,
हायवेवरून सुसाट जाणाऱ्या गाड्यांच्या
चाकांशी स्पर्धा करायचा.

कोसळताना तो काळी तांबडी माती असा भेद करत नसे;
बोरी बाभळींनाही माया लावायचा
आणि बकुळ प्राजक्तांवरही प्रेम करायचा.

पूर्वी त्याचे काही शिरस्ते होते,
त्याचा एक मौसम होता,
त्याची एक पद्धत होती,
त्याचं एक वेळापत्रक होतं.

पूर्वी माणसांचंही वेळापत्रक होतं म्हणे..
आता लोकांपाशी वेळच उरला नाहीय.
सगळ्याची घाई आहे,
सावकाश निगुतीचं काही उरलंच नाही.
खाणं पिणं असो वा असो झोपणं,
सगळं घाईतच असतं.
मनमुराद गप्पादेखील होत नाहीत,
फुरसतीनं भटकणं होत नाही व्यक्त होण्याचीही घाई असते,
नावालाच बोलायचे असते मन मात्र जागेवर नसते.
रस्त्यांनी घाई, जायची घाई यायची घाई.
ब्रेकअपची सुद्धा असते घाई!
नुसती घाई!

पूर्वी घराबाहेर पडताना उंबऱ्यापाशी हलणारा हात असायचा,
सोज्वळ हसायची अंगणातली जाई आणि प्रेमळ आई!
आता कुठले छंद उरले नाहीत की कुठल्या
आवडी हौसेने राहिल्या नाहीत
मने जुळायच्या आधीच तुटायची आस असते,
मागे सिनेमे महिनोनमहिने थियेटरवर असत
आता चारच दिवसांत त्यातली मजा संपलेली असते,
पूर्वी एखादं गाणं वर्षभर ऐकलं जायचं,
आता दिवसागणिक हिट गाणं बदलतं!
पूर्वी रोज थोडे थोडे पैसे साठवत असत
आता बसतात जॅकपॉटसाठी तिष्ठत,
आताशा तासाला बिग ब्रेकिंगची बातमी बदलते
त्यातलं मूल्यही मिनिटांत संपून गेलेलं असतं!
सकाळची गोष्ट संध्याकाळी राहत नाही,
रात्रीच्या आणाभाका सकाळी स्मरत नाहीत!

महिन्याचं काम एका दिवसात करायचं असतं
वर्षाचं पीक एका महिन्यात काढायचं असतं,
सालभराची कमाई तासात हवी असते,
इतकेच काय कुठली शहाणिवही आता नकोशी असते,
सणवाराला माहेरी यायचीही ओढ नसते.
मौतीला सुद्धा आता माणसं येत नाहीत,
आरआयपीचा मेसेज पाठवतात.
जिवलगांपाशी बसायला माणसांना वेळ नसतो
मायबापांना पोराबाळासाठी नि पोरांना आईसाठी टाइम नसतो
आणि पतीच्या छातीवर मस्तक टेकवायला पत्नीला उसंत नसते.
मैदानांवर खेळासाठी मुलांना सवड नाही,
पुस्तके ही तिष्ठत असतात वाचणाऱ्या हातांच्या प्रतिक्षेत.
सालं ते प्रेमसुद्धा इन्स्टंट असतं,
सकाळी दृष्टादृष्ट झाल्यावर दुपारीच आडोसा शोधत फिरतं!
श्रमलेल्या पायांवर मस्तक टेकायची ओढ नसते कुणाला,
दमलेल्या हातांना धन्यवाद द्यायला आवडत नाही कुणाला
विचारलाच जाब कुणी तर सरळ सरळ
उत्तरतात - वेळच नाही हो कुणाकडे,
हल्ली टाईम भेटत नाही दुनियेला!

पावसाचंही तसंच झालंय,
आताशा वेळ नसतो त्याच्याकडे.
वर्षाची सरासरी एका दिवसांत गाठतो
कधी कधी महिनाभर येत नाही कुठे तरी बिझी असतो!'
अचानक येतो मग.
सुट्टीवर एक दिवसासाठी घरी परत आलेल्या मुलासारखा,
पहाटेच येतो, त्याच दिवशी परतण्याचे वेध डोळ्यात घेऊन!
विचारलं तर म्हणतो आता मन रमत नाही गं आई!

पावसाचंही तसंच झालंय त्याचं आता मन रमत नाही,
आता तो बसरतो फक्त बॅकलॉग भरण्यासाठी,
त्याच्याकडे वेळ उरला नाही,
तो कुणाची विचारपूस करत नाही की,
कुणाच्या मस्तकावरून मायेचा हात फिरवत नाही..

दोस्तहो पाऊस बदललेला नाही
आणि चुकलेलाही नाही,
तो तर आपल्यासारखंच वागतोय!
मग त्याला दोष देऊन कसे चालेल?

तरीही एका गोष्टीने व्याकुळ व्हायला होतं
अपराध, चुका करतात वेगळेच लोक
आणि त्याचे वेदनासूक्त गावे लागते
भुकेजलेल्या श्रमलेल्या अर्धपोटी निरपराधांना
हा कसला न्याय म्हणायचा?

**समीर गायकवाड**

# सामान्य माणूस आणि योग

सुमारे १०-१२ वर्षांपूर्वी विदर्भात शेकडो कुटुंबांची आर्थिक फसवणूक झाली.'२ वर्षात पैसे दुप्पट होतील'असे आमिष दाखवून लोकांकडून लाखो रुपये ठेव म्हणून घेतले गेले.सुरुवातीला काही लोकांना खरंच २ वर्षांनी दुप्पट पैसे परत मिळाले.त्यामुळे 'आपले पैसे सुरक्षित आहेत आणि लवकर दुप्पट होतात'असा विश्वास लोकांचा बसला.मग आणखी लोकांनी पैसे ठेवले.ज्यांना दुप्पट पैसे मिळाले होते त्यांनीही पुन्हा तीच रक्कम ठेवली.पण शेवटी जेव्हा पैसे घेणाऱ्यांनी हात वर केले,तेव्हा शेकडो मध्यमवर्गीय लोकांना मोठा धक्का बसला. लोभामुळे माणूस चुकीचे निर्णय घेतो, हे यातून दिसून आले.

आता आपली जीवनशैली ४०-५० वर्षांपूर्वीच्या तुलनेत खूप वेगवान,थोडी असुरक्षित आणि स्पर्धात्मक झाली आहे.या नवीन जीवनशैलीशी जुळवून घेताना फक्त वृद्धांनाच नाही तरुणांनाही त्रास होतोय.त्रास, दुःख,ताण आपल्याला आवडत नाही. पूर्वीपेक्षा आता प्रत्येकाला स्वातंत्र्य हवे आहे आणि ते प्रमाण आधीपे ेक्षा जास्त वाढले आहे.

कुटुंब आणि समाजाची रचना आज तुटत चालली आहे.पती-पत्नी, आई-वडील आणि मुले,भाऊ-बहिण यांच्यातले संबंध आधी सारखे चांगले राहिले नाहीत.प्रत्येक घरात भांडणे,वाद ऐकायला मिळतात.लग्न झाल्यानंतर लगेच घटस्फोटासाठी कोर्टात जाणाऱ्या लोकांची संख्या खूप वाढली आहे. त्यामुळे समाज आजारी होत चालला आहे.अर्थव्यवस्था आणि सरकारच्या व्यवस्थेमुळे ही अस्थिरता आणि असुरक्षितता वाढत आहे.

यावर उपाय म्हणून व्यवस्था बदलली पाहिजे,असे डाव्या आणि उजव्या विचारवंतांचे मत आहे.उजव्या विचारवंतांना जुन्या कुटुंब आणि समाज रचना परत आणायच्या आहेत. त्या कशा पुन्हा उभ्या करता येतील याचा ते विचार करतात.सरकार आणि धर्माच्या मदतीने ते प्रयत्नही करत आहेत.पण हे प्रयत्न फेल होत आहेत हे त्यांनाही माहीत आहे.आपल्याकडे 'धर्म' म्हणजे 'कर्तव्य' असा अर्थ घेतला जातो.

पत्नीचे कर्तव्य,मुलाचे कर्तव्य,आईचे कर्तव्य,जातीचे कर्तव्य अशा प्रकारे धर्माचे नियम सांगितले जातात.या धर्मात स्वातंत्र्याला फारसा वाव नसतो.पण आता नवीन परिस्थितीत व्यक्तीस्वातंत्र्याच्या आकांक्षा उफाळून आल्या असताना स्वातंत्र्य आणि कर्तव्य यांचा मेळ कसा साधावा, हा पेच उजव्या चिंतकांसमोर उभा आहे.डाव्या मंडळींना जे व्यवस्थापरिवर्तन हवे आहे,ते घडवून आणण्यासाठी प्रयत्नरत असलेल्या नेत्यांचे व कार्यकर्त्यांचे स्वतःचे व्यक्तित्व बदललेल्या व्यवस्थेला धारण करण्याइतके सक्षम राहील का,हा ही वेगळा पेच आहेच. मागील शे-दीडशे वर्षांचा इतिहास तशी खात्री देत नाही. शिवाय सामान्य माणूस व्यवस्था परिवर्तनासाठी तात्काळ काही करू शकत नाही.परंतु या अस्वस्थ,असुरक्षित, दुःखदायी अवस्थेतून बाहेर पडून निदान आपल्या व्यक्तित्वात व आसपास काही परिवर्तन घडवून आणण्याची सामान्य माणसांमध्ये देखील क्षमता असते.रोजच्या जगण्यातून काही अनुभव घेऊन आपण सगळे थोड्या-थोड्या प्रमाणात हळूहळू बदलत असतोच.निसर्गक्रमाने वासना-भावना या मानवामध्ये आधी प्रगटल्या आणि इतर प्राण्यांमध्ये नसलेल्या बुद्धीवैभवाने मानवाला आपल्या वासना-भावना नियंत्रित करण्यात सहाय्य केले. तरीही आपण स्वतःचे थोडे बारकाईने निरीक्षण केले तर असे सहज आढळून येईल की आपल्या बुद्धीवर वेळोवेळी वासनांचे अथवा भावनांचे अधिक नियंत्रण राहते आणि त्यामुळे बुद्धी योग्य तो निर्णय योग्य त्या वेळी घेऊ शकत नाही. बुद्धीला अधिक समर्थ,ज्ञानी व प्रकाशित करण्यास सामान्य माणूस देखील कसा योग करू शकतो आणि त्या योगासाठी देवावर श्रद्धा ठेवणे आवश्यक कसे नाही,याबाबत आपण पुढील लेखात विचार करू.

**किशोर देशपांडे**

# 'बायको' नावाची एक गुप्तहेर संस्था

जगामध्ये CIA, RAW, FBI, Mossad अशा कितीतरी गुप्तहेर संस्था आहेत.त्यांच्याकडे सॅटेलाईट्स, ड्रोन, हॅकर्स, एजंट्स आणि अब्जावधींचे बजेट असते.पण तरीही त्यांना जी माहिती मिळवण्यासाठी महिने लागतात,ती माहिती बायकोला दोन मिनिटांत मिळते.

बायकोची सर्वात मोठी ताकद म्हणजे ती पुरावा शोधत नाही,ती सुगावा शोधते. आणि सुगावा मिळाला की पुरावा आपोआप तयार होतो.नवरा घरात आला की सर्वप्रथम चेहरा स्कॅन होतो. आज जरा जास्त खुश दिसतोय का? जरा जास्त शांत आहे का? नेहमीपेक्षा जास्त बोलतोय का? किंवा नेहमीपेक्षा कमी बोलतोय का? प्रत्येक गोष्टीतून तपासाची दिशा ठरते.

मोबाईलवर मेसेज आला आणि नवरा हसला की चौकशी सुरू.'कोण आहे?' हा साधा प्रश्न नसतो.ती प्राथमिक चौकशी असते.त्यानंतर गरज पडल्यास सखोल तपास केला जातो.

नवऱ्याला वाटते की तो खोटे चांगले बोलतो. पण बायकोला खोटे पकडण्यासाठी लाय डिटेक्टरची गरज नसते.'तुम्ही काहीतरी लपवत आहात' हे वाक्य ती एवढ्या आत्मविश्वासाने बोलते की माणूस खरं सांगायच्या आधी स्वतःच कबूल करायला तयार होतो.

घरात हरवलेल्या वस्तू शोधण्याची तिची क्षमता तर संशोधनाचा विषय आहे.चावी, पाकीट,रिमोट,गाडीची किल्ली, आधार कार्ड, पॅन कार्ड, बँकेचे पासबुक...नवरा दोन तास शोधतो.बायको येते आणि पाच सेकंदात शोधून देते. मला आजही वाटते घरातल्या वस्तूंशी तिचा थेट संपर्क असावा.

पैसे लपवण्याचा प्रयत्न करणारे नवरे हा पृथ्वीवरील सर्वात आशावादी जीव असावा. कारण कपाटात,पुस्तकात,जुन्या पाकिटात, बॅगेत किंवा गाडीच्या डॅशबोर्डमध्ये लपवलेले पैसे शेवटी बायकोलाच सापडतात.आणि विशेष म्हणजे तिला पैसे सापडतात ते घर साफ करताना. नवऱ्याला मात्र ते कधीच सापडत नाहीत.

फोनवर बोलताना मागे कोणता आवाज येतोय यावरून लोकेशन शोधण्याची कला फक्त बायकांकडे असते.'ऑफिसमध्ये आहे' असे सांगितल्यावर मागे कटिंग चहाचा आवाज आला की केस तिथेच संपते.

बायकोची स्मरणशक्ती ही जगातील आठवे आश्चर्य आहे.काल काय झाले हे आपण विसरतो.पण तिला २०१३ मध्ये आपण नेमके कोणत्या दिवशी काय बोललो होतो हे आठवते. आणि वाद सुरू झाला की त्या फाईली पुन्हा उघडल्या जातात.



मित्रांसोबत कुठे गेलात,कोण कोण आले होते, कोणी बिल भरले, कोण उशिरा आला आणि कोण आधी निघून गेला याची माहिती तिच्याकडे आधीच असते.या माहितीचा स्रोत आजपर्यंत कोणालाच सापडलेला नाही. बहुतेक हा एक स्वतंत्र गुप्तहेर विभाग असावा.

बायकोला संशय यायला पुरावा लागत नाही.'काहीतरी गडबड आहे' हे वाक्य ती म्हणाली की तपास सुरू झाला समजायचा. गंमत म्हणजे दोन दिवसांनी खरेच काहीतरी गडबड निघते. नवऱ्याच्या खिशात किती पैसे आहेत,बँकेत किती आहेत, कोणाला उसने दिले आहेत, कोणाकडून घ्यायचे आहेत आणि कोणता खर्च लपवला आहे याची माहिती बायकोला असते. काही वेळा बँकेपेक्षाही जास्त.

नवरा नवीन शर्ट घालून आला की लगेच प्रश्न येतो, 'नवीन घेतला का?' तीन वर्षांपूर्वी घेतलेला शर्ट असला तरी तिला आठवते की तो शेवटचा कधी घातला होता. त्यामुळे कपाटाचे इन्व्हेंटरी मॅनेजमेंट सुद्धा तिच्याकडेच असते.

सगळ्यात मोठी गोष्ट म्हणजे बायकोला काही सांगण्याची गरज नसते.अनेक वेळा तुम्ही काही बोलायच्या आधीच ती म्हणते,'मला माहिती आहे.'आणि दुर्दैवाने,बहुतेक वेळा तिला खरेच माहिती असते. म्हणूनच जगातल्या कोणत्याही गुप्तहेर संस्थेपासून तुम्ही कदाचित वाचू शकाल.पण बायकोपासून काही लपवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे टॉर्च घेऊन सूर्य शोधण्यासारखे आहे.कारण CIA माहिती गोळा करते. RAW माहिती गोळा करते. FBI माहिती गोळा करते.

पण बायको...

माहिती गोळा करते, तिचे विश्लेषण करते, निष्कर्ष काढते आणि निकालसुद्धा जाहीर करते!

(काही स्व अनुभव व काही इकडचे/तिकडचे उचललेले)

( साभार वॉट्सअॅप)

# पायाभूत सुविधा क्षेत्र आवडे सर्वांना!

उशिरा आलेल्या पावसाने देशात,विशेषतः महाराष्ट्रात आणि मुंबई महानगर परिसरात धुमाकूळ घातला.अगदी नवे कोरे पायाभूत सुविधा प्रकल्प,विशेषतः रस्ते,हायवे,बोगदे यांना तडे गेले आणि साहजिकच आम्हाला सांगितला जात असलेला हाच काय तो विकास का? असा प्रश्न विचारला जाऊ लागला!

खरेतर कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था ठीक काम करत आहे की नाही याची अल्टिमेट टेस्ट.. त्या देशातील कुटुंबांचे राहणीमान सुधारले का?पुढची पिढी शरीराने/मनाने/शिक्षणाने सुदृढ बनली का? देशातील बहुसंख्य जनता,शासकीय मदतीवर नव्हे तर स्वकष्टाने कमावलेल्या पैशातून आपले राहणीमान टिकवू/सुधारू शकते का? देशाचे पर्यावरण स्वस्थचित्त आहे का? या व अशा निकषांवर जोखली गेली पाहिजे

पण आम्ही देशाचा विकास करत आहोत, आमचे डबल इंजिन सरकार आहे असा दावा करणारे,गेली १२ वर्षे सत्तेवर असणाऱ्या भाजप सरकारने आर्थिक विकास म्हणजे पायाभूत सुविधा निर्माण असे समीकरण तयार केले आहे ; हायवे,एक्सप्रेस वे,विमानतळ,रेल्वे, मेट्रो , बुलेट ट्रेन यांचा महापूर आणला आहे.

याचे महत्वाचे कारण म्हणजे पायाभूत सुविधा क्षेत्र हे असे क्षेत्र आहे की त्यातून एकाचवेळी अनेकानेक अर्थ घटकांना त्यांना पाहिजे ते मिळवून देता येते. कसे ते बघूया.

१.पायाभूत सुविधा क्षेत्राला भरपूर जमीन लागते. र्थ्ह् घ्व्हाहेग्न.पायाभूत सुविधा ज्या ठिकाणी उभ्या करायच्या तेथे असे हजारो किमीचे प्लॉट एकहाती मिळत नाहीत. म्हणून मग छोटे/ मध्यम जमिनीचे तुकडे विकत घेऊन मोठे प्लॉट तयार केले जातात. जमिनीच्या खरेदी विक्री मध्ये हजारो कोटी रुपये गुंतलेले असतात. जमिनींच्या व्यवहाराची खासियत म्हणजे त्यात काळा पैसा सहजपणे रिचवला जातो.

२. ज्या ठिकाणी पायाभूत सुविधा प्रकल्प येणार आहेत,त्याची माहिती सत्ताधारी पक्ष/ वर्गाला सर्वात आधी माहित असते. त्या लॉबीज स्वतःहून/बेनामी जमिनी खरेदी करून नंतर अनेक पटींनी चढ्या भावात पायाभूत सुविधा प्रकल्पाला/कंपनीला विकतात. अनेक दशकांचे जमिनीचे ओरिजनल मालकष्ठ.. सुके राहतात. यातून प्रचंड पैसा खेळवला जातो. राजकीय नेते/कार्यकर्ते/नोकरशहा/उद्योजक/आण अनेक पायऱ्यावरचे मध्यस्थ सर्वांची चांदी होते

३.या क्षेत्रात कंत्राटदार नेमण्याचा प्रचंड वाव असतो. एखाद्या प्रकल्पाचे ब्रेडच्या लादीचे जसे स्लाइस केले जाऊ शकतात,तशी प्रकल्पाची स्लाइस करून कंत्राटे दिली जातात. सत्ताधाऱ्यांच्या आजूबाजूला असणाऱ्या लोकांना कंत्राटे दिली जातात.त्यातील कट्स योग्य त्या ठिकाणी पोचवले जातात. हीच लोक सत्ताधारी पक्षाला निवडणूक निधी पुरवतात

४.सर्वांना पटवता येते,निसर्गाला कसे पटवणार.निसर्गाचा कोप झाला की मग कमी गुणवत्ता असणारे प्रकल्प कोसळतात , त्यांना तडे जातात.

कमी गुणवत्तेचा संबंध पुन्हा कट्सशी असतो.त्यातून पुन्हा नव्याने दुरुस्तीची किंवा काही वर्षांपूर्वीचा प्रकल्प पाडून नवीन बांधणायसाठी नवीन कंत्राटे दिली जातात. सायकल सुरूच राहते.

५. सार्वजनिक स्रोतातून समजा , देशातील कोट्यवधी शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारली तर तो बदल अनेक वर्षानंतर दिसतो आणि म्हटला तर अप्रत्यक्ष असतो. महाकाय पायाभूत सुविधा तयार करून राजकीय नेत्यांना नागरिक मतदारांवर इम्प्रेशन मारता येते..उद्घाटने करता येतात,चमकोगिरी करता येते,मोठे मोठे फ्लेक्स उभारता येतात ष्ठ.बघा देशाचा,राज्याचा आम्ही विकास केला, करत आहोत,भविष्यात करणार आहोत म्हणून आम्हांला मतदान करा असा आवाहन करता येते..

६.देशाच्या थिजू शकणाऱ्या जीडीपीला चालना देता येते.गेली दहा वर्षे केंद्रीय अर्थसंकल्पातून अक्षरशः लाखो कोटी रुपये पायाभूत सुविधा क्षेत्रावर खर्च केले गेले आहेत. फक्त २०२६-२७ या एका अर्थसंकल्पात १२ लाख कोटी. म्हणजे अर्थसंकल्पाच्या एक चतुर्थांश निधी.

७.सिमेंट, पोलाद, बांधकाम मशीनरी आणि अनेक उद्योगांना/ मोठ्या कंपन्यांना हजारो कोटी रुपयांचा धंदा मिळतो. त्यांच्या शेअर्सचे भाव वधारतात,शेयर मार्केट वधारते, देशातील परकीय गुंतवणूकदार खुष होतात

८. पायभूत सुविधा प्रकल्प भांडवल सघन / कॅपिटल इंटेन्सिव्ह असतात. त्यात देशातील, परदेशातील हजारो कोटींचे भांडवल रिचवले जातेष्ठअतिरिक्त भांडवलाच्या ओझ्याखाली भांडवलशाही प्रणाली कोसळण्याचा धोका अंशतः टळतो.जागतिक बँकेपासून अनेक थिंक टँक्स धोरण वकिली करणारे टाळ्या वाजवतात. भारताच्या राज्यकर्त्यांना शाबासकी देतात.

९.बांधकाम उद्योगाची खासियत आहे की त्यात कुशल, अर्धकुशल,अकुशल सर्वच प्रकारच्या कामगार,श्रमिकांना रोजगार मिळतो. त्यातील अनेक जण देशातील अविकसित राज्यातून स्थलांतरित मजुर म्हणून येतात. त्यामुळे अविकसित राज्यांची राजकीय नेतृत्वाची दिवाळखोरी झाकायला मदत होते

१०.पायाभूत सुविधा प्रकल्पामध्ये अमलबजावणी करताना आणि नंतरची काही वर्षे जोखीम असते. त्या जोखमीच्या फेजमध्ये खाजगी कॉर्पोरेट क्षेत्राला जोखीम घ्यायची नसते.

असे प्रकल्प काही वर्षांनी स्थिरावले, त्यातून चान्गले कॅश फ्लो मिळू लागले की केंद्र सरकार 'नॅशनल मोनेटायझेशन प्रोग्रॅम' च्या नावाखाली ते प्रकल्प खाजगी देशी/परदेशी कॉर्पोरेटना देऊ लागते.

खोके पेट्यांच्या पलीकडे प्रत्येक क्षेत्राची एक राजकीय अर्थव्यवस्था असते. पायाभूत सुविधा क्षेत्र आवडे सर्वांना!

**संजीव चांदोरकर**

# मुंढेंच्या 'दणका'ला हायकोर्टचा झटका!

**■गोरस भंडारवरील कारवाई अवैध ठरवत एफडीएला चपराक■कायदेशीर प्रक्रिया डावलला सुनावणीच नाही, उच्च न्यायालयाने कारवाई रद्द केली**

**नागपूर/ वर्धा/ जनमाध्यम**

वर्ध्यातील ६५ वर्षांची परंपरा असलेल्या गोरस भंडारवर अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईला अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बेकायदेशीर ठरवत रद्द केले. बहुचर्चित प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत कायद्याने अपेक्षित असलेली प्रक्रिया पाळली गेली नाही, संस्थेला सुनावणीची संधी देण्यात आली नाही आणि व्यवसाय बंद करण्याचा अधिकार अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना नसल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने एफडीएच्या भूमिकेवर ताशेरे ओढले.

न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठाने वर्धा तहसील गो-दुग्ध उत्पादक सहकारी संघ लिमिटेडची याचिका मंजूर करत ही कारवाई रद्द केली.

३१ मे रोजी एफडीएच्या पथकाने गोरस भंडारची तपासणी करून स्वच्छतेचा अभाव असल्याचा दावा करत प्रतिष्ठानाला टाळे ठोकले होते. दूध संकलन, विक्री आणि दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादनही पुढील आदेशापर्यंत बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते.




विशेष म्हणजे, गेल्या ६५ वर्षांत गोरस भंडारची केवळ चार वेळाच तपासणी झाली होती. मात्र, यापूर्वी कधीही इतकी कठोर कारवाई करण्यात आली नव्हती. त्यामुळे ही कारवाई जाणीवपूर्वक आणि ठरवून करण्यात आल्याचा आरोप संस्थेने न्यायालयात केला होता.

याचिकेत संस्थेने स्पष्ट केले की, कोणतीही पूर्वसूचना न देता, सुनावणीची संधी न देता आणि सुधारणा करण्यासाठी मुदत न देता प्रतिष्ठान बंद करण्यात आले.

ही कारवाई अन्न सुरक्षा कायद्याच्या चौकटीबाहेर असल्याचा दावा न्यायालयानेही ग्राह्य धरला.

१९३९ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेच्या माध्यमातून दररोज सुमारे नऊ हजार लिटर दूध संकलित व वितरित केले जाते. वर्धा जिल्ह्यातील १५ गावांतील सुमारे ८०० कुटुंबांचा उदरनिर्वाह या संस्थेवर अवलंबून आहे. त्यामुळे या कारवाईमुळे शेतकरी, दूध उत्पादक आणि कर्मचाऱ्यांमध्ये मोठी अस्वस्थता निर्माण झाली होती.

उच्च न्यायालयाचा निर्णय जाहीर होताच गोरस भंडार परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कर्मचाऱ्यांनी पेढे वाटून न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले.

संस्थेतर्फे वरिष्ठ ॲड. फिरदौस मिर्झा आणि ॲड. शंतनू भोयर यांनी न्यायालयात प्रभावी बाजू मांडली. या निकालानंतर एफडीएच्या कारवाईच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, कायद्याची चौकट डावलून केलेली कोणतीही प्रशासनाची कारवाई न्यायालय टिकू देणार नाही, असा स्पष्ट संदेश या निर्णयातून मिळाल्याची चर्चा सुरू आहे.

# खड्ड्यांच्या विळख्यात दोंदूडा-बामरडा मार्ग

**हिंगणघाट/जनमाध्यम**

तालुक्यातील दोंदूडा ते बामरडा या सुमारे तीन किलोमीटरच्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून सर्वत्र मोठमोठे खड्डे पडल्याने ग्रामस्थांचा संताप अनावर झाला आहे. वारंवार निवेदने देऊनही प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याचा आरोप करत गावकरी रस्त्यावर उतरले असून तातडीने दुरुस्ती न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.



ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, हा रस्ता सुमारे सात वर्षांपूर्वी बांधण्यात आला होता. मात्र सध्या संपूर्ण मार्ग खड्ड्यांनी विदीर्ण झाला असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या मार्गावर चोवीस तास वाहतूक सुरू असते. शालेय बस, प्रवासी बस तसेच इतर वाहनांची नियमित ये-जा होत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. अनेक किरकोळ अपघातही या रस्त्यावर घडल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.रस्त्याच्या दुरुस्तीसाठी अनेकवेळा संबंधित विभागाकडे निवेदने देण्यात आली. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांचा अंदाज येत नसून वाहनचालक आणि दुचाकीस्वारांना मोठा धोका निर्माण झाला आहे.

यावेळी आशिष ढगे,वैभव गोल्हार,अभय वरभे,अंकित वरभे,जगदीश वरभे,भाबाराव वलके,शुभम दाते,मोहन ढगे, विजय शेंडे,संजय ढाले, प्रसाद वरभे,विकास पेंदाम, अंकित ढगे,लक्ष्मण गोल्हार, दौलत आत्राम, उत्तमराव ढगे,तेजस ढाले,भगवान ढगे, प्रकाश वावरे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.ग्रामस्थांनी प्रशासना ला स्पष्ट इशारा दिला असून,दोंदूडा –बामरडा रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात आली नाही, तर तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा निर्धार व्यक्त केला.

# पत्रकाराशी ठाणेदाराची कथित गैरवर्तणूक

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

ज्येष्ठ पत्रकार अब्बास खान यांच्याशी हिंगणघाट पोलीस ठाण्याचे ठाणेदार अनिल राऊत यांनी कथितरित्या असभ्य व उद्धट वर्तन केल्याचा आरोप करत हिंगणघाट तालुका पत्रकार संघाने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

पत्रकार संघाच्या म्हणण्यानुसार, रविवार ५ जुलै रोजी घडलेल्या घटनेत ठाणेदारांनी ज्येष्ठ पत्रकार अब्बास खान यांच्याशी अयोग्य भाषेत संवाद साधत गैरवर्तणूक केली. या घटनेमुळे पत्रकारांमध्ये संतापाची लाट उसळली असून, लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा अवमान झाल्याची भावना पत्रकारांनी व्यक्त केली.



पत्रकार संघाने निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार समाजातील घडामोडी वस्तुनिष्ठपणे जनतेपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. अशा परिस्थितीत जबाबदार पोलीस अधिकाऱ्याकडून पत्रकारांशी अशोभनीय वर्तन होणे गंभीर बाब असून, यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि पत्रकारितेच्या सन्मानाबाबत प्रश्न निर्माण होत आहेत.

पत्रकारांसोबतच अशी वागणूक होत असेल, तर सर्वसामान्य नागरिकांशी पोलीस यंत्रणेचे वर्तन कसे असेल, असा प्रश्नही पत्रकार संघाने उपस्थित केला आहे.

या प्रकरणात तातडीने वस्तुस्थिती स्पष्ट करून संबंधित अधिकाऱ्याने खुलासा करावा तसेच भविष्यात पत्रकारांशी अशा प्रकारचे वर्तन होणार नाही, याची खात्री प्रशासनाने द्यावी, अशी मागणीही करण्यात आली.

निवेदन सादर करताना हिंगणघाट तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मंगेश वणीकर, हिंगणघाट पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण वैद्य यांच्यासह विजय राठी, सतीश वखरे,भास्कर कलोडे, राजेंद्र राठी,संदीप रेवतकर, अनिल अवस्थी,नरेंद्र हाडके, राजेश कोचर,संजय अग्रवाल, मोहम्मद रफीक,प्रदीप (सोनू) आर्य,अजय मोहोड, दशरथ ढोकपांडे,मुकेश चौधरी, रवी येनोरकर,रमेश लोंढे,केवलदास ढाले, शेख जावेद,प्रमोद जुमडे,सैय्यद जाकीर,केशव तितरे,कदीर बख्श यांच्यासह मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत सेंट जॉनचा झेंडा

## सहा विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र शाळेचा गौरव

**पुलगाव/जनमाध्यम**

महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ मध्ये सेंट जॉन हायस्कूल पुलगावच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे. वर्ग ५ व वर्ग ८ च्या शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेचे एकूण सहा विद्यार्थी पात्र ठरले असून परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

वर्ग ५ मधून आरोही ताकसांडे,धनश्री डोंगरे व श्रीजीत कडू यांनी तर वर्ग ८ मधून विनय तिवारी, मयंक चिमोटे व नम्रता राठोड यांनी


शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवत शाळेचा नावलौकिक उंचावला.

यंदाचे वर्ष वर्ग ५ व वर्ग ८ च्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेची अखेरची संधी ठरली. पुढील वर्षापासून ही परीक्षा वर्ग ४ व वर्ग ७ साठी होणार आहे. नव्या नियमानुसार वर्ग ४ मध्ये पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्ग ५, ६ व ७ या तीन वर्षांसाठी दरवर्षी पाच हजार रुपये तर वर्ग ७ मध्ये पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्ग ८ व ९ या दोन वर्षांसाठी दरवर्षी सात हजार पाचशे रुपये शिष्यवृत्ती थेट बँक खात्यात जमा होणार आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य संतोष यादव, उपप्राचार्य महेश भोयर, उपप्राचार्या सोनम देवतळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आज राज्यभर शाळा बंद

**वर्धा/ जनमाध्यम**

विद्यार्थ्यांचे शिक्षण, शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या आणि अशैक्षणिक कामांच्या वाढत्या ओझ्याविरोधात आज (९ जुलै) राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्था व अनुदानित शाळांतील शिक्षक सामूहिक रजेवर जाऊन शाळा बंद आंदोलन करीत आहेत. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीसह विविध शिक्षक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने हे आंदोलन होत आहे.

मतदार यादी पुनरीक्षणासह विविध अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचा आरोप शिक्षक संघटनांनी केला आहे.

शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करणे, शिक्षक अभियोग्यता परीक्षेच्या धोरणात बदल करणे, २०१७ पूर्वी नियुक्त शिक्षकांना परीक्षेतून सूट देणे तसेच १५ मार्च २०२४ च्या संचमान्यता धोरणाचा पुनर्विचार करणे, या प्रमुख मागण्यांसाठी आंदोलन करण्यात येत आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चे काढले जात आहेत.

# गुन्हेगारी वार्ता

## चोरीच्या संशयावरून चुलतभावांना मारहाण

**सिंदी (रेल्वे)** - हरवलेले बोकूड शोधण्यासाठी गावात फिरत असलेल्या दोन चुलतभावांना चोरीच्या संशयावरून बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना विठ्ठल-रुख्मिणी मंदिर परिसरात घडली. या प्रकरणी सिंदी (रेल्वे) पोलिसांनी शाहरूख पठाण व सुलेमान पठाण यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आकाश वरघणे यांचे बोकूड हरवल्याने ते चुलतभाऊ मंगेश वरघणे यांच्यासह दुचाकीवरून गावात शोध घेत होते. त्यावेळी आरोपींनी त्यांची दुचाकी अडवून बोकूड शोधण्याच्या बहाण्याने चोरी करण्यासाठी फिरत असल्याचा संशय व्यक्त केला. त्यानंतर काठी व फावड्याने दोघांनाही बेदम मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात दोघेही जखमी झाले. घटनेनंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## ऑटोतून आशावर्करचे सोन्याचे डोरले लंपास

**वर्धा** - पोस्ट ऑफिस चौकातून ऑटोने प्रवास करणाऱ्या आशावर्कर महिलेच्या पर्समधील दोन सोन्याचे डोरले चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शहर पोलिसांनी अज्ञात दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. संगीता धनवीज या काम आटोपून बसस्थानकाकडे जात असताना दोन महिला तोंडाला रुमाल बांधून त्याच ऑटोत बसल्या. जिल्हा सामान्य रुग्णालयाजवळ त्या उतरून गेल्यानंतर काही अंतरावर वसंत टॉकीज परिसरात धनवीज यांनी पर्स तपासली असता त्यातील १४ हजार ८०० रुपये किमतीचे दोन सोन्याचे डोरले चोरीला गेल्याचे आढळले. ऑटोत सोबत प्रवास करणाऱ्या महिलांनीच चोरी केल्याचा संशय व्यक्त करत त्यांनी शहर पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून संशयितांचा शोध सुरू केला आहे.

## संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या इसमावर गुन्हा

**हिंगणघाट** - सातेफळ रोडवरील गोकुलनगरीसमोरील दुकान परिसरात संशयास्पद हालचाली करणाऱ्या इसमाला पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत समाधानकारक माहिती न दिल्याने त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गस्तीवर असलेल्या पोलिसांना संबंधित इसम रात्रीच्या वेळी संशयास्पद स्थितीत फिरताना दिसला. चौकशीसाठी पोलिस जवळ जाताच तो पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. चौकशीत त्याने आपले नाव महेश वांढरे (४२), मूळ रा. वालदूर, ता. हिंगणघाट, सध्या हिंगणघाट येथे वास्तव्यास असल्याचे सांगितले. मात्र, त्याच्या उत्तरांमध्ये विसंगती आढळल्याने पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## शिवीगाळ, जीवे मारण्याची धमकी

**हिंगणघाट** - किरकोळ वादातून एका युवकाला अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. नितीन तडस आणि अक्षय थूल अशी आरोपींची नावे आहेत. तक्रारदार अभिलाष उर्फ रिंकू भालेराव यांचा भाऊ आकाश याचा वाढदिवस साजरा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी अभिलाष सासरच्या घरासमोर उभा असताना आरोपी तेथे आले. माझ्या भावाजवळ शिवीगाळ का केली, असा जाब विचारत त्यांनी अभिलाषला अश्लील शिवीगाळ केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. आरोपी गुन्हेगारी प्रवृत्तीचे असल्याची भीती व्यक्त करत अभिलाष यांनी पोलिसांत धाव घेतली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## मोहगावात माकडांचा उच्छाद

**समुद्रपूर** - तालुक्यातील मोहगाव येथे माकडांच्या वाढत्या उपद्रवामुळे नागरिक त्रस्त झाले असून वन विभागाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे. माकडांचा कळप घरांच्या छतांवर, अंगणात तसेच शेत परिसरात मुक्तपणे वावरत असून अन्नधान्य, फळे व घरातील वस्तूंची नासधूस करत आहे. काही ठिकाणी माकडे नागरिकांच्या अंगावर धावून जात असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना घराबाहेर पडतानाही धास्ती वाटत आहे. या समस्येकडे वन विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन माकडांच्या कळपाला सुरक्षितरीत्या पकडून योग्य अधिवासात स्थलांतरित करावे, अशी मागणी मोहगाव ग्रामपंचायतीचे प्रशासक नवघरे यांनी केली आहे.

# चिखलाच्या विळख्यात बेलोरा बसस्थानक प्रवाशांचा जीव धोक्यात

**आष्टी शहीद/ जनमाध्यम**

तालुक्यातील बेलोरा बु येथील बसस्थानक सध्या अक्षरश चिखलाच्या विळख्यात अडकले असून प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पावसाळा सुरू होताच बसस्थानक परिसरात सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. बसमध्ये चढताना आणि उतरताना प्रवाशांना अक्षरश कसरत करावी लागत असून एखादी मोठी दुर्घटना घडल्याशिवाय प्रशासन जागे होणार नाही का असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

बसस्थानक परिसरात पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने मोठ्या प्रमाणात पाणी साचते. या साचलेल्या पाण्यामुळे संपूर्ण परिसर चिखलमय झाला आहे. बस थांबताच प्रवाशांना चिखल तुडवत बसमध्ये चढावे आणि उतरावे लागत आहे. पाय घसरून



पडण्याचा धोका दिवसेंदिवस वाढत असून वृद्ध नागरिक महिला लहान मुले आणि शालेय विद्यार्थ्यांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

दररोज शेकडो प्रवासी या बसस्थानकाचा वापर करतात. मात्र मूलभूत सुविधांचा अभाव आणि परिसरातील अस्वच्छतेमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. स्थानिक ग्रामस्थांनी आणि प्रवाशांनी अनेकदा संबंधित यंत्रणेकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप होत आहे.

बसस्थानक परिसरात तातडीने मुरूम टाकणे रस्ता समतल करणे तसेच पावसाच्या पाण्याचा कायमस्वरूपी निचरा होईल अशी व्यवस्था उभारण्याची मागणी जोर धरत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने केवळ पाहणीपुरते मर्यादित न राहता तातडीने काम हाती घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

पावसाळा अद्याप सुरू असून पुढील काही दिवसांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

# दुर्गम सत्तरपुर शाळेची दमदार कामगिरी

**साहूर/ जनमाध्यम**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये आष्टी तालुक्यातील दुर्गम सत्तरपुर जिल्हा परिषद शाळेच्या पाच विद्यार्थ्यांनी तालुका व जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. तालुक्यात क्रांती सुनील धुर्वे प्रथम, हेमराज संदीप धुर्वे द्वितीय, विपिन जयकृष्ण काकडे तृतीय,



नम्रता दिलीप धुर्वे पाचवी तर जनरल प्रवर्गात मानव सचिन वाळूकर प्रथम आला. जिल्हा गुणवत्ता यादीतही क्रांती आठवी, हेमराज पंधरावा, विपिन सोळावा, नम्रता पंचेचाळीसावी तर जनरल प्रवर्गात मानव तृतीय आला. यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेत मुख्याध्यापक प्रवीण चव्हाण, शिक्षक प्रकाश परतेती, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जयकृष्ण काकडे, उपाध्यक्ष शारदा धुर्वे व ग्रामस्थांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - २२२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :**— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com



# शहराबाहेर हेल्मेट नाही तर मृत्यूला निमंत्रण

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघातांमुळे मृत्यूंचे प्रमाण चिंताजनक बनले असून, आता शहराबाहेरील मार्गांवर हेल्मेट न घालणाऱ्या वाहनचालकांविरोधात पोलीस विभागाने धडक कारवाई सुरू केली आहे. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक नियंत्रण शाखेकडून विशेष मोहीम राबविण्यात येत असून, दंड वसूल करणे हा उद्देश नसून प्रत्येक वाहनचालकाचा जीव वाचविणे हेच आमचे ध्येय आहे. त्यामुळे प्रत्येकाने हेल्मेटचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

डोडाणी चौक,सेलू काटे,सालोड टी-पॉईंट,येळाकेळी टी-पॉईंट,बी. डी. देशमुख महाविद्यालय सेवाग्राम,सेलसुरा पॉईंट तसेच पुलगाव, बरबडी, कान्हापूर, जुनापाणी चौक आणि जाम चौक परिसरात विशेष तपासणी मोहीम सुरू आहे. हेल्मेट,सीटबेल्ट आणि मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे.

### दंडापेक्षा तुमचा जीव महत्त्वाचा - सौरभ कुमार अग्रवाल

यावर्षी जिल्ह्यातील अपघातांमध्ये ९१ दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला असून, त्यापैकी सुमारे ५० टक्के मृत्यू हेल्मेट न घालणे आणि अतिवेगाने वाहन चालविणे यामुळे झाल्याचे आकडे धक्कादायक आहेत. या पार्श्वभूमीवर शहराबाहेरील रस्त्यांवर हेल्मेट तपासणी अधिक तीव्र करण्यात आली आहे.


सन २०२६ मध्ये आतापर्यंत ड्रंक अँड ड्राईव्हच्या २४९, हेल्मेट न वापरण्याच्या २,४८५, सीटबेल्ट न लावल्याच्या १५७ आणि अवैध प्रवासी वाहतुकीच्या १०३ कारवाया करण्यात आल्या आहेत. तसेच ६५ वाहनचालकांच्या परवान्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

हेल्मेट हा दंड टाळण्यासाठी नव्हे, तर कुटुंबाचा आधार असलेला तुमचा जीव वाचविण्यासाठी आहे. एक क्षणाची बेपर्वाई संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकते, असा संदेश देत वाहतूक नियंत्रण शाखेने सर्व वाहनचालकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

## खाजगी शाळांमध्ये होणारी पालकांची लूट थांबवा

# युवासेना आक्रमक, शिक्षणाधिकारी कार्यालयावर धडक

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर आणि जिल्ह्यातील खाजगी शाळांमध्ये वह्या ,पुस्तके, कपडे यांच्या नावावर पालकांची लूट करण्यात येत आहे. मनमानी वसुली पालकांकडून केली जात आहे. ही लूट लवकरात लवकर थांबवण्याची मागणी युवासेनेच्या वतीने शिक्षणाधिकारी सतीश मुगल आणि शिक्षण सहसंचालक अमोल पवार यांना आज बुधवार ८ जुलै रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, खाजगी शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून मनमानी फिस वसुली करण्यात येत आहे. शाळेकडून पालकांना एक दुकानाचे नाव दिले जाते. याच दुकानातून कपडे ,मोजे आणि इतर साहित्य खरेदी करण्याचे बंधन आहे. या दुकानातून पालकांना क्षमतेपेक्षा अधिक जास्त किमतीत साहित्य विक्री केले जात आहे. यामुळे पालकांवर अतिरिक्त बोजा वाढत आहे.

शिक्षण विभागाच्या वतीने खाजगी शाळांना आवश्यक दिशा निर्देश दिले आहे, तरीपण या आदेशांचे उल्लंघन करून शाळेकडून मनमानी करण्यात येत आहे. या मनमानीमुळे पालक त्रस्त झाले आहे.

खाजगी शाळांच्या या मनमानी विरोधात युवा सेनेने आज आक्रमक भूमिका घेतली आणि शिक्षणाधिकारी आणि शिक्षक सहसंचालकांना निवेदन देऊन या संदर्भात लवकरात लवकर ठोस निर्णय घेण्याची मागणी केली आहे. नाहीतर तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख राम पाटील, संतोष बद्रे, अजय महाले, वेदांत तालन, सुरज बद्रे ,शुभम साबले, सुरेश पाठक आदि उपस्थित होते.

# खुनाच्या प्रयत्नातील फरार आरोपी अखेर जेरबंद

## -गुन्हे शाखेची बडनेऱ्यात कारवाई -गुलिस्ता नगरातून संशयित ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या खुनाच्या प्रयत्नाच्या गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीला अमरावती शहर गुन्हे शाखेने शोधून काढत अटक केली. काही दिवसांपासून पोलिस शोधात असलेला आरोपी गुलिस्ता नगर परिसरात लपून राहत असल्याची माहिती मिळताच गुन्हे शाखेने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.



पोलिसांच्या माहितीनुसार, २३ मे २०२६ रोजी बडनेरा येथील गवळीपुरा, नवी वस्ती येथील रहिवासी सुलताना परवीन मन्नान खान यांच्या तक्रारीवरून बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०९(१), १९०, १९१(२), १९१(३) आणि ३५२ अन्वये खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणात फिरोज खान मन्नान खान (वय ३४) आणि अब्दुल जाकीर अब्दुल आहाज (वय ३५) यांच्यावर जीवघेणा हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केल्याचा आरोप आहे. तपासादरम्यान या गुन्ह्यातील इतर आरोपींना यापूर्वी अटक करण्यात आली होती. मात्र, शेख सलमान शेख शकूर (वय २६, रा. नवी वस्ती, बडनेरा) हा फरार होता. गुन्हे शाखेच्या पथकाला शेख सलमान हा गुलिस्ता नगर परिसरात वास्तव्य करत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर तेथे सापळा रचण्यात आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्यानंतर पुढील तपासासाठी बडनेरा पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनवणे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर आणि नयन आलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वातील अमरावती शहर गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# लोखंडी साहित्य पुरवण्याच्या नावावर ४ लाखांनी फसविले

## -हार्डवेअर दुकानदारासह तिघांवर गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** लोखंडी साहित्य पुरवण्याच्या नावावर एका व्यापाऱ्याला ४ लाख रुपयांचा गंडा घालण्यात आला. या प्रकरणी गाडगे नगर पोलिसांनी हार्डवेअर दुकानदारा सह तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना विद्यापीठ रोडवरील समीर मार्केटिंग नावाच्या हार्डवेअर दुकानात घडली. दीपेश हिवसे, हनीफ जानवानी सह इतर एका विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

साई नगर परिसरातील साने गुरुजी नगर निवासी अंकुश प्रभाकर परांजपे (वय ३७) यांनी तक्रार दिली की ते ७ मार्च रोजी समीर मार्केटिंग दुकानात गेले होते. तिथे जाऊन त्यांनी लोखंड खरेदीबाबत चौकशी केली. दुकानातील कर्मचाऱ्याने लोखंडाचा दर ५३ रुपये प्रति किलो सांगून मालक हनीफ जनवानी यांच्याशी फोनवर बोलून दिले. हनीफने १० टन लोखंडाचा पुरवठा करू असे आश्वासन देऊन आधी ४० हजार रुपये ॲडव्हान्स मागितले. त्यानंतर आणखी १ लाख १० हजार रुपये भरायला लावले. यानंतर जानवानीने लोखंडासाठी दोन लाख पन्नास हजार रुपये भरायला सांगितले. चार लाख रुपये दिल्यावर ट्रक रवाना होणार असे त्यांनी सांगितले. अंकुश ने दुकानदार जाणवाणीवर विश्वास ठेवून अडीच लाख रुपये आणखीन दिले. अशाप्रकारे अंकुश परांजपे यांनी एकूण ४ लाख रुपये आरटीजीएस ने भरले. पैसे घेतल्यानंतर आरोपींनी मालाचा पुरवठा केला नाही. याबद्दल अंकुशने आरोपीला विचारले असता त्याने उलट सुलट उत्तर दिले. त्यांचे फोन नाही उचलले. यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच अंकुश परांजपे यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यांच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी दुकान संचालक हनीफ जानवानी, दिपेश हिवसे व अन्य एका विरुद्ध कलम ३२८(४),३५१(२),३(५) बी एन एसनुसार गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.






## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:** ९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९



## दुरुस्ती सुचना

**वणी नगर परिषद, जि.यवतमाळ या कार्यालयातील जा.क.न.प.व./सा.प्र.वि./नि.सू./६६२/२०२६, दिनांक ०७.०७.२०२६ अन्वये दै.जनमाध्यम या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर निविदा सुचनेचा दिनांकाच्या रकान्यामध्ये दि.०७.०.२०२६ असे चुकीचे मुद्रित करून प्रसिध्द झाले आहे. त्याऐवजी सदर निविदा सुचनेचे जाहिरातीमध्ये दिनांक ०७.०७.२०२६ असे वाचावे.**

**स्वा/-**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, वणी**

---

**(C.J.J.D.) मा.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर)**
**नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ आर.एम.जे.सी.अर्ज क्र.१६५/२०२६ — ने.ता.१४.०७.२०२६

**हजराबी पठाण //वि// निरंक**

1. **हजराबी पठाण**
   रा.फुबगाव, ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
2. **फकरुल्लाहखान नबाबखान पठाण**
   चमन नगर, वार्ड नं. १७, नेर, ता.नेर, जि.यवतमाळ

// वि //
निरंक

ज्याअर्थी **नबाब खा भदे खा पठाण यांचा मृत्यू दि.०१.०६.२०२५ रोजी नेर, ता.नेर, जि.यवतमाळ येथे त्यांच्या मुलाच्या घरी** झाला असून ते **फुबगाव,ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथील मुळ रहिवासी होते.** अर्जदार क्र.१ ही त्यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १२ जुन २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, यांचे कार्यालय**
**तहसिल कार्यालय, भातकुली (जैन) - ४४४६०२**
**E-mail Id : tah.bhatkuli@gmail.com**

क्रमांक-म.स./प्रस्तु-१/ज.मृ./नोंद/कावी-८१२/२०२६ — दिनांक २५.०६.२०२६

**अर्जदार :-** ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत जळका हिरापुर, ता.भातकुली, जि.अमरावती
(अजिमशा ईमामशा, रा.जळका हिरापूर, ता.भातकुली, जि.अमरावती)

**जाहीरनामा**

या जाहीर नोटीसव्दारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत जळका हिरापुर, ता.भातकुली, जि.अमरावती यांनी अजिमशहा, रा.जळका हिरापुर, ता.भातकुली, जि.अमरावती यांचा जन्म प्रमाणपत्राचा आदेश मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

अजिमशा ईमामशा, रा.जळका हिरापूर, ता.भातकुली, जि.अमरावती येथील रहिवासी असून त्यांचा जन्म जळका हिरापुर येथे दि. २५.०५.१९८६ रोजी घरी झालेला आहे. याबाबत वादी यांनी आपल्या पत्रात तसेच स्थानिक चौकशी अहवालात नमूद केलेले आहे.

अजिमशा ईमामशा, रा.जळका हिरापूर, ता.भातकुली, जि.अमरावती यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, जळका हिरापूर येथे घेण्यात आलेली नाही. अर्जदार यांनी अजिमशा ईमामशा, रा.जळका हिरापूर, ता.भातकुली, जि.अमरावती यांच्या दि.२५.०५.१९८६ रोजी जन्म झाल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, जळका हिरापूर येथे घेण्यासाठी जन्म/मृत्यू नोंदणी कायदा १९६९ अन्वये तसेच जन्म/मृत्यू नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३ मधील ११(३) नुसार जन्म नोंदीचा ओदश मिळण्याबाबत प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

त्यामुळे अर्जदाराने दिलेल्या विनंती अर्जावरुन जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे. करिता सदर प्रकरणामध्ये ज्या कोणाला अर्जदार यांच्या वरील प्रमाणे नमूद विनंतीवर काही हरकती वा आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आंत कार्यालयीन वेळेत आपला आक्षेप अर्ज लेखी स्वरुपात आवश्यक पुराव्यासह तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, भातकुली यांचे समक्ष सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अर्ज स्विकारण्यात येणार नाही तथा त्या आक्षेप अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

शिक्का — **सही/-**
**तहसीलदार,भातकुली**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१२६८/२०२६
छाया व इतर विरुध्द निरंक
पुढील ता.२५.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Chaya Arunrao Tekade**
   Age 55 Yrs. Occu.: Household
2. **Shailesh Arunrao Tekade**
   Age 35 Yrs. Occu.: Labour
   Both R/o. Ward No. 3, Devara, Tq. & Dist. Amravati
3. **Tanuja Shriniwas Thakare**, Age 29 Yrs. Occu.: Household
   R/o. Ward No. 2, Gurukunj Ashram Mojhari, Tq. Tiosa, Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अरुण भिमराव टेकाडे** हे **दि.१०.०४.२०२६** रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **छाया व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **छाया व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०१.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का — आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१३४२/२०२६
**रवि व ईतर -वि- रंजीत व ईतर**
पुढील ता.०७.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. रवि रामचरण विश्वकर्मा, वय ५८ वर्षे, व्यवसाय - व्यवसाय
   रा.राजापेठ रोड, प्रभात गॅरेज जवळ, बेलपुरा, रुक्मिणी नगर, अमरावती
२. धीरज रामचरण विश्वकर्मा,वय ४९ वर्षे, व्यवसाय - खा.नोकरी
   रा.प्लॉट नं.२६-ए, श्रीनाथ रेसिडेन्सी वारुडा न्यू टाऊन बडनेरा, अमरावती
३. दीपा उमेश पातालबंसी, वय ५३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
   रा.भोसा रोड, इंदिरा नगर, यवतमाळ

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :**
१. रंजीत रामचरण विश्वकर्मा, वय ५१ वर्षे, व्यवसाय - मजुरी
   रा.राम मंदिरजवळ, राजापेठ, अमरावती
२. ज्योती हिरालाल केवट, वय ६१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
   रा.चिरनाल गांव, अकोला, ता.जि.अकोला

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रामचरण भगवानदिन विश्वकर्मा आणि शांताबाई रामचरण विश्वकर्मा** यांचे अनुक्रमे दिनांक **२२.०९.२०२४ आणि ०८.१०.२०१८** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार रवि व ईतर विरुध्द रंजीत व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रवि व ईतर विरुध्द रंजीत व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का — आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, चांदूर रेल्वे यांचे कार्यालय**
**मेन रोड चांदूर रेल्वे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती-४४४९०४**
**E-mail Id : tah.chandurrly@gmail.com**

क्रमांक/म.स./जन्म-मृत्यू/कावि-२५/२०२४ — दिनांक ०४.०६.२०२६

**जाहीरनामा**

**अर्जदार -** **श्री शेख बब्बु शेख मजित**
**रा.सावंगी मग्रापुर, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती**

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** **निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा सचिव ग्रामपंचायत कार्यालय, सावंगी मग्रापुर**

याद्वारे गावातील सर्वत्र लोकांना जाहीरपणे सुचित करण्यात येते की, निबंधक तथा सचिव ग्रामपंचायत कार्यालय, सावंगी मग्रापुर, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती यांनी अर्जदार **श्री शेख बब्बु शेख मजित,** रा.सावंगी मग्रापुर, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती यांचा स्वतःचा जन्म सावंगी मग्रापुर, ता.चांदूर रेल्वे येथे दि.**०३.०४.१९६२** रोजी झाल्याची खात्री पटल्याने व अनावधानाने जन्माची नोंद करण्यात आली नसल्यामुळे जन्माची नोंद निबंधक तथा सचिव ग्रामपंचायत कार्यालय, सावंगी मग्रापुर येथे करण्याकरिता आदेश मिळण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयात प्राप्त झालेला आहे.

वरील जन्माची नोंद करुन देण्यास कोणत्याही व्यक्तिस अगर संस्थेस कोणाला काही आक्षेप/ हरकती असतील तर त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत आपला आक्षेप लेखी स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल करावा्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप वा हरकतींना ग्राह्य धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दि.०४.०६.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

शिक्का — **सही/-**
**तहसीलदार**
**तथा तालुका दंडाधिकारी,**
**चांदूर रेल्वे**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१३५०/२०२६
शोभा व इतर विरुध्द निरंक
पुढील ता.०७.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Shobha Gangadhar Sapate**
   Age 55 Yrs. Occu.: Household
2. **Sagar Gangadhar Sapate**
   Age 39 Yrs. Occu.: Agriculturist
3. **Parvati Natthuji Sapate**, Age 95 Yrs. Occu.: Household
   All R/o. Naya Akola, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत गंगाधर नथ्थुजी सपाटे हे दि. १६.११.२०२३ रोजी** अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **शोभा व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार शोभा व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का — आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

## जाहीर सुचना

जाहीर सुचनेद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार **सुनिलकुमार विष्णुप्रसाद मिश्रा,** रा.सहजानंद नगर, अर्जुन नगर, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी खालील वर्णनाची स्थावर मिळकत विकत घेण्याचा करारनामा **श्री.विश्वनाथ निनुजी पिवतकर,** रा.श्रीहरी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती यांचेसोबत केला असून कराराप्रमाणे खरेदीखत नोंदवून घेण्याचे ठरले आहे.

**त्या मिळकतीचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर विद्यमान कचेरीचे कक्षेतील व अमरावती मनपा चे हद्दीतील मौजा रहाटगांव, प्रगणे नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.१६६/२ मधील ० हे.५९ आर जमिनीतील रामा.क्र. एन.ए.पी-३४/रहाटगांव/२/९६-९७ नि.ता.२९.०१.१९९८ नुसार कन्व्हर्शन मंजूर झालेल्या नकाशातील प्लॉट क्र.१०/ए याची साईज पुर्व-पश्चिम बाजू ९.०० मी. ३ उत्तर बाजू १८.०० मी. दक्षिण बाजू १७.७० मी. असून याचे एकुण क्षेत्रफळ १६०.६५ चौ.मी. (१७२८.०५९ चौ.फुट) सदर जागेवर तळमजल्यावर ५ खोल्यांचे बांधकाम व संडास बाथरुम असून वरच्या मजल्यावर सुध्दा किचन संडास बाथरुम आहे. सदर प्लॉट मिळकतीच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे--

| | |
|---|---|
| पुर्वेस | - लेआऊटमधील रस्ता |
| पश्चिमेस | - प्लॉट क्र.५-बी व ६-ए |
| उत्तरेस | - प्लॉट क्र.९-बी |
| दक्षिणेस | - प्लॉट क्र.१०-बी |

वरीलप्रमाणे चतुःसिमेतील प्लॉटवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, ताबा, वारसा, बक्षीस, बोजा, सरकारी अथवा निमसरकारी कर्ज किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास प्रस्तुत जाहीरसुचना प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व कागदपत्रासह प्रत्यक्ष भेटून लेखी आक्षेप नोंदवावा. वरील मुदतीत कोणताही आक्षेप किंवा हरकत प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार ठरल्याप्रमाणे खरेदीखत नोंदवून घेतील. नंतर कोणताही उजर चालणार नाही.

अमरावती
**दिनांक ०८.०७.२०२६**

(ॲड.ऋचा माधवराव तुळजापुरे (मोरे))
रा.एकदंत रेसिडेन्सी, अर्जुन नगर, दत्तवादी,
शेगांव-रहाटगांव रोड, अमरावती
ता.जि.अमरावती
मो.९९७५८७४०८१

---

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे अशिलांनी, **श्री सुनिल एकनाथराव सातंगे व श्री निलेश मोतीरामजी लोहकरे** यांच्याकडून त्यांच्या एकमेव मालकीची व ताब्यातील खालील नमुद मालमत्ता विकत घेण्याचा करार केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन : -**

"मौजे - दहिगांव, ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती , दहिगाव ग्राम पंचायतीच्या हददीतील, भूमापन क्रमांक व उपविभाग क्र. ४८/१/क एकुण क्षेत्रफळ १ हे ८१ आर पैकी पूर्व-पश्चिम वाटणीचे दक्षिणेकडील ० हे ८१ आर शेत जमीन तदंगभूत वस्तू सह" ज्याची चतुःसिमा पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| पुर्वेस | - विठठल नारायण उगले यांचे शेत, |
| पश्चिमेस | - गावठाण |
| उत्तरेस | - श्रीराम नामदेवराव निंघोट यांचे शेत, |
| दक्षिणेस | - रमेश नारायण निंघोट यांचे शेत. |

वरील मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कुळ, जप्ती, गहाण, बोझा, वारसहक्क, कर्ज, ताबा, कचेरीवाद, हितसंबंध अथवा कोणताही कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत खालील पत्त्यावर कागदपत्रांसह समक्ष भेटावे. तसे न केल्यास माझे अशील ठरल्याप्रमाणे खरेदीखत करुन घेतील व त्यानंतर कोणताही उजर चालणार नाही.

**दिनांक ०४.०७.२०२६**
**स्थळ : अमरावती**

**सी.बी.मिसळ**
**अधिवक्ता**
**पहिला मजला, राज प्लाझा मार्केट,**
**कंवर नगर चौक, अमरावती**
**मो.८८८८६५५६८९**

---

## जाहीर सोडचिठ्ठी

**जाहिर सोडचिठठी घेणार - पार्टी नं.१ - सौ.भावना योगेश हिरोळे**
वय ३० वर्षे, रा..शेंदोळा, ता.तिवसा
जि.अमरावती

**जाहिर सोडचिठठी घेणार - पार्टी नं.२ - योगेश गणेशजी हिरोळे**
वय ४४ वर्षे,
रा.वलगांव, ता.जि.अमरावती

१. आम्ही दोघे पार्टी नं. १ आणि पार्टी नं.२ वरील पत्त्यावर राहतो. आम्ही नात्याने पती-पत्नी आहोत. कुणाच्या दबावात न येता, मानसिक अवस्थेत सामाजिक जातमान्यतेनुसार मी स्वतः पार्टी नं.१, माझे पतीला दिनांक ९ जुलै २०२६ ला जाहीर सोडचिठठी देत आहे.

२. आमचा विवाह ४ जुलै २०१४ ला हिंदु पध्दतीने झालेला आहे. मागील ९ वर्षापासून पार्टी नं.१ माहेरी राहत आहे. यापुढे दोघाही पती-पत्नीचे पटणे शक्य नाही. सततच्या सांसरिक कलहातून कुणाचीही जिवितहानी होवू नये म्हणून याच क्षणी पार्टी नं.१ बिनशर्त घटस्फोट घेत आहे.

३. यापुढे दोघेही दुसरा विवाह करण्यास मोकळे झालो आहे. यापुढे दोघेही एक-दुसऱ्याच्या आयुष्यात हस्तक्षेप करणार नाही. एक दुसऱ्याची सामाजिक बदनामी करणार नाही. हे पती-पत्नीचे वैवाहिक संबंधाचे नाते इथेच संपुष्टात येत आहे.

**स्थळ** - अमरावती जिल्हा (महाराष्ट्र राज्य)
**दिनांक** - ०९/०७/२०२६

**जाहीर सोडचिठ्ठी देणार**

**पत्नी - सौ.भावना योगेश हिरोळे**

---

महाराष्ट्र शासन
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अमरावती**
जुना बायपास रोड, सर्किट हाऊस मागे, जेल रोड, कॅम्प, अमरावती-४४४६०१
दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६२१५८/२९५२०३८ ई-मेल

CC/29/2023 — FF 20.07.2026

PRITI NARENDRA SUKHDEVE -- VS -- M/S SUNSHINE INFRATECH

प्रति,
M/s Sunshine Infratech, Through its Partner
1. Pradnyakar Haridas Bhalekar,
   R/o Gajanan Nagar, Wadali Naka, Amravati.
2. Rupesh Tanbaji Tadas,
   R/o Gurudeo Nagar, V.M.V.Road, Amravati.
3. Sau.Kavita Sunil Jaju,
   R/o Khaparde Bagicha Irvin Chowk, Camp, Amravati.

**जाहीर नोटीस**

ज्याअर्थी वरील तक्रारदार यांनी अमरावती जिल्हा ग्राहम आयोगासमोर उपरोक्त तकार अर्जानुसार उपरोक्त गैरअर्जदार यांचे विरुध्द ग्राहक संरक्षण अधिनियम २०१९ चे कलम ३५ अंतर्गत प्रकरण दाखल केलेले आहे.

विरुध्द पक्ष यांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी सदर प्रकरणात जबाब दाखल करण्यासाठी दिनांक २०.०७.२०२६ रोजी वि.आयोगा समक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अमरावती सर्कीट हाऊसचे मागे, जेल रोड, कॅम्प अमरावती या पत्त्यावर सकाळी १०.३० वाजता आपण स्वतः किंवा आपले प्रतिनिधीमार्फत न चुकता उपस्थित रहावे.

सदर तारखेस व दिलेल्या वेळेवर आपण मा.आयोगा समक्ष उपस्थित न झाल्यास मा.आयोग आपले अधिकारात सदर प्रकरणाबाबत निर्णय घेईल.

करीता ही जाहीर नोटीस मा.आयोगाचे आदेशान्वये माझे सही व शिक्क्यानिधी आज दिनांक १६.०६.२०२६ रोजी दिली असे.

शिक्का — **प्रबंधक,**
**जिल्हा ग्राहक तकार निवारण आयोग, अमरावती**

---

महाराष्ट्र शासन
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अमरावती**
जुना बायपास रोड, सर्किट हाऊस मागे, जेल रोड, कॅम्प, अमरावती-४४४६०१
दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६२१५८/२९५२०३८ ई-मेल

CC/31/2023 — FF 20.07.2026

RANJANA RAMESH CHAVHAN -- VS -- M/S SUNSHINE INFRATECH

प्रति,
M/s Sunshine Infratech, Through its Partner
1. Pradnyakar Haridas Bhalekar,
   R/o Gajanan Nagar, Wadali Naka, Amravati.
2. Rupesh Tanbaji Tadas,
   R/o Gurudeo Nagar, V.M.V.Road, Amravati.
3. Sau.Kavita Sunil Jaju,
   R/o Khaparde Bagicha Irvin Chowk, Camp, Amravati.

**जाहीर नोटीस**

ज्याअर्थी वरील तक्रारदार यांनी अमरावती जिल्हा ग्राहम आयोगासमोर उपरोक्त तकार अर्जानुसार उपरोक्त गैरअर्जदार यांचे विरुध्द ग्राहक संरक्षण अधिनियम २०१९ चे कलम ३५ अंतर्गत प्रकरण दाखल केलेले आहे.

विरुध्द पक्ष यांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी सदर प्रकरणात जबाब दाखल करण्यासाठी दिनांक २०.०७.२०२६ रोजी वि.आयोगा समक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अमरावती सर्कीट हाऊसचे मागे, जेल रोड, कॅम्प अमरावती या पत्त्यावर सकाळी १०.३० वाजता आपण स्वतः किंवा आपले प्रतिनिधीमार्फत न चुकता उपस्थित रहावे.

सदर तारखेस व दिलेल्या वेळेवर आपण मा.आयोगा समक्ष उपस्थित न झाल्यास मा.आयोग आपले अधिकारात सदर प्रकरणाबाबत निर्णय घेईल.

करीता ही जाहीर नोटीस मा.आयोगाचे आदेशान्वये माझे सही व शिक्क्यानिधी आज दिनांक १६.०६.२०२६ रोजी दिली असे.

शिक्का — **प्रबंधक,**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अमरावती**

---

महाराष्ट्र शासन
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अमरावती**
जुना बायपास रोड, सर्किट हाऊस मागे, जेल रोड, कॅम्प, अमरावती-४४४६०१
दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६२१५८/२९५२०३८ ई-मेल

CC/33/2023 — FF 20.07.2026

DINESH RAMRAO SHABHARE -- VS -- M/S SUNSHINE INFRATECH

प्रति,
M/s Sunshine Infratech, Through its Partner
1. Pradnyakar Haridas Bhalekar,
   R/o Gajanan Nagar, Wadali Naka, Amravati.
2. Rupesh Tanbaji Tadas,
   R/o Gurudeo Nagar, V.M.V.Road, Amravati.
3. Sau.Kavita Sunil Jaju,
   R/o Khaparde Bagicha Irvin Chowk, Camp, Amravati.

**जाहीर नोटीस**

ज्याअर्थी वरील तक्रारदार यांनी अमरावती जिल्हा ग्राहम आयोगासमोर उपरोक्त तकार अर्जानुसार उपरोक्त गैरअर्जदार यांचे विरुध्द ग्राहक संरक्षण अधिनियम २०१९ चे कलम ३५ अंतर्गत प्रकरण दाखल केलेले आहे.

विरुध्द पक्ष यांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी सदर प्रकरणात जबाब दाखल करण्यासाठी दिनांक २०.०७.२०२६ रोजी वि.आयोगा समक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अमरावती सर्कीट हाऊसचे मागे, जेल रोड, कॅम्प अमरावती या पत्त्यावर सकाळी १०.३० वाजता आपण स्वतः किंवा आपले प्रतिनिधीमार्फत न चुकता उपस्थित रहावे.

सदर तारखेस व दिलेल्या वेळेवर आपण मा.आयोगा समक्ष उपस्थित न झाल्यास मा.आयोग आपले अधिकारात सदर प्रकरणाबाबत निर्णय घेईल.

करीता ही जाहीर नोटीस मा.आयोगाचे आदेशान्वये माझे सही व शिक्क्यानिधी आज दिनांक १६.०६.२०२६ रोजी दिली असे.

शिक्का — **प्रबंधक,**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०४२/२०२६
**शालिनी व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२५.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Shalini Dattatraya Naoghare, Age 80 Yrs. Occu.: Household
2. Mr.Umesh Dattatraya Naoghare, Age 53 Yrs. Occu.: Business
   Both R/o Shrivikas Colony, Near Rukhmini Nagar, Amravati.
3. Manish Dattatraya Naoghare, Age 57 Yrs. Occu.: Service
   R/o F-103, Tulip Building Dream Flower Co. HSG SOC Nashik
   **Late Prashant Dattatraya Naoghare (His Legal Heirs)**
4. **Smt.**Archana W/o Prashant Naoghare, Age 55 Yrs. Occu.:Household
5. Sharavika D/o Prashant Naoghare, Age 30 Yrs. Occu.: Architect
6. Vanshita D/o Prashant Naoghare, Age 20 Yrs. Occu.: Student
   All 4 to 6 R/o Prashant Sahniwas, Ajani Chowk, Vivekanand Nagar, Nagpur

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दत्तात्रय रामजी नवघरे** हे दिनांक 09.11.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शालिनी व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शालिनी व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३०१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# जीवनात आर्थिक क्रांती घडविणारा निर्णय-आ.संजय खोडके

## महिलांनी पारंपरिक शेती व्यवसायाचे संवर्धन व दिशा देण्याचे अनमोल योगदान

**अमरावती/का.प्र.**

शेती व्यवसाय हा भारतीय अर्थव्यस्थेचा कणा असून शेतकरी हा पोशिंदा असल्याचे आपण नेहमी म्हणत असतो. मात्र शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून कष्ट करणाऱ्या महिला शेतकऱ्यांना मात्र कुठलीही कायदेशीर ओळख आजपर्यंत मिळाली नाही. राज्यातील लाखो शेतकरी-शेतमजूर महिलांना शेतकरी म्हणून दर्जा मिळावा व ग्रामीण भागातील महिलांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडविण्यासाठी शासनाने महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ आणून एक क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. ग्रामीण महाराष्ट्रात एक नवीन सोनेरी पहाट आणणारे हे विधेयक असल्याचे मत विधानपरिषद सदस्य -आ. संजय खोडके यांनी व्यक्त केले.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये महाराष्ट्र शासनाने महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ पारित केले आहे. या विधेयकावर वरिष्ठ सभागृहात चर्चा करीत असतांना आ.संजय खोडके यांनी शेती व्यवसायातील महिलांचे महत्वपूर्ण योगदाना बद्दल सभागृहाला अवगत केले. त्यांनी अधोरेखित केले कि, महिला पेरणीपासून ते कापणी पर्यंत शेतामध्ये विविध कामे करतात. सिंचनाची कामे, शेततळे, यांत्रिक कामे, बि-बियाणे प्रक्रिया अशा विविध कामांमध्ये महिला शेतकरी यांचा प्रत्यक्ष सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. अनेक महिला या रासायनिक शेती ऐवजी सेंद्रिय शेतीला महत्व देत जुने घराच्या बीजांचे संगोपण करून आपल्या शेतात बीजारोपण करतात. आणि शासनाच्या नैसर्गिक शेतीचे महत्व अधोरेखित करतात. दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन सारख्या कृषी पूरक व्यवसायातही महिला शेतमजुर ह्या जवळपास सगळी कामे करत असतात. मात्र आजपर्यंत महिलांना व कृषी क्षेत्रातील महिलांना 'शेतकरी' म्हणून वैधानिक



मान्यता मिळाली नाही. मध्यंतरी स्वामिनाथन आयोगाच्या शिफासीनुसार महिला शेती हक्क विधेयक केले. त्याचे प्रतिबिंब या विधेयकात उमटले आहे. महाराष्ट्रातील अनेक राजकीय संघटना व शेतकरी संघटनांनी सुद्धा वारंवार प्रयत्न केले. त्या प्रयत्नांना आज खऱ्या अर्थाने या विधेयकातून मूर्त रूप मिळाले असल्याचे आ.संजय खोडके म्हणाले.

आ.संजय खोडके यांनी सभागृहाचे ध्यानाकर्षण करतांना सांगितले कि, आज शेती व्यवसायात पुरुष शेतकऱ्यांना ज्या आव्हानांचा सामना करावा लागतो, त्या समस्या महिला शेतकऱ्यांच्या बाबतीत सुद्धा उद्भवणार असल्याने त्यावर प्रभावी उपाययोजना व अंमलबजावणी करणे सुद्धा महत्वाचे आहे. महिलांना शेतकरी प्रमाण पत्र वितरणासाठी ग्रामपंचायत स्तरावर हि प्रक्रिया सुलभ करण्यात यावी, जाचक कागद पत्रांची सक्ती करु नये तसेच महिलांना थेट बँक कर्ज, शासकीय अनुदाने आणि कृषी योजनांचा लाभ देण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात महिला कृषी सल्ला कक्ष स्थापन करून महिलांना मार्गदर्शन व प्रशिक्षणाची सोय करण्यात यावी अशी सुचना आ.संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष केली.

महाराष्ट्र 'महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरेल व यातून महिलांना निर्णय प्रक्रियेत स्थान मिळेल. अशी अपेक्षा व्यक्त करित आ.खोडके यांनी या विधेयकाचे समर्थन करून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच राज्याचे कृषीमंत्री यांचे अभिनंदन केले आहे.

# जिल्ह्यात मतदार याद्यांचे विशेष सखोल पुर्नरिक्षण सुरू

**अमरावती/का.प्र.**

भारत निवडणूक आयोगाने देशभरात मतदार याद्या अद्ययावत करण्यासाठी विशेष सखोल पुर्नरिक्षण मोहीम सुरू केली आहे. अमरावती जिल्ह्यातील तब्बल २५ लाख ४५ हजार ६७७मतदारांच्या तपशिलांची प्रत्यक्ष घरोघरी जाऊन पडताळणी केली जाणार आहे.

मतदार यादीत केवळ पात्र नागरिकांचाच समावेश राहावा आणि अपात्र किंवा दुबार नावे वगळली जावीत, या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे.यासाठी आठ विधानसभा मतदारसंघांमध्ये यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.३० जून ते २९ जुलैदरम्यान बीएलओ घरोघरी भेटी देऊन मतदारांची माहिती संकलित करतील. एखादे घर बंद असल्यास संबंधित कुटुंबाशी संपर्क साधून किमान तीन वेळा भेट देतील. या प्रक्रियेत शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, ग्रामपंचायत कर्मचारी, कृषी सहाय्यक आणि अन्य कर्मचारी सहभागी राहतील. या मोहिमेत नागरिकांनी भरून दिलेले ईएफ फॉर्म स्वीकारण्यात येणार असून, हे फॉर्म सादर करणाऱ्या मतदारांची नावे ५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट केली जाणार आहेत. त्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे आणि हरकती नोंदविता येतील. विसंगती आढळल्यास संबंधित मतदारांना नोटीस देऊन सुनावणीअंती अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

**काही शाळा सकाळच्या सत्रात**

अनेक शाळांमधील शिक्षक हे बीएलओ म्हणून काम करीत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी ४ ते १९ जुलै या कालावधीत काही शाळांमध्ये सकाळच्या सत्रांचे नियोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर कोणताही परिणाम होणार नाही, याबाबत प्रशासनाने विशेष दक्षता घेतली आहे.

पावसाळ्याच्या कठीण परिस्थितीतही बीएलओ घरोघरी जाऊन काम करीत असल्याने नागरिकांनी त्यांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे. मजबूत, पारदर्शक आणि विश्वासार्ह लोकशाहीसाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे.

**आशिष येरेकर,** जिल्हाधिकारी



# सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची निवड

**अमरावती-** सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या MBA विभागाचे ३ विद्यार्थीनी ईशा आठवले Talent Acquisiton -Trainee, VIPSA Talent Solutions Private Limited, बॅंगलोर, समीक्षा काठोळे, Account Manager, Simply Vyapar apps pvt. ltd., बॅंगलोर,अनुष्का पाथरीकर, Business Development Executive, Finartha Invest pvt ltd, पुणे व्दारे निवड करण्यात आली.

बॅंगलोर स्थित Vipsa Talent Solutions pvt. ltd. कायमस्वरूपी /तात्पुरती भरती, उच्चस्तरीय कार्यकारी शोध, बाह्यस्त्रोत भरती/ वेतन प्रक्रिया / सल्लामसलत ह्या मनुष्यबळ सुविधा देत आहे. १८ राज्यातील कंपनी व ९०००० हुन अधिक अधिकारी वर्ग ह्यांनी VIPSA च्या माध्यमातून मनुष्यबळ सुविधेचा लाभ घेतला. बॅंगलोर स्थित Vyapar हि कंपनी मोबाइल/ डेस्कटॉप प्लॅटफॉर्म च्या माध्यमातून GST Biling, inventory tracking, accounting, payment चे सॉप्टवेअर लघु व मध्यम व्यापारी उद्देजक वर्गासाठी (MSME) मोफत सुविधा पुरवीत आहे. ९ भाषा, १० करोड दैनंदिन बिल, २८ राज्य, १.५ करोड अधिक गिऱ्हाईकांमध्ये प्रचलित आहे. Finartha पुणेस्थित कंपनी म्युच्युअल फंड, हेल्थ इन्शुरन्स, रियल इस्टेट आदी क्षेत्रात कार्यरत असून गुंतवणूकदारामध्ये नावलौकिक आहे. सिपना MBA विभाग आपल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत निवडलेल्या क्षेत्रात करिअर संधी देण्याकरिता प्रयत्नरत असते. यापूर्वीही विभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी विविध ख्यातनाम कंपन्यांमध्ये आपल्या उत्कृष्ट कामगिरीव्दारे विभागाची नावलौकिकता वाढवली आहे. त्यामुळे नवीन विद्यार्थ्यांना प्लेसमेंट्च्या संधी उपलब्ध होत आहे.

संस्थेचे अध्यक्ष जगदीश गुप्ता व प्राचार्य डॉ. संजय खेरडे यांच्या प्रेरणेतून विभाग प्रमुख डॉ. मनीष जाधव, इंडस्ट्री इन्स्टिट्यूट इंटरॅक्टशन व कार्पोरेट सेलचे डीन डॉ. गणेश गोविंदवार, डॉ. निकिता गुप्ता, डॉ. नितीन शेलोकर ह्यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देऊन यश संपादन केले.

# कपाशीचा पेरा वाढला, सोयाबीन पेरा घटला

**खल्लार/वार्ताहर**

खल्लार परिसरात यावर्षी खरीप हंगामातील लवकर येणाऱ्या सोयाबीन या पिकाचा पेरा घटला असून कपाशी पिकाला प्राधान्य देत कपाशी पिकाचा पेरा वाढला आहे. तर तूर या पिकाचाही पेरा वाढला आहे.

पांढरे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कपाशी पिकाला शेतकरी वर्ग दिवसेदिवस महत्व देत असून कपाशी पिकाचा पेरा हा वाढतच चालला आहे. त्या खालोखाल तूर पिकाचाही पेरा बऱ्या पैकी आहे. मागिल वर्षीच्या तुलनेत यावर्षी पाऊस उशिरा आल्याने परिसरात सोयाबीन पिकाचा पेरा हा अगदी कमी प्रमाणात आहे.ज्या शेतकऱ्यांकडे शेती बऱ्या पैकी आहे. त्यांनी शेतात कमी प्रमाणात का होईना सोयाबीन पेरले पण अल्पभूधारक व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांनी सोयाबीन या पिकाकड़े पाठ फिरविली आहे.

सोयाबीनचे उत्पन्न कमी व खर्च जास्त येत असल्याने सोयाबीन पिक हे परवडत नसल्याने व त्यातच पाऊस उशिरा त्यामुळे आल्याने सोयाबीन पिकाचा पेरा परिसरात कमी आहे.

**मूग व उडीद पिक हद्दपार**

खरीप हंगामातील सर्वात लवकर येणारे पिक म्हणजे मूग व उडीद परंतु वन्य प्राण्याच्या मोठया त्रासामुळे लवकर येणारी ही दोन पिके आता खल्लार परिसरातील शेतकरी वर्गाने पेरणेच बंद केल्याने ही शेतातून हद्दपार झाली आहेत.

## महिन्यातून एकदा यूडीआयडी कार्ड शिबीर भरवावे

**दर्यापूर**-येथील उपजिल्हा रुग्णालयात महिन्यातील किमान



एक दिवस UDID (Unique Disability ID) कार्ड तपासणी व नोंदणी शिबीर आयोजित करण्यात यावे, अशी मागणी भाजपा अनुसूचित जाती (अजा) मोर्चा मेळघाट जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी मा. राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, सध्या UDID कार्डासाठी आवश्यक असलेली वैद्यकीय तपासणी व नोंदणी प्रक्रिया अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दर बुधवारी राबविण्यात येते. त्यामुळे दर्यापूर तालुक्यासह ग्रामीण भागातील दिव्यांग नागरिकांना अमरावतीपर्यंत प्रवास करावा लागतो. शारीरिक अडचणी, प्रवासाचा खर्च, वेळेचा अपव्यय आणि सोबत नातेवाईक घेऊन जाण्याची गरज यामुळे दिव्यांग बांधवांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात महिन्यातून एक दिवस UDID कार्ड शिबीर आयोजित झाल्यास तालुक्यातील शेकडो दिव्यांग नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. तसेच शासनाच्या विविध दिव्यांग कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले UDID कार्ड सहज उपलब्ध होईल, असेही सोनटक्के यांनी नमूद केले आहे. यासंदर्भात मा. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती यांना आवश्यक सूचना देऊन दर्यापूर येथे नियमित मासिक शिबीर सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी विनंती खा.डॉ. अनिल बोंडे यांच्याकडे करण्यात आली आहे. दर्यापूर तालुक्यातील दिव्यांग नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन ही मागणी तातडीने मंजूर करून शिबीर सुरू करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# एक तास बस लवकर सोडण्याची मागणी

## विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळणार

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

रावळगाव (खैरी, दोनोडा, वाढोणा) येथून चांदूरबाजारकडे विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेली एसटी बस सध्या सकाळी सुमारे साडेअकरा वाजता रावळगाव येथे पोहोचत असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत वेळेवर पोहोचता येत नाही. संबंधित शाळा सकाळी ११ वाजता सुरू होत असल्यामुळे विद्यार्थी दररोज सुमारे एक तास उशिराने वर्गात पोहोचत असून त्यांच्या शैक्षणिक अभ्यासावर परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर परिसरातील पालक व ग्रामस्थांनी बसची वेळ बदलण्याची मागणी केली आहे. सद्याची बस सकाळी सव्वादहा ते साडेदहा दरम्यान रावळगाव येथे पोहोचेल, अशी व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.बस वेळेवर उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांना शाळेत वेळेत उपस्थित राहता येईल, तसेच त्यांचे शैक्षणिक नुकसान टळेल. त्यामुळे संबंधित एसटी आगार प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून बसच्या वेळेत तातडीने बदल करावा, अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.



'बस उशिरा येत असल्यामुळे आम्हाला रोज पहिला तास चुकतो. बसची वेळ एक तास लवकर केल्यास आम्ही वेळेत शाळेत पोहोचू शकतो.'

**आस्था राऊत,** विद्यार्थिनी

'दररोज उशिरा शाळेत पोहोचल्याने अभ्यासाचे नुकसान होते. विद्यार्थ्यांचा विचार करून बसची वेळ सकाळी सव्वादहा ते साडेदहा दरम्यान करण्यात यावी.'

**सर्वेश बारबुध्दे,** विद्यार्थी

## गोठ्यातून गाय चोरी

**नांदगाव खंडेश्वर** -येथील पोलीस स्टेशन हद्दीतील श्यामसुंद आर लेआउट,नांदगाव खंडेश्वर येथे अज्ञात चोरट्याने गोठ्यातून अंदाजे ५ वर्षांची, सुमारे १२ हजार रुपये किमतीची गाय चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी सौरभ रमेश काळेकर यांच्या फिर्यादीवरून कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# अचलपूर बसस्थानकातून लालपरीची सेवा सुरू करा

**अचलपूर/वार्ताहर**

लाखो रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या अचलपूर येथील बसस्थानकातून अमरावती, चांदूरबाजारसह ग्रामीण भागात लालपरीची सेवा सुरू करण्याची मागणी अचलपूर भाजपा शहराध्यक्ष कुंदन यादव यांनी परतवाडा आगारप्रमुख वासनिक यांना निवेदन देऊन केली आहे. एक महिन्याच्या आत बससेवा सुरू न केल्यास भाजपाच्या वतीने चक्काजाम आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे.

काही वर्षांपूर्वी अचलपूर येथे लाखो रुपये खर्च करून बसस्थानक बांधण्यात आले होते. मात्र सुरवातीपासून परतवाडा



बसस्थानकातून निघणाऱ्या गाड्या या अचलपूर बसस्थानकात न नेता सरळ अमरावती, चांदूरबाजार तथा ग्रामीण भागातील इतर गावांमध्ये जात असल्याने या बस स्थानकाचा फायदा शहरवासीयांना पाहिजे त्या प्रमाणात झाला नाही. त्यामुळे लाखो रुपयांची इमारत धूळखात उभी होती, आता पुन्हा एकदा या बसस्थानकाची दुरुस्ती, रंगरंगोटी करण्यात आली आहे. मात्र अचलपूर बसस्थानकावरून अमरावती, चांदूरबाजार व ग्रामीण भागातील गावांमध्ये प्रवासाकरिता अद्यापपर्यंत इतर बसेस सुरू करण्यात आल्या नाहीत.अचलपूर शहराची लोकसंख्या जवळपास एक लाखाच्या घरात आहे. त्यामुळे बसस्थानक अतिशय आवश्यक झाले आहे. विशेष म्हणजे, सदर बसस्थानक सुरू करण्याकरिता याआधी आगारप्रमुख व जिल्हा अधीक्षक यांच्याकडे पत्रव्यवहार करण्यात आला. परंतु त्यावर आजपर्यंत कोणतीही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे आता एक महिन्याच्या आत अचलपूर बसस्थानक सुरू करण्यात आले नाही तर भारतीय जनता पक्ष तथा अचलपूर येथील इतर संघटनांकडून अमरावती-परतवाडा मार्गावर चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा भाजपा चे शहराध्यक्ष कुंदन यादव यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. त्यामुळे आता नव्याने रुजू झालेल्या परतवाडा आगाराचे आगारप्रमुख वासनिक काय निर्णय घेणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## हितेंद्र देशमुख यांचे निधन

**टाकरखेडा संभू**-येथील रहिवासी असलेले हितेंद्र चंद्रकुमार देशमुख



वय ५० यांचे बुधवार ८ जुलैला सकाळी साडेआठ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले, त्यांच्या पश्चात वडील, आई, एक भाऊ, दोन बहिणी असा आप्त परिवार आहे.त्यांच्यावर टाकरखेडा संभू येथील स्मशानभूमीत बुधवार ८ जुलै ला अंत्यसंस्कार करण्यात आले.

## जाहीर नोटीस

**तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,**
मिळकतीचे वर्णन - **जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा बु. येथील भूमापन गट नं.८१ याचे एकुण क्षेत्र ५ हे.३१ आर यापैकी लिहून देणार** १) संतोष हरिभाऊ कावरे **यांचे मालकीचे क्षेत्र ०१ हे.०३ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बॅंका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.**

**अमरावती**
**दिनांक ०९.०७.२०२६**

**उपरोक्त अशिलातर्फे**
ॲडव्होकेट के.डी.शिराळे,
**पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,**
**शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२**
**शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,**
**संपर्क क्र.०२३१-२६६८८४७**

# विदर्भस्तरीय नगराध्यक्षा चषक स्पर्धेत काटोल आणि अमरावतीचा डंका!

## तुळजाई भवानी क्रीडा मंडळाचे परतवाडा नगरीमध्ये सातत्याने विदर्भ स्तरीय सातव्यांदा आयोजन

**खो-खोचा महासंग्राम**

**परतवाडा/वार्ताहर**

येथील तुळजाई भवानी क्रीडा मंडळ आणि नगर परिषद प्राथमिक शाळा, परतवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या विदर्भस्तरीय स्व. पुष्कळ ठाकूर व स्व. राजश्री गायकवाड स्मृती पुरुष व महिला 'नगराध्यक्षा चषक' खो-खो स्पर्धेचा थरार नुकताच दिमाखात झाला. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या महासंग्रामात पुरुष गटात काटोलच्या शिवाजी यूथ क्रीडा मंडळाने, तर महिला गटात अमरावतीच्या मराठा क्रीडा मंडळाने दिमाखदार जेतेपद पटकावून मैदानावर आपला दबदबा सिद्ध केला, तर अकोला संघाने उपविजेतेपदावर नाव कोरले.

या स्पर्धेत संपूर्ण विदर्भातून एकूण ३४ नामांकित संघ आणि ६०० हून अधिक खेळाडू व पदाधिकाऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला होता. सकाळ आणि संध्याकाळ अशा दोन सत्रांत प्रथम साखळी (लीग) व नंतर नॉट आउट पद्धतीने रंगलेल्या या सामन्यांनी परतवाडाकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. विजेत्या व उपविजेत्या संघांना अनुक्रमे ११,०००/- रुपये, ७,०००/- रुपये आणि ३,०००/- रुपये रोख व आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले; तसेच मैदानावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उत्कृष्ट आक्रमक, उत्कृष्ट संरक्षक आणि सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूंना स्पोर्ट्स बॅग देऊन वैयक्तिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्षा रूपाली अभय माथने यांच्या हस्ते झाले, तर कार्यक्रमाध्यक्ष माजी नगरसेवक गजानन कोल्हे हे होते. याप्रसंगी नगरसेविका हेमा दिलीप आसवानी,भारती सौरभ पांडे,दर्शना मोहन ठाकूर, नगरसेवक राज पाटील आणि मन्नूभाई शाह यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक अभय माथने होते. प्रमुख उपस्थितीमध्ये अचलपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, विदर्भ खो-खो असोसिएशनचे माजी अध्यक्ष प्रा.सुहास पांडे,प्रा. सुधीर निंबाळकर, संजय खडसे,अलका गावंडे,



विदर्भ खो-खो असोसिएशनचे सचिव संजय इंगळे, श्री.अशोक मोरे,डॉ. नितीन चवाळे,डॉ. गजेंद्र रघुवंशी, एल.आय.सी.चे विकास अधिकारी मनीष गावंडे,डॉ. संदीप झाडे,डॉ. दिलीप मोरे,प्राचार्य विजय भनग, किशोर बोंडे, अशोक श्रीवास, नितिन बांबल आणि संदेश गिरी यांसह अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. या सुवर्णक्षणी विदर्भ खो-खो असोसिएशनचे माजी अध्यक्ष प्रा. सुहास पांडे यांचा शाल व श्रीफळ देऊन,आतिषबाजीमध्ये सत्कार करण्यात आला.आपल्या अध्यक्षीय भाषणातून गजानन कोल्हे यांनी खेळाचे महत्त्व पटवून दिले, तर राज पाटील यांनी युवा वर्गाकरिता अशा क्रीडा स्पर्धांची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन केले.

या स्पर्धेच्या यशासाठी अभिनंदन अर्बन को-ऑपरेटिव बॅंक (परतवाडा शाखा) अमरावती यांनी विशेष आर्थिक सहकार्य केले. बॅंकेचे अध्यक्ष ॲडव्होकेट विजय बोथरा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र बरडीया, संचालक कवरिलाल ओसतवाल आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी देठे यांचे यासाठी मोलाचे सहकार्य लाभले.

यासोबतच राकेश सारवाण, सुजित सेवता, प्रशांत खोडस्कर, हेमंत थेटे, डॉ. नितीन चवाळे, डॉ. गजेंद्र रघुवंशी, डॉ. जयंत चतुर, डॉ. संदीप झाडे, जीवन भिसे, अंकुश भिडकर, डॉ. अजय बोंडे, डॉ. सतीश मोदानी, सर्वेश जैस्वाल , स्वराज जैस्वाल, डॉ. मुकेश सरदार, डॉ. उमेश तायडे, डॉ. नंदकिशोर सूर्यवंशी आणि युवक क्रीडा मंडळ, अमरावती यांनी स्पर्धेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

प्राचार्य डॉ राजेश जयपुरकर, माजी प्र-कुलगुरू संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व सिपना शिक्षण प्रसारक मंडळ अमरावती यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

स्पर्धेचे मुख्य संयोजक, भारतीय क्रीडा प्राधिकरणाच एन.आय.एस. पदविकाप्राप्त प्रशिक्षक डॉ. प्रशांत जी. गावंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व बहारदार संचालन केले, तर नगर परिषद शाळेचे मुख्याध्यापक प्रताप गावंडे, राजेश बचे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी तुळजाई भवानी क्रीडा मंडळाच्या राष्ट्रीय व विद्यापीठ कलरकोट खेळाडूंनी अहोरात्र परिश्रम घेतले, ज्यामध्ये राहुल रेवस्कर, किरण माहुरे, वैभव मांडवगडे, विशाल घोरपडे,हर्षल इंगळे, देवेश इंगळे, नवीन नांदुरकर, नितीन नांदुरकर, अजय सोनाने, शैलेश तर्जुले, रोशन पिवल, सागर वैष्णव, विवेक कौडेले, दीपेश चंदेल,गौरव ठाकूर,आयुष बारखडे, विनोद जनबंधू, सागर नेतनराव, सर्वेश इंगळे, शुभम कडव, विकास वराडे,अक्षय भुरे,प्रीती वानखडे, वैष्णवी मस्के,ज्ञानेश्वरी वानखडे,जानवी बारब्बदे,सुबोध धंदर, पवन गुप्ता,दीपक वराडे,आशु ऊर्फ मुसरलीन, राधेय अकर्ते, आदित्य राऊत, कार्तिक मंडले, आनंद ढगे (चिखलदरा) यांचा प्रामुख्याने समावेश होता. या शिस्तबद्ध नियोजनामुळे आणि क्रीडाप्रेमी प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादामुळे ही स्पर्धा परतवाड्याच्या क्रीडा इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदवली गेली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# पूर्णा धरणाचे दोन दरवाजे १० सें.मी. ने उघडले

## -प्रती सेकंद १५.५० घ.मी.पाण्याचा विसर्ग
## नदी काठावरील गावांना सावधतेचा इशारा



**चांदूरबाजार/प्रतिनिधीः-** तालुक्यातील पूर्णा धरणाच्या मध्यप्रदेशातील पाणलोट क्षेत्रात, दमदार पाऊस होत आहे.त्यामुळे पूर्णा मध्यम प्रकल्पाचे पाणी साठ्यात, झपाट्याने वाढ होत आहे.त्या अनुषंगाने धरणातील पाण्याचा येवा पाहता सुरक्षिततेच्या दृष्टीने, धरणातील पाणी नदी पात्रात सोडण्याचा निर्णय प्रकल्प प्रशासनाने घेतला आहे.परिणामी आज बुधवार दिनांक ८ जुलैला दुपारी ४ वाजता,धरणाचे दोन दरवाजे १० से.मी.ने उघडण्यात आले आहे. त्यामुळे नदी पात्रात प्रती सेकंद १५.५० घ.मी. (पान २ वर)

पूर्णा प्रकल्पाच्या पाणी साठ्यात झपाट्याने होणारी वाढ पाहता प्रकल्पाचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून धरणातील पाणी नदी पात्रात सोडण्याचा निर्णय घ्यावा लागला.या बद्‌ल वरिष्ठ प्रशासनाला माहीती देण्यात आली.तसेच नदी काठावरील गावांना,७ जुलैला सतर्कतेचा इशारा ही देण्यात आला होता.
**-सागर अलाटकर,** उप अभियंता,पूर्णा मध्यम प्रकल्प

# जिल्हा नियोजन समितीची १८ जुलै रोजी बैठक

**अमरावती/प्रतिनिधीः-**: जिल्हा नियोजन समिती बैठकीच्या नियोजनात बदल करण्यात आला असून, आता ही बैठक शनिवार, दि. १८ जुलै रोजी दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आली आहे. यापूर्वी ही बैठक दि. १२ जुलै रोजी होणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते.

सुधारित वेळापत्रकानुसार सदर बैठक आता दि. १८ जुलै रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे होणार आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेत ही बैठक होणार आहे. बैठकीत जिल्ह्याच्या विविध विकासकामांचा आणि नियोजनाचा आढावा घेतला जाणार आहे.

# इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील कान्होली येथील ६७ वर्षीय इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि. ७ जुलै रोजी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. भिमराव शामराव वानखडे (वय ६७) (पान २ वर)

# सामरा नगरातील कुंटणखाण्यावर पोलिसांची धाड

## -दोन संचालक ताब्यात



**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या सामरा नगर परिसरातील एका कुंटणखाण्यावर पोलिसांनी बुधवारी सायंकाळी धाड मारून दोन संचालक व तीन महिलांसह पाच आरोपींना ताब्यात घेतले आहे. सुशांत अरविंद पळसपगार (वय २५, हिंगासपुरे नगर) व मंगला विनोद पळसपगार ( वय ३५,गोदावरी कॉलनी ) असे अटक आरोपींची नावे आहे. तीन महिलांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आणि त्यांची सुटका केली.

राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना गोपनीय माहिती मिळाली होती की, सामरा नगर येथील दर्शन सोसायटी मधील फ्लॅट नंबर ४०२ मध्ये कुंटणखाणा चालविण्यात येत आहे. यावरून पोलिसांनी बुधवारी सायंकाळी ५.३० वाजता येथे धाड मारली. एकूण तीन महिलांसह दोन संचालकांना ताब्यात घेण्यात आले. या महिलांना देह व्यापारासाठी मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगाल मधून बोलविण्यात आले होते. आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये राजापेठ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त श्याम घुगे, सहाय्यक (पान २ वर)

# राज्यातील ३०४ अनुभवी आयटी तज्ञ कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजित करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

## आमदार राजेश वानखडे यांचे मागणीवरून मंत्रालयातील बैठकीत निर्णय



**अमरावती/प्रतिनिधीः-**: सन २०१७ च्या District and Taluka Facilitation Cell शासन निर्णयानुसार राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालये, जिल्हा परिषद कार्यालये तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयांमध्ये बाह्य यंत्रणेमार्फत जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक,जिल्हा प्रकल्प प्रमुख , वरिष्ठ नेटवर्क अभियंता ,सॉफ्टवेअर सहाय्य अभियंता, नेटवर्क अभियंता या पदांवर एकूण ३०४ अनुभवी आयटी तज्ञ गेल्या दहा वर्षापासून कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याचा निर्णय मध्यंतरी घेण्यात आलेला होता.यामुळे या सर्व तंत्रज्ञ कर्मचारी चिंतातुर झालेले होते. या कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाने आमदार राजेश वानखडे यांची भेट घेऊन या परिस्थितीत मध्यस्थी करून तोडगा काढावा अशी विनंती केलेली होती. त्या अनुषंगाने माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांना पत्राद्वारे सदर (पान २ वर)

# बोगस बियाणे कंपन्यांवर तातडीने गुन्हे दाखल करा

## -अन्यथा 'जोडे मारा' आंदोलनाचा कॉंग्रेसचा इशारा



**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना निकृष्ट व उगवणशक्ती कमी असलेले बोगस बियाणे विक्री करून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याच्या निषेधार्थ तालुका कॉंग्रेस कमिटी, तिवसाच्या वतीने आज तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी, तिवसा यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी कृषी अधिकाऱ्यांच्या टेबलावर बोगस बियाण्याचे पोते ठेवून तीव्र निषेध नोंदविला.

कॉंग्रेसच्या वतीने प्रशासनाला स्पष्ट इशारा देण्यात आला की, पुढील दोन दिवसांत संबंधित बियाणे उत्पादक कंपन्यांनी शेतकऱ्यांना नवीन बियाणे उपलब्ध करून द्यावे किंवा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, जेणेकरून दुबार पेरणी वेळेत करता येईल.

याशिवाय संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी तातडीने तिवसा येथे येऊन शेतकऱ्यांशी संवाद साधावा व प्रशासनाशी समन्वय साधावा. अन्यथा तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने 'जोडे मार ' आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, (पान २ वर)

# निकृष्ट बियाणे विकणाऱ्या कंपनी व कृषी सेवा केंद्रावर कारवाई करा



## -वंचित बहुजन आघाडीची मागणी

**तिवसा/प्रतिनिधीः-** शेतीच्या पेरणीचा हंगाम आटोपला असताना शेतकऱ्यांनी विविध कंपनीचे पेरलेले बियाणे काही ठिकाणी उगवलेच नसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. निकृष्ट बियाणे विकणाऱ्या कंपनी व कृषी सेवा केंद्रावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे वतीने युवा आघाडी जिल्हा महासचिव सागर भवते यांनी तालुका कृषी अधिकारी यांचेकडे केली आहे. पेरणीनंतर काही शेतकऱ्यांच्या शेतात बियाणे उगवले नसल्याच्या तक्रारी वंचित बहुजन आघाडीकडे प्राप्त झाल्या होत्या, शेतकरी (पान २ वर)

# शहानुर धरण प्रकल्पातून ३ दिवस पाणीपुरवठा बंद

## तांत्रिक दुरुस्तीसाठी मजीप्रा प्रशासनाचे नागरिकांना आवाहन



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) जलव्यवस्थापन विभाग, अमरावती अंतर्गत येणाऱ्या शहानूर धरण प्रकल्पातून चालविल्या जाणाऱ्या दोन महत्त्वाच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा पाणी पुरवठा आगामी काळात सलग तीन दिवस पूर्णपणे बंद राहणार आहे. ११ जुलै २०२६ ते १३ जुलै २०२६ या कालावधीत तांत्रिक दुरुस्तीच्या कामामुळे हा पुरवठा खंडित केला जाणार असल्याची अधिकृत माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता विवेक सोळंके यांनी दिली आहे.

शहानूर धरण मध्यम प्रकल्प येथील वीज निर्मिती पूर्ववत स्थापित (पान २ वर)

# चांदूरबाजार खरेदी-विक्री संस्थेच्या अध्यक्षपदी रावसाहेब लंगोटे

## बबलू देशमुख यांच्या गटाचे वर्चस्व कायम



**चांदूरबाजार/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार खरेदी-विक्री सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदाच्या रिक्त झालेल्या जागेवर जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या नेतृत्वातील गटाचे रावसाहेब लंगोटे यांची आज बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी व सहकार क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

काही दिवसांपूर्वी संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. प्रतापराव किटुकले यांनी आपल्या अध्यक्षपदाचा (पान २ वर)

# डॉ.मंगेश गोदावले नवे मनपा आयुक्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त वर्षा लद्धा यांची बदली झाली आहे. त्यांच्या जागी भारतीय प्रशासकीय सेवेतील ज्येष्ठ अधिकारी डॉ. मंगेश गोंदवले यांची नवीन मनपा आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाने बुधवारी सायंकाळी प्रशासकीय फेरबदलांचे आदेश जारी केले. दरम्यान, अमरावतीच्या मावळत्या महानगरपालिका आयुक्त वर्षा लद्धा यांची पुणे येथे महिला व बालविकास आयुक्त या पदावर बदली (पान २ वर)

# इन्स्टाग्रामवर हातात चाकू घेऊन फोटो व्हायरल करणे पडले महागात

## दहशत पसरविणारा पोलिसांच्या ताब्यात



**अमरावती/प्रतिनिधीः-** सोशल मीडियावर हातात घातक शस्त्रे घेऊन रिल्स बनवणे किंवा फोटो व्हायरल करून दहशत निर्माण करण्याचा नवा ट्रेंड सध्या तरुणाईच्या डोक्यात चांगलाच भिनला आहे. पण अशाच एका 'इन्स्टा भाई' ला राजापेठ पोलिसांनी चांगलाच इंगा दाखवला आहे. हातात धारदार चाकू घेऊन फोटो व्हायरल करणाऱ्या २१ वर्षीय तरुणाला राजापेठ पोलिसांनी बुधवारी बेड्या ठोकल्या आहेत.एका तरुणाचा हातात चाकू घेतलेला फोटो इंस्टाग्रामवर प्रचंड व्हायरल होत असल्याची माहिती राजापेठचे ठाणेदार (पान २ वर)

# अचलपूर बसस्थानकातून लालपरीची सेवा सुरू करा

## भाजपा शहराध्यक्ष कुंदन यादव यांची मागणी



**अचलपूर/प्रतिनिधीः-** लाखो रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या अचलपूर येथील बसस्थानकातून अमरावती, चांदूरबाजारसह ग्रामीण भागात लालपरीची सेवा सुरू करण्याची मागणी अचलपूर भाजपा शहराध्यक्ष कुंदन यादव यांनी परतवाडा आगारप्रमुख वासनिक यांना (पान २ वर)

# अल्पवयीन मुलीच्या आत्महत्या प्रकरणात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

## -वरूड येथील धक्कादायक घटना
## -सुसाईड नोटमुळे धक्कादायक वास्तव आले समोर

**अमरावती/प्रतिनिधीः-** वरुड तालुक्यातील एका १७ वर्षीय मुलीने आपले आयुष्य संपवले. सुरुवातीला नैसर्गिक वाटणाऱ्या या मृत्यू मागील धक्कादायक वास्तव मुलीच्या सुसाईड नोटमुळे समोर आले आहे, ज्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. मुलीच्या सुसाईड नोटच्या आधारावर पोलिसांनी या प्रकरणात चार आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पीडित मुलीचा तिच्याच समवयस्क मित्राने प्रेमाच्या जाळ्यात ओढून शारीरिक छळ केला. ज्या दोन मैत्रिणींवर तिने जिवापलीकडे विश्वास ठेवला, त्यांनीच तिच्या (पान २ वर)

